# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ मंगळवार १ जुलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे १०







## आता सीमेवर असेल भारताचा 'तिसरा डोळा'

### चीन-पाकिस्तानची झोप उडवेल मोदी सरकार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** ऑपरेशन सिंदूरद्वारे पाकिस्तानचे कंबरडे मोडल्यानंतर, आता भारताने आपली लष्करी ताकद आणखी वाढविण्यास सुरुवात केली आहे. याअंतर्गत, आता



भारत पुढील चार वर्षांत अर्थात २०२९ पर्यंत ५२ विशेष संरक्षण उपग्रह अवकाशात पाठवणार आहे. हे सर्व उपग्रह चीन आणि पाकिस्तानला लागून असलेल्या भारताच्या सीमेवर लक्ष ठेवतील. हे सर्व उपग्रह आर्टिफिशियल इंटेलिजन्स (ँइ) बेस्ड असतील.

**गेल्या वर्षीही देण्यात आली होती कोट्यवधींची मंजुरी** - ही संपूर्ण मोहीम संरक्षण अंतराळ संस्थेअंतर्गत चालवली जात आहे. गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील सुरक्षा व्यवहारांसंदर्भातील मंत्रिमंडळ समितीने यासाठी २६,९६८ कोटी रुपये मंजूर केले होते. या योजनेंतर्गत, इस्त्रो २१ उपग्रह तयार करून प्रक्षेपित करणार आहे, तर तीन भारतीय खाजगी कंपन्या ३१ उपग्रह तयार करतील.

**पहिला उपग्रह एप्रिल २०२६ मध्ये प्रक्षेपित केला जाईल** - हे उपग्रह लो-अर्थ ऑर्बिट आणि जिओस्टेशनरी ऑर्बिटमध्ये तैनात केले जातील. पहिला उपग्रह एप्रिल २०२६ मध्ये प्रक्षेपित केला जाईल. मात्र, टाईम्स ऑफ इंडियाच्या वृत्तानुसार, हा कालावधी आणखी कमी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. स्पेस-बेस्ड सर्व्हिलान्सच्या तिसऱ्या टप्प्यांतर्गत (एँए-३) हे सर्व सुरू आहे. ☞(पान २ वर)

## ठाकरे बंधू एकत्र आले तर मुंबई पालिका निवडणूक काँग्रेस स्वबळावर लढणार?

**७ जुलैला निर्णय होणार**

**मुंबई/प्रतिनिधी :** आगामी महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्ष तयारीला लागले आहेत. महाविकास आघाडीतून महायुतीत अनेक नेते, पदाधिकारी यांचा प्रवेश मोठ्या प्रमाणावर होत आहे. ठाकरे गटासह काँग्रेसलाही आता एकामागून एक धक्के बसत आहेत. यातच ठाकरे बंधू एकत्र येण्याबाबत राजकीय वर्तुळात चर्चांनी जोर धरला आहे. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या नेत्यांची दिल्लीत खलबते झाली. काँग्रेसच्या नेत्यांनी दिल्लीत बैठकांना उपस्थिती दर्शवली. यानंतर पत्रकारांशी बोलताना काँग्रेस नेत्यांनी मुंबई महापालिका निवडणुकीबाबतची रणनीती काय असेल, याबाबत सांगितले.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी काय भूमिका घ्यायची आहे, त्यासाठी सात तारखेला बैठक होणार आहे. ही बैठक मुंबईत होणार आहे. आमचे सचिव व्यंकटेश आणि मी त्या बैठकीत सहभागी होणार आहोत. ०७ तारखेला अंतिम निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती काँग्रेस नेते रमेश चेन्नीथला यांनी दिली. तसेच कार्यकर्त्यांनी भावना अशी आहे की, प्रत्येक ठिकाणी काँग्रेस पक्षाने



स्वबळावर लढले पाहिजे. सर्व ठिकाणी उमेदवार दिले पाहिजेत. कारण ही कार्यकर्त्यांची निवडणूक आहे. ही स्थानिक पातळीवरील निवडणूक आहे. यावर अध्यक्षांची चर्चा करावी लागेल, असे चेन्नीथला यांनी सांगितले.

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. राज ठाकरे यांनी उत्तर भारतीयांच्या विरोधात भूमिका घेतली होती. ठाकरे बंधू एकत्र आल्यास काँग्रेस त्यांच्यासोबत जाणार का, असा प्रश्न रमेश चेन्नीथला यांना विचारण्यात आला. राज ठाकरे यांच्या भूमिकेशी आम्ही अजिबात सहमत नाही. उत्तर भारतीय आणि दक्षिण भारत असे काही नाही. भारत एक आहे. उत्तर भारतीयांना काँग्रेसने मजबूत केले आहे. त्यांना अनेकदा संधी दिली आहे. काँग्रेस आपली विचारधारा घेऊन पुढे जाईल. जर राज ठाकरे सोबत येण्याबाबत काही होत असेल, तर त्याचे काय करायचे त्यावर नंतर विचार केला जाईल. अजून तरी ठाकरे बंधू एकत्र येणार का, हे निश्चित झालेले नाही. परंतु, मुंबई महापालिकेच्या निवडणुकीबाबत ७ तारखेला आम्ही निर्णय घेणार आहोत ☞(पान २ वर)

## औषधी बनवणाऱ्या कंपनीत स्फोट!

## १० कामगार ठार



**तेलंगणा//वृत्तसंस्था-** औषधी बनवणाऱ्या कंपनीच्या कारखान्यात रासायनिक भट्टीचा स्फोट झाल्याची भयंकर घटना सोमवारी घडली. तेलंगणातील संगारेड्डी जिल्ह्यात सिगाची फार्मास्युटिकल कंपनीच्या कारखान्यात ही घटना घडली आहे. यात दहा कामगारांचा मृत्यू झाला असून, अनेक जण जखमी झाले आहेत. काही जण ढिगाऱ्याखाली दबले गेले. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

सिगाची इंडस्ट्रीजचे तेलंगणातील पाशमैलारममध्ये रासायनिक कारखाना आहे. सकाळी साडेनऊच्या सुमारास ही घटना घडली. कारखान्यात स्फोट झाल्याची माहिती मिळताच वेगवेगळ्या अग्निशामक दलाच्या केंद्रावरून बंब पाठवण्यात आले. त्याचाबरोबर एनडीआरएफ, डीआरएफ आणि एसडीआरएफची पथके बोलावण्यात आली.

रासायनिक कंपनीत झालेला स्फोट इतका भीषण होता की, संपूर्ण बिल्डिंग खाली कोसळली. स्फोटाच्या तीव्रतेने आजूबाजूलाही हादरे जाणवले. या घटनेत १० कामगारांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. पण, प्रशासनाकडून याला अद्याप दुजोरा मिळालेला नाही. सहा जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले, तर काहींचा रुग्णालयात नेताना आणि नेल्यानंतर मृत्यू झाला. ☞(पान २ वर)

### ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चा असतानाच

## उद्धवसेना-मनसेला खिंडार; अनेक पदाधिकारी शिंदे गटात सामील

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीनंतर ठाकरे गटाला पडलेले खिंडार अधिकच विस्तारत असल्याचे पाहायला मिळत आहे. एकीकडे पदाधिकारी, नेते, कार्यकर्ते पक्ष सोडून जात असताना, ठाकरे गटातीलच अनेक जण नाराज असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. संपूर्ण राज्यभरातून ठाकरे गटाला गळती लागल्याचे दिसत आहे. अनेक वर्षे पक्षात कार्यरत असलेले पदाधिकारी, नेते उद्धव ठाकरेंना जय महाराष्ट्र करत, शिवसेना शिंदे गटात सामील होत आहे. त्यामुळे आगामी महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटाची ताकद वाढत असून,



ठाकरे गटाला एकामागून एक धक्के बसत आहेत. पुणे जिल्ह्यातील मंचर, अहिल्यानगर तसेच ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर येथील ठाकरे गट, राष्ट्रीय काँग्रेस, मनसे आणि रिपब्लिकन पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. ☞(पान २ वर)

### ७० वर्षांनी सोडणार पक्षाची साथ

## कुणाल पाटील करणार भाजपात प्रवेश



**मुंबई/प्रतिनिधी :** उत्तर महाराष्ट्र हा काँग्रेसचा बालेकिल्ला होता. मात्र, याच उत्तर महाराष्ट्राकडे काँग्रेसचे दुर्लक्ष झाले आहे. अगदी इंदिरा गांधी महाराष्ट्रातील प्रचाराची सुरुवात उत्तर महाराष्ट्रातून करायच्या. मात्र आता या भागाकडे पक्षाचे लक्ष राहिलेले नाही. २०१४ मध्ये मोदी लाट असतानाही याच भागातून निवडणूक लढवलेली आहे आणि जिंकलो आहे. काँग्रेसचा थेट जनतेशी कनेक्ट कमी कमी होत गेला आहे, असे सांगत काँग्रेस नेते कुणाल पाटील यांनी भाजपामध्ये प्रवेश करणार असल्याचे निश्चित केले आहे. गेल्या काही दिवसांपासून कुणाल पाटीलभाजपामध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चा होत्या. आता खुद्द कुणाल पाटील यांनी यावर शिक्कामोर्तब केले आहे. माझा जिल्हा आणि उत्तर महाराष्ट्रात विकासाचा बॅकलॉग भरून काढायचा आहे. त्यामुळेच भाजपा प्रवेशाचा निर्णय घेतलेला आहे. गेल्या १० ☞(पान २ वर)

## शेतीच्या मशागतीचा खर्च परवडेना, ६५ वर्षीय वृद्ध शेतकऱ्याने स्वतःलाचं जुंपले औताला

**लातूर/वृत्तसंस्था-** शेतकऱ्याचे (ईंसे) उत्पन्न दुप्पट करण्याची भाषा सरकार करत आहे. कृषीप्रधान देशाला आधुनिक शेतीची जोड देण्यासाठी सरकार अनेक योजनांची घोषणा देखील करत आहे. मात्र त्यावेळी महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांचे चित्र मात्र वेगळंच आहे. शेतीच्या मशागतीचा खर्च परवडेना म्हणून एका ६५ वर्षीय वृद्ध शेतकऱ्याने स्वतःलाचं औताला जुंपल्याचा प्रकार समोर आला आहे. कृषीप्रधान देशाचं हे चित्र नक्कीच आशादायक नसल्याचं बोललं जात आहे. लातूर जिल्ह्यातील हाडोळती या गावातील ही घटना आहे. अंबादास गोविंद पवार हे लातूर (थ्रूंले) जिल्ह्यातील हाडोळती या गावातील शेतकरी आहेत. अडीच एकर कोरडवाहू



शेतीचे मालक आहेत. त्यांचे वय वर्ष ६५ आहे. शेतीचा खर्च परवडत नसल्याने बैलाच्या ठिकाणी औताला स्वतःला झुंपवून घेतले आहे. मागील सात ते आठ वर्षापासून याच प्रकारे ते काम करतात. यावर्षी शरीर थकले. हातपाय हलतात मान हलते मात्र नशिबी आलेली कष्ट काही संपत नाही. पेरणीपूर्व मशागत पेरणी बी, खतं यांचा खर्च परवडत नसल्याने ते आणि त्यांची पत्नी हे स्वतः शेतात काम करतात. ट्रॅक्टर बैलाचा नांगर यासाठी पैसे लागतात ते त्यांच्याकडे नाहीयेत. स्वतः केल्याशिवाय पर्याय नसल्याने औताला ६५ वर्षाचा पती आणि ६० वर्षाची पत्नी असे मिळून काम करत आहेत. बैलाच्या नांगरणीसाठी दिवसाला अडीच हजार रुपये

अंबादास गोविंद पवार यांना एक मुलगी आहे जिचे लग्न झाले आहे. मुलगा पुण्यामध्ये छोटे मोठे काम करतो. सून आणि दोन नातू गावात राहतात. नातवांचे शिक्षण आणि हाता तोंडाचा मेळ घालण्यासाठी ते स्वतः काम करत आहेत. बैलाच्या नांगरणीसाठी दिवसाला अडीच हजार रुपये दयावे लागतात, ट्रॅक्टरला त्यापेक्षा अधिकचे पैसे द्यावे लागतात म्हणून स्वतः बैलाच्या ठिकाणी जुंपून घेतात.







जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# सामाजिक कार्यकर्ते अनिल वहिले यांचा रेल्वेने कटून मृत्यू

## दहा दिवसांत धामणगांव रेल्वे स्थानकात चौथी घटना

**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधी-** शहरातील सामाजिक कार्यकर्ते अनिल वहिले यांचा रेल्वेने कटून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे .नागपूर येथे काही कामानिमित्त गेले असता परत येताना त्यांचा रेल्वेतून पडून मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. रेल्वे पोलीस यांना सदर घटनेची माहिती सोमवारी मध्यरात्री एक वाजता दरम्यान मिळाली. त्यांनी सदरची माहिती लगेच दत्तापूर पोलिसांना दिली. माहिती मिळतात रेल्वे पोलीस व दत्तापूर पोलीस घटनास्थळी पोहोचले. मृत व्यक्तीच्या खिशात आधार कार्ड व वीज बिल मिळाल्याने त्यांची ओळख अनिल वहिले राहणार (पुष्करणा नगर, धामणगांव )अशी पटली. मृतदेहाचा पंचनामा करून मृतदेह ग्रामीण रुग्णालय धामणगाव रेल्वे येथे शवच्छेदनासाठी आणण्यात आले. माहिती मिळताच नातेवाईक व मित्रमंडळी तसेच परिचयातील नागरिक दवाखान्यांमध्ये पाहण्यासाठी त्यांनी धाव घेतली. रेल्वे सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश वाघमारे व त्यांची टीम तसेच दत्तापूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार गिरीश ताथोड,नवनाथ खेडकर,झटाले व इतर पोलीस कर्मचारी तसेच सुभाष कुचेरिया यांनी मृतदेह उचलून ग्रामीण रुग्णालय धामणगांव रेल्वे येथे शवच्छादनासाठी आणले .अनिल वहिले यांच्या मृत्यूने परिसरात व शहरात दुःखाचे वातावरण पसरले आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहे. गेल्या दहा दिवसात ही चौथी घटना धामणगाव रेल्वे स्थानकात घडली आहे.



# मायक्रो फायनान्स कंपनीच्या मॅनेजरला लुटणारी टोळी जेरबंद

## बँक कर्मचारीने दिलेल्या टीप वरून रचले षडयंत्र स्थानिक गुन्हे शाखाची यशस्वी कामगिरी



अमरावती/**प्रतिनिधी-** वरुड येथील क्रेडिट ?क्सेस मायक्रो फायनान्स कंपनीच्या बँक मॅनेजरच्या मोटर सायकल ला कट मारून त्यांना खाली पाडून १२ लाख ३९ हजार ६३९ रुपयाने भरलेली पैशाची बॅग हिसकविण्यात आली होती. या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखाच्या पथकाने यशस्वी कामगिरी करत लुटणाऱ्या टोळीला जेरबंद केले आहे. त्यांच्याकडून होंडा सिटी कार सह ५ लाख ६० हजार चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. शेख समीर उर्फ सोनू शेख शफी (२२),शेख साहिल उर्फ मोनू शेख शफी (२४), यश उर्फ आरू रवींद्र टेकाडे (२३), विशाल उर्फ वंश राजेश खत्री ( २१ सर्वे रा. नरखेड) ,तौसीफ खान शरीफ खान पठाण ( २३),तनिश उर्फ कृष्णा उर्फ गोट्या धनंजय पेदांम (२१, रामनगर, नागपूर) व एक अल्पवयीन (धरमपेठ, नागपूर) अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहे. कंपनीमध्ये कार्यरत कर्मचारी आरोपी तौसीफ खान शरीफ खानच्या टीप वरून ही लूट करण्यात आली. माहितीनुसार क्रेडिट फायनान्स कंपनीमध्ये कार्यरत मॅनेजर शुभम गुणवंतराव मस्के (२५,आमनेर,वरूड) आपल्या मित्र शालिग्राम धिकार यांच्यासोबत २५ जून रोजी दुपारी फायनान्स बँक वसुलीची रोख राशी १२ लाख ३९ हजार ६३९ रुपये काळ्या रंगाच्या एका बॅगमध्ये घेऊन मोटरसायकलने स्टेट बँक ऑफ इंडिया येथे जमा करण्याकरिता जात होते. त्यावेळी शिवाजी हायस्कूल समोर रोड वर पाठीमागून एका पल्सर मोटरसायकल वर आलेल्या तीन अज्ञात आरोपींनी त्यांच्या गाडीला कट मारली यामुळे शुभम मस्के खाली पडले. त्याच वेळी आरोपीं त्यांच्या जवळील पैशाची बॅग हिसकावून पळून गेले. या संदर्भात शुभम मस्के यांनी मोर्शी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्या आधारे स्थानिक गुन्हे शाखाच्या पथकाने विविध मार्गावरील सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिकी विश्लेषणच्या आधारे आरोपी शेख समीर उर्फ सोनू शेख शफी, शेख साहिल उर्फ मोनू शेख, यश उर्फ अरुण रवींद्र टेकाडे, विशाल उर्फ वंश राजेश खत्री (सर्व राहणार नरखेड) यांना विना क्रमांकाच्या काळ्या रंगाच्या बजाज पल्सर व एका पांढऱ्या रंगाच्या होंडा सिटी कार एमएच ०१ बीयु २३५२ ने हिवरखेड ते मोर्शी रोडवर मायवाडी फाट्या जवळून संशयास्पदरिते फिरताना ताब्यात घेतले. त्यांना विचारपूस केली असता ती चौघे मोर्शीचे मित्राला भेटायला जात आहे असे सांगत होते. पुन्हा संदर्भात त्यांना विचारपूस केली असता ते प्रथम उडवा उडवी चे उत्तर देत होते नंतर त्यांनी बॅग हिसकविण्याची कबुली दिली. आरोपी शेख समीर उर्फ सोनू याने सांगितले की तो एक वर्षापूर्वी क्रेडिट एक्सेस मायक्रो फायनान्स च्या मोर्शी ब्रांच मध्ये काम करत होता व आता बँकेमध्ये त्याचा मित्र आरोपी तौसिफ खान कार्यरत आहे. त्याच्याकडून माहिती घेऊन आरोपीने आपले भाऊ मोनू ,मित्र वंश ,आरु, तनिष व एका अल्पवयीन च्या मदतीने बँक मॅनेजर ला लुटण्याचे प्लॅन केले आणि त्यानुसार २५ जूनला दुपारी बारा वाजता बँकेजवळ पाळत ठेवून त्यांना लुटण्यात आले. बॅग इस्कॉन आरोपी सुसाट वेगाने मोर्शी बाहेर येईल थांबलेल्या होंडा सिटी वाहनाने नरखेड मार्गे नागपूर आले वन्सच्या फ्लॅटवर त्यांनी हिस्से वाटणी केली. त्यानुसार आरोपी सोनू, वंश, गोट्या व अल्पवयीनला प्रत्येकी ३ लाख रुपये घेतले व आरूला २० हजार रुपये देण्यात आले. तसेच आरोपी तौसीफ खान, तनिष उर्फ कृष्णा व अल्पवयीन ला नागपूर येथील हिलटॉप परिसरातून ताब्यात घेण्यात आले त्यांनी. त्यांच्याकडून एक लाख रोख, गुन्हात वापरलेली होंडा सिटी कार, बजाज पल्सर, चार मोबाईल असा एकूण ५ लाख ६० हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पुढील कार्यवाहीसाठी आरोपींना मोर्शी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

**यांनी केली कारवाई -** पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत ,उपविभागीय अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा प्रमुख पोलीस निरीक्षक किरण वानखेडे यांच्या नेतृत्वात सहायक निरीक्षक सचिन पवार, उपनिरीक्षक सागर हटवार, नितीन इंगोले, बलवंत दाभणे, गजेंद्र ठाकरे, रवींद्र बावणे, भूषण पेठे, पंकज फाटे, युवराज मानमोठे, रवींद्र वऱ्हाडे, स्वप्नील तंवर ,अजमत सय्यद, सुनील महात्मे ,निलेश डांगोरे, सुधीर बावणे, चेतन दुबे ,सागर नाठे, शांताराम सोनोंने,सायबर सेलचे सागर धापड, विकास अंजीकर, रितेश गोस्वामी, शिवा शिरसाट, प्रशिक वानखडे, निलेश अंबाडकर, प्रज्वल राऊत हर्षद घुसे यांनी कारवाई मध्ये सहभाग घेतला.

# महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेमध्ये पर्यावरणस्नेहींनी गाठला ५ लाखांचा टप्पा

## राज्यात ५ लाखांवर ग्राहकांना ६ कोटींचा आर्थिक फायदा

**अमरावती/प्रतिनिधी-** वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ 'इमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडणाऱ्या लघुदाब वर्गवारीतील ग्राहकांनी महावितरणच्या गो-ग्रीन योजनेमध्ये ५ लाखांचा टप्पा गाठला आहे. यामध्ये अमरावती परिमंडळाअंतर्गत अमरावती जिल्ह्यातील ८ हजार ४०० आणि यवतमाळ जिल्ह्यातील ५ हजार ५९३ ग्राहकाचा समावेश आहे. या योजनेत सोमवार (दि. ३०)पर्यंत सहभागी झालेल्या ५ लाख ३ हजार ७९५ वीजग्राहकांना ६ कोटी ४ लाख ५५ हजार रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

पर्यावरणाला हातभार लावण्यासाठी 'गो-ग्रीन' योजनेत सहभागी होण्याची ऑनलाइन सुविधा व योजनेची सविस्तर माहिती महावितरणच्या मोबाईल ॲप व वेबसाईट संकेतस्थळावर उपलब्ध आहे. वीजग्राहकांनी 'गो-ग्रीन' योजनेमध्ये सहभागी व्हावे व पर्यावरणपूरक योजनेत योगदान द्यावे असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले आहे.वार्षिक १२० रूपयांचा फायदा - महावितरणकडून पर्यावरणपूरक 'गो-ग्रीन' योजनेतून वीज बिलासाठी छापील कागदाचा वापर कमी करण्यावर भर देण्यात आला आहे. कागदी बिलाऐवजी फक्त 'इमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात १० रुपये सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे ग्राहकांचा वीजबिलामध्ये वार्षिक १२० रुपयांचा आर्थिक फायदा होत आहे. पर्यावरणस्नेही ५ लाख ग्राहकांचा प्रतिसाद - वीजग्राहकांसाठी ऐच्छिक असलेल्या गो-ग्रीन योजनेला राज्यात प्रतिसाद वाढत आहे. या योजनेत आतापर्यंत ५ लाख ३ हजार ७९५ पर्यावरणस्नेही वीजग्राहक सहभागी झाले आहेत. या ग्राहकांना ६ कोटी ४ लाख ५५ हजार ४०० रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे. यामध्ये (कंसात आर्थिक फायदा रूपयांत) पश्चिम महाराष्ट्रात सर्वाधिक २ लाख १ हजार २३३ (२.४२ कोटी), कोकण- १ लाख १३ हजार २५४ (१.३६ कोटी), उत्तर महाराष्ट्र- ७० हजार २२६ (८४.२७ लाख), विदर्भ- ६३ हजार ७३१ (७६.४७ लाख) तसेच मराठवाड्यामध्ये योजनेत सहभागी ५५ हजार ३५१ वीजग्राहकांना ६६ लाख ४२ हजार रूपयांचा वार्षिक फायदा होत आहे.गो-ग्रीन योजनेचे फायदे - महावितरणच्या संगणक प्रणालीमध्ये वीजबिल तयार झाल्यानंतर लगेचच संबंधित ग्राहकांना नोंदणीकृत 'इमेल'वर व मोबाईलवर 'एसएमएस'द्वारे दरमहा वीजबिल पाठविण्यात येत आहे. वीजबिलांच्या तारखेपासून सात दिवसांमध्ये रकमेचा तत्पर भरणा केल्यास एक टक्के सवलत दिली जाते. त्यासाठीही वीजबिल तात्काळ ऑनलाईनद्वारे भरणे सोयीचे झाले आहे. वीजग्राहकांना इमेलद्वारे प्राप्त झालेले दरमहा वीजबिल संगणकात सॉफ्ट कॉपीमध्ये जतन करून ठेवता येते.

# एएसआय अब्दुल कलाम हत्याचा तपास सौंपवा सीआयडीला



## कुटुंबीय धडकले पोलीस आयुक्तालयावर

अमरावती/**प्रतिनिधी-** वलगांव पोलीस ठाण्यामध्ये कार्यरत पोलीस उपनिरीक्षक अब्दुल कलाम अब्दुल कदिर यांची शनिवारी निर्मम हत्या करण्यात आली. या प्रकरणात पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे. तर दुसरीकडे या प्रकरणाची तपास सीआयडीला सोपविण्याची मांगणी एएसआय अब्दुल कलाम यांच्या कुटुंबीयांनी सोमवार ३० जून रोजी पोलीस आयुक्तांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की एएसआय अब्दुल कलाम यांची दिवसाढवळ्या घात लावून बसलेल्या आरोपींनी निर्मम हत्या केली. पूर्वनियोजित हा षडयंत्र होता.

या प्रकरणात आणखीन काही आरोपी सहभागी असल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. आरोपीमुळे त्यांच्या कुटुंबीयांना धोका निर्माण झालेला आहे म्हणून या प्रकरणाची तपास सीआयडी ला सोपविण्यात यावे. हा प्रकरण फास्टट्रॅक वोट मध्ये चालून सर्व आरोपींना लवकरात लवकर अटक करून शिक्षा द्यावी. आरोपींमुळे कलाम कुटुंबीयांना जीवेचा धोका निर्माण झालेला आहे आमच्या सुरक्षासाठी हा तपास सीआयडीला सोपवण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदन देताना डॉ. तहरीन फातेमा अ.कलाम, अ.समद, सय्यद रिजवान, शेख इसरार आलम, मेराज खान पठाण, नजीर खान बिके, शाहिद नवाल, अलीकदर रहमान, मेहलुल खान, नवेद ईकबाल, सय्यद मुजाहिद, सोहेल कुरेशी, शेख अबरार, जावेद भाई, अन्सार भाई, मोहसीन देशमुख, फाहिम खान, अ.सोहेल, अ.शाहिद, अ मतीन आदि उपस्थित होते.

# रक्षामंत्रालय मध्ये नोकरीच्या नावावर फसवणारे आरोपी मोकाट




## प्रहारने दिला आंदोलनाचा इशारा

अमरावती/**प्रतिनिधी-** रक्षा मंत्रामध्ये नोकरी लावून देण्याचे आम्ही दाखवून गोरगरीब उमेदवारांना कोट्यावधी ने फसवणाऱ्या माजी सैनिक व त्यांच्यासोबत असलेल्या संबंधितांवर कायदेशीर कार्यवाही करण्याच्या मागणीसाठी वेळोवेळी निवेदन देण्यात आले पण आरोपींविरुद्ध अजून पर्यंत कोणतीही कार्यवाही नाही झाले आरोपी मोकाट फिरत आहे. आरोपींना जर लवकरात लवकर अटक नाही झाली तर प्रहार जनशक्ती पार्टी द्वारा रस्त्यावर उतरण्याचा इशारा सोमवार ३० जून रोजी झालेल्या एका पत्रकार परिषद मध्ये देण्यात आलेला आहे. पदाधिकाऱ्यांनी सांगितले की नोकरीच्या नावावर गोरगरिबांना माजी सैनिक आणि इतरांनी फसविले या संदर्भात नागपूर विभाग ठाण्यात तक्रार देऊनही कोणती कारवाही नाही झाली शेवटी पोलीस आयुक्तांना स्मरणपत्र देण्यात आले त्यानंतर डीसीपी सागर पाटील यांनी आर्थिक गुन्हे शाखा यांच्याकडे निवेदन पाठवल्यावर बयान नोंदण्याची कारवाई सुरू करण्यात आली.

यानंतरही फसवणूक करणारा माजी सैनिक अद्यापपर्यंत मोकाट फिरत आहे. रक्षा मंत्रालयात नोकरी लावून देण्याच्या नावावर तसेच नोकरी लागली म्हणून नियुक्ती आदेश पत्र रक्षा मंत्रालय येथे इंजिनिअर ऑफ ची च्या नावाचा पत्र देऊन नोकरीवर रुजू होण्यासाठी अमरावती वरून उमेदवार पाठविण्यात आले. परंतु पुन्हा नागपूर या ठिकाणी जॉइनिंग ऑर्डर घेऊन गेल्यावर संबंधित विभागाने या उमेदवारांना कुठलीही नोकरी मिळाली नसल्याचे सांगून परत पाठवले. फसवणूक झाल्या ची माहिती मिळाल्यावर उमेदवारांनी प्रहार संघटनेचे जिल्हाध्यक्ष गौरव ठाकरे यांना लिखित तक्रार दिली. यासंदर्भात संपूर्ण कागदपत्र पुरावा सह आर्थिक गुन्हे शाखेचो अधिकाऱ्यांसवड देण्यात आले. उमेदवारांचे बयान नोंदण्याचे काम सुरू आहे संपूर्ण महाराष्ट्रात या प्रकारे उमेदवारांना गंडविले जात आहे.

या प्रकरणाला गांभीर्याने घेऊन माजी सैनिक व त्याचे सहकारी यांच्यावर ताडतडीने गुन्हा दाखल करून अटक करावे अन्यथा फसवणूक झालेल्या उमेदवारांसाठी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा प्रहारच्या वतीने देण्यात आलेला आहे. पत्रकार परिषद मध्ये जिल्हाध्यक्ष गौरव ठाकरे ,छोटू महाराज वसु , बंटी रामटेके, गोलू पाटील, कुणाल खंडारे, विशाल दंडगव्हाळ, शुभम झलके ,मधुकर घुले, विनय जायले आदि उपस्थित होते.

१ व १० वरिल उर्वरित

### आता सीमेवर असेल भारताचा

**हिंदी महासागरही येईल टप्प्यात -** एसबीएस-३ चा मुख्य उद्देश चीन आणि पाकिस्तानच्या अधिकांश भागांवर लक्ष ठेवणे असा आहे. याने हिंदी महासागरावरही लक्ष ठेवले जाईल. हे सर्व उपग्रह अंतराळात भारताचे डोळे म्हणून कार्यरत राहतील. तसेच मेसेज आणि फोटो पाठवत राहतील. यामुळे भारताची सुरक्षितता आणखी बळकट होईल.

### ठाकरे बंधू एकत्र आले तर

, असे चेन्नीथला यांनी म्हटले आहे.

दरम्यान, बैठकीत संघटना मजबूत करण्यावर आमची चर्चा झाली. पुढे काय केले पाहिजे, यावर मंथन झाले. यात सर्वांनी आपली मते मांडली. आगामी तीन महिन्यात पक्षाची वाटचाल कशी असेल, याबाबत काही गोष्टी ठरवण्यात आल्या आहेत. आघाडी कायम ठेवायची की नाही, याबाबत स्थानिक पातळीवर निर्णय घेण्यात येणार आहे. दिल्लीतील ही बैठक झाल्यानंतर आता महाराष्ट्रात जिल्हा, विभागवार पातळीवरील नेत्यांशी आम्ही चर्चा करणार आहोत, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली.

### औषधी बनवणाऱ्या कंपनीत

अधिकाऱ्यांनी सांगितले की, २० ते २६ लोक या घटनेत गंभीर जखमी झाले आहेत. काही जण ढिगाऱ्याखालीही दबले गेले आहेत. त्यामुळे वेगाने बचाव कार्य सुरू करण्यात आले आहे. मल्टी झोन २ चे आयजी सत्यनारायण यांनी सांगितले की, या घटनेत एकूण ८ लोकांचा मृत्यू झाला आहे. सहा मृतदेह घटनास्थळी आढळून आले आहेत. दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्याचबरोबर २६ जण जखमी आहेत.

**सिगाची स्फोट, काय घडलं?**

घटना ८.१५ ते ९.३५ या वेळेत घडली. याची माहिती मिळताच पोलीस २० मिनिटात घटनास्थळी दाखल झाले. ११ अग्निशामक दलाचे बंब आणि एनडीआरएफ, एसडीआरएफच्या जवानांनाही बोलवण्यात आले. दोन ते तीन जणांची प्रकृती चिंताजनक आहे.

स्फोट झाला त्यावेळी कंपनीत १५० लोक काम करत होते. स्फोट झालेल्या भागात ९० लोक काम करत होते, असेही आयजी व्ही. सत्यनारायण यांनी सांगितले.

### ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या

यावेळी त्यांचे पक्षात स्वागत करून त्यांना भावी सामाजिक आणि राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक्सवर एक पोस्ट करून दिली आहे.

पुण्यातील रिपब्लिकन चर्मकार महासंघाचे अध्यक्ष संजुभाऊ बनसोडे आणि त्यांची संपूर्ण कार्यकारिणी तसेच मंचर तालुक्यातील ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख आणि आदर्श सरपंच दत्ता गांजळे, ठाकरे गटाचे मंचर शहरप्रमुख विकास जाधव, सुवर्णा डोंगरे तसेच ग्रामपंचायतीतील सर्व सदस्यांनी शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला. उल्हासनगरमधील राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या माजी महिला अध्यक्ष व माजी उपमहापौर जया साधवानी आणि त्यांचे पती माजी नगरसेवक आणि राष्ट्रीय काँग्रेसचे कार्याध्यक्ष रमेश साधवानी यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

दरम्यान, अहिल्यानगर मनसेचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब माळी तसेच पारनेर आणि जामगावचे ठाकरे गट, मनसेचे पदाधिकारी, माजी नगरसेवक अनिल शेंडगे, माजी पंचायत समिती सभापती नंदा शेंडगे, माजी नगरसेवक अर्जुन शेट्टे, सोमनाथ खांदे, चैतन्य उद्योग समुहाचे अध्यक्ष गणेश पाटील, ठाकरे गटाचे माजी तालुकाप्रमुख डॉ. नितीन तोरडमल यांनीही शिवसेनेमध्ये प्रवेश केला, अशी माहिती देण्यात आली आहे.

### ७० वर्षांनी सोडणार पक्षाची

भाजपाने देशात ज्या पद्धतीने विकास केला आहे, राज्यात आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात विकासाचे वातावरण निर्माण केले आहे. प्रलंबित प्रश्नांना सोडवण्याचे काम सुरू आहे. आमच्या भागातील प्रश्न सोडवण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मोठा पुढाकार आहे. हे सर्व वातावरण पाहता आमच्या कार्यकर्त्यांमध्ये आणि स्थानिक सर्वसामान्य जनतेत भावना निर्माण झाली की, विकासाच्या प्रवाहात आपल्याला राहिले पाहिजे. उत्तर महाराष्ट्र आणि आपल्या भागाचा विकासाचा अनुशेष भरून काढला पाहिजे, असे कुणाल पाटील यांनी म्हटले आहे.

आम्हाला आमच्या पक्षाचा विस्तार करायचा आहे आणि हा विस्तार करत असताना विविध पक्षातून त्या पक्षाच्या नेतृत्वावर विश्वास नसल्यामुळे किंवा त्या पक्षात भवितव्य दिसत नसल्यामुळे काही लोक आमच्याकडे येत असतील, तर आम्ही त्यांचे निश्चित स्वागत करू, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. पत्रकारांशी बोलत असताना कुणाल पाटील यांच्या भाजपा प्रवेशाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारण्यात आला होता.

दरम्यान, कुणाल पाटील यांनी आत्मघातकी निर्णय घेऊ नये. त्यांचे आजोबा काँग्रेसकडून खासदार होते, त्यांचे वडील दीर्घकाळ मंत्रिमंडळात होते. हे टाकलेले जे कुंपण होते, ते काँग्रेसच्या विचारांकरिता होते. मात्र हे कुंपणच शेत खाताना दिसत आहे. ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. भाजपा स्वतःचे नेते निर्माण करू शकत नाही. भाजपा ही चेटकीण आहे, ही चेटकीण काँग्रेसच्या नेत्यांना खात आहे. त्यातील हे उदाहरण आहे.

# फायबर टॉयलेट व हायड्रोलिक ऑटो खरेदीच्या भ्रष्टाचाराची चौकशी करा

## -युवक कांग्रेसची मनपा आयुक्तांना मांगणी



**अमरावती/प्रतिनिधी-** फायबर टॉयलेट व हायड्रोलिक ॲपे ऑटो खरेदीच्या जुन्या प्रकरणातील भ्रष्टाचाराची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी सोमवार ३० जून रोजी मनपा आयुक्तांना दिलेल्या निवेदनात युवक कॉंग्रेसद्वारे करण्यात आली. निवेदनात म्हटले आहे की, सर्वप्रथम स्वच्छता अभियानासाठी आयुक्तांनी घेतलेली सकारात्मक पावले तसेच महानगरपालिकेतील विविध प्रकरणांमध्ये दाखवलेली पारदर्शकता आणि दक्षता याबद्दल युवक कॉंग्रेस पदाधिकाऱ्यांनी आयुक्त यांचे अभिनंदन केले. तसेच काही संवेदनशील प्रकरणांतील आर्थिक गैरव्यवहार उघडकीस आणण्यासाठी महापालिका आयुक्त विशेष लक्ष देत असून हा पुढाकार निश्चितच स्तुत्य आहे.

फायबर टॉयलेट खरेदी प्रकरणात मोठ्या प्रमाणावर अनियमितता व आर्थिक अपव्यय झाले आहे.सदर प्रकरणांमध्ये काही पोलीस चौकशाही पार पडलेल्या असून, काही नगरसेवक व अधिकाऱ्यांची चौकशी झाली आहे. तथापि, महानगरपालिकेच्या वतीने अद्यापही अधिकृत पोलीस तक्रार दाखल करण्यात आलेली नाही. म्हणूनच सदर प्रकरणांमध्ये तातडीने लक्ष घालून चौकशीसाठी योग्य ती स्वतंत्र समिती नेमावी. दोषींवर कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश द्यावेत, तक्रारी दाखल करून न्यायप्रक्रिया सुरू करण्यात यावी अशी मागणी युवक कॉंग्रेसद्वारे करण्यात आली. निवेदन सादर करतेवेळी जिल्हा कॉंग्रेस औद्योगिक सेलचे अध्यक्ष समीर जवंजाळ, अमरावती विधानसभा युकॉं अध्यक्ष वैभव देशमुख, प्रदेश सचिव योगेश बुंदेले, शहर एनएसयुआय अध्यक्ष संकेत साहू, आकाश धुराटकर, आकाश गेडाम, शुभम बांबल, सौरभ तायडे, धनंजय बोबडे, श्रेयस धर्माळे व इतर युवक कॉंग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.


**(Jt. C.J.J.D.) मा.सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर)**
**नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र.१४७/२०२५** ने.ता.२४.०७.२०२५

कुसुम--वि--निरंक

**अर्जदार :**
१. **कुसुम ज्ञानेश्वर पारसकर**
रा. वार्ड क्र.५,नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. **ममता तुकाराम भोजापुरे**
रा.उबंरडा,पो.इंझोरी, ता.मानोरा, जि.वाशिम
३. **गंगा योगेशराव घोडे**
रा.वार्ड क्र.१७, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
४. **सविता प्रमोद पुंड**
रा.कंझरा,ता.मुर्तिजापुर, जि.अकोला

**// वि // निरंक**

ज्याअर्थी **मयत सुखदेव गणपत पारसकर यांचा मृत्यू दि.२९.०८.२०१० तसेच शेवंताबाई सुखदेव पारसकर रोजी मुंडनिशांकराव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** येथे झाला आहे. अ.क्र.१ पत्नी, अ.क्र.२ ते ०४ मुली आहेत, अर्जदार हेच मयत यांचे कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **२३ जून २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला | वाशिम | बुलडाणा
■ मंगळवार, १ जुलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com

# सिक्युरिटी डिपॉझिट रक्कम तीन वर्षांहून अधिक काळ प्रलंबित

## अकोला महानगर पालिका कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे आयुक्तांना निवेदन

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

**महापालिकेकडे अनेक वर्षांपासून थकित असलेल्या सिक्युरिटी डिपॉझिटच्या रकमेबाबत तात्काळ निर्णय घेण्याची मागणी अकोला महानगरपालिकेच्या कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनतर्फे मनपा आयुक्तांना निवेदन देत सोमवारी करण्यात आली आहे. शासनाच्या नियमानुसार, ठेकेदारांच्या सिक्युरिटी डिपॉझिटची रक्कम तीन वर्षांच्या कालावधीनंतर संबंधितांना परत करण्यात यावी, असा स्पष्ट नियम आहे. मात्र, अकोला महानगरपालिकेकडून हा नियम धाब्यावर बसवण्यात येत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.**



असोसिएशनने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ऑडिट, अकाउंट व अन्य संबंधित विभागाकडून वेळेत डिपॉझिट रक्कम परत करण्यात येत नसल्याने ठेकेदारांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी कोणताही ठोस निर्णय घेतलेला नसल्यामुळे शासनाच्या निर्णयाचा स्पष्ट भंग केला जात आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, ठेकेदारांना तात्काळ डिपॉझिट रक्कम परत करण्यात यावी. संबंधित अधिकाऱ्यांनी जबाबदारी पार पाडली नसेल, तर त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी, प्रत्येक दिवसाच्या विलंबाबद्दल ठेकेदारांना व्याजासह नुकसान भरपाई दिली जावी, थर्ड पार्टी ऑडिट साठी जाणीवपूर्वक विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर प्रति दिवसाप्रमाणे दंड लावण्यात यावा, सदर रक्कम देण्यासाठी तात्काळ महासभेचा ठराव घेऊन कंत्राटदारांची प्रलंबित रक्कम रिलिज करण्यात यावी, विविध ठिकाणची कामे एकत्र करण्यात येऊ नये अशा मागण्या करण्यात आल्या आहे.

सदर निवेदन कंत्राटदार असोसिएशनचे अध्यक्ष उमेश मिरजामले, इरफान कासमानी, मो. शोएब राजा, सैय्यद अहमद, विसपुते, विजय कव्हळे, मो. जावेद कोटेवार, फरहान खान, संदीप गोखले, रमण पाटील, रवी काळे यांच्यासह पदाधिकारी, कंत्राटदार उपस्थित होते.

## सापळी ते सोंडा मार्गावर खड्डयांचे साम्राज्य
### जीव मुठीत धरून वाहनधारक करताहेत प्रवास



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

वाशिम तालूक्यातील सापळी ते सोंडा रोडवर खड्डे च खड्डे व ग्रामीण भागातील रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे.रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने मार्ग क्रमन करताना पावसाळ्याच्या दिवसात अपघाताच्या घटना घडत आहेत.त्यामुळे लोक प्रतिनिधींनी व प्रशासनाने अनसिंग शहराला जोडणाऱ्या सापळी ते सोंडा रस्त्याकडे लक्ष देऊन रस्त्याची डागडुजी करावी व रस्त्यावरील खड्डे तातडीने भरावी. अशी मागणी सर्व सामान्यांची व शाळकरी विद्यार्थ्यांकडून होत आहे.सापळी सोंडा दोन्ही गावातील सर्व सामान्य नागरिक तसेच दोन्ही गावातील शाळेतील विद्यार्थी व्यापारी सेत मजूर नोकरदार वर्ग अनसिंग या ठिकाणी दैनदीन कामासाठी येतात जातात.वाशिम तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेले अनसिंग शहर येथे प्रत्येकाला जावं लागते. वाशिल तालुक्यातील अनेक गावातील रस्त्याची दुरवस्था असल्याने सर्व सामान्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो.या रोजच्या त्रासामुळे

व असुरक्षित प्रवासामुळे प्रवासी विद्यार्थी त्रस्त झाले आहेत.एकीकडे केंद्र व राज्य सरकार हाइवे निर्माण करण्याकडे लक्ष करीत आहे.परंतु ग्रामीण भागातील रस्ते करण्यासाठी दुर्लक्ष करीत असून रस्त्याच्या दुरुस्ती कडेही दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे अनसिंग शहराला जोडणाऱ्या या गावाच्या रस्त्याची परिस्थिती विधारक झाली आहे. याकडे संबंधित प्रशासनाने लक्ष द्यावे. अशी मागणी नागरिकांकडून तसेच विद्यार्थ्यांकडून होत आहे.

## विठ्ठल भक्तांसाठी आनंदाची बातमी एस.टी. विभागाची खास सोय



### चला पंढरपूर, आता थेट आपल्याच गावातून

**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

तालुक्यातील विठ्ठल भक्तांसाठी एक आनंददायी बातमी, यंदा चंद्रभागेच्या तीरावर पंढरीनाथाचे दर्शन घेण्यासाठी थेट आपल्या गावातूनच एसटी बसची सोय करण्यात आली आहे.

दि. २९ जून रोजी एसटी आगारप्रमुख रवी मोरे साहेब, सर्वधर्म मित्र मंडळ अध्यक्ष श्याम सवाई आणि सास शोध-बचाव पथकाचे प्रमुख मोहम्मद मुन्नीवाले यांच्या संयुक्त चर्चेतून हा अभिनव उपक्रम साकार झाला. आता तुमच्या गावात ४५ विठ्ठल भक्त एकत्र जमले, की तुमच्या गावातून थेट पंढरपूरसाठी बस पाठवली जाईल. गावकऱ्यांनी आपली यादी कारंजा बसस्थानकात आगारप्रमुखांकडे सादर करावी, त्यानंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली गावातूनच पंढरपूरसाठी थेट बस उपलब्ध होणार आहे. या सेवेमध्ये जाण्याची व येण्याची दोन्ही व्यवस्था एसटीमार्फत केली जाणार आहे.ही सुविधा ग्रामीण भक्तांसाठी एक मोठं पाऊल आहे. विठ्ठलाच्या दर्शनासाठी जाणं हे ग्रामीण जनतेचं श्रद्धास्थान आहे आणि त्यामुळे ही योजना अत्यंत उपयुक्त ठरेल,' असे प्रतिपादन श्याम सवाई यांनी केले आहे.

## पत्रकारांविरोधातील अन्यायकारक तक्रारीचा एकता पत्रकार संघटनेचा निषेध!
### तालुका अध्यक्ष अशोक राऊत यांच्या नेतृत्वात पोलीस निरीक्षकांना निवेदन

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

पत्रकारांनी सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून स्थानिक स्वराज्य संस्थांतील गैरप्रकारांविरोधात लेखणी चालवली, तर त्याचा सूडबुद्धीने वापर करत पत्रकारांवर खोट्या तक्रारी दाखल केल्या जात असल्याच्या निषेधार्थ मंगरूळपीर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना एकता पत्रकार संघटनेच्या वतीने दिनांक ३० जून रोजी निषेध करून निवेदन सादर करण्यात आले.

तालुका अध्यक्ष अशोक राऊत यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले असून, यामध्ये दि. २८ जून २०२५ रोजी दाखल करण्यात आलेल्या एका



तक्रारीत, एका वृत्तपत्राचे प्रतिनिधी गौरव इंगळे व प्रतिनिधी प्रमोद भगत यांची नावे हेतुपुरस्सरपणे व अनावश्यकपणे आरोपी म्हणून नमूद करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे संबंधित दोन्ही पत्रकार घटनेच्या वेळी घटनास्थळी उपस्थित नव्हते, हे स्पष्ट असूनही त्यांची नावे टाकून पत्रकारितेचे गळचेपीचे षडयंत्र केल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

ग्रामपंचायत जांब विरोधात संबंधित पत्रकारांनी लोकशाही चौकटीत राहून वस्तुनिष्ठ वृत्तांकन केले होते. त्याचा राग मनात धरून सूडबुद्धीने सरपंच सुनीता खिराडे आणि त्यांचा पती अजय खिराडे यांनी हा प्रकार घडवीला आहे., असा ठपका निषेध निवेदनात ठेवण्यात आला आहे.

या निषेध निवेदनात संस्थापक अध्यक्ष विनोद डेरे, जिल्हाध्यक्ष संदीप कांबळे, उपाध्यक्ष महादेव हरणे, तालुका अध्यक्ष अशोक राऊत, पत्रकार गौरव इंगळे, प्रमोद भगत, राजेश वानखडे, मुद्दशीर सौदागर यांच्यासह एकता पत्रकार संघटनेचे अनेक पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पत्रकारांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरोधात तातडीने कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. अन्यथा अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

## संत गाडगेबाबा दिंडीने ढवळेश्वर संस्थान परिसरात विविध झाडांच्या बियांचे बीजारोपण



**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

वैराग्यमूर्ती राष्ट्रसंत श्री गाडगेबाबा यांच्या काळापासून अमरावती ते पंढरपूर पर्यंत जाणारी दिंडी गेल्या ६८ वर्षांपासून मालेगाव येथे येते, या दिंडीत स्वतः गाडगेबाबा, नंतर त्यांचे नातू वासुदेव सोनवणे, पणतू आणि आज गाडगेबाबा यांचे वंशज सतिष सोनवणे यांचा प्रत्यक्ष समावेश असतो. या दिंडीचे यथोचित स्वागत, सत्कार 'जेवणाची व्यवस्था जगदीश बळी यांच्या परिवाराकडून केली जाते.

'गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला' या भजनाच्या माध्यमातून समाजात सेवा, स्वच्छता, निसर्ग संवर्धन, शिक्षणाचा प्रसार आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश या दिंडीच्या वतीने दिला जातो. संत गाडगेबाबा यांच्या दिंडीच्या वतीने अमरावती ते पंढरपूर पर्यंत जातांनी गुरुकुंज मोझरी येथील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या फळे, फुले व विविध झाडांच्या बियांचे बीजारोपण रस्त्यांच्या बाजूने केले जाते.

## भरपावसात नाली सफाईचा धाडसी उपक्रम
### *सावरगावच्या दोन युवकांचे गावकऱ्यांकडून कौतुक*



**■ प्रतिनिधी | पातूर ■**

तालुक्यातील सावरगाव येथील दोन तरुणांनी भरपावसात नाली सफाई करून एक सामाजिक भान जपण्याचा आदर्श घालून दिला आहे. या कामाचे संपूर्ण गावातून जोरदार कौतुक होत असून, संबंधित फोटो सध्या सोशल मीडियावरही जोरदार व्हायरल होत आहेत.

सध्या सुरू असलेल्या दमदार पावसामुळे गावातील विहिरीच्या सांडपाण्याची नाली तुडुंब भरून वाहत होती. यामुळे नालीचे पाणी रस्त्यावर साचून दुर्गंधी पसरली होती. त्यामुळे ये-जा करणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता.

ही परिस्थिती लक्षात घेऊन सावरगाव येथील सुरेश सोळाके आणि भास्कर डवंगे यांनी कोणत्याही शासकीय मदतीची वाट न पाहता स्वतः पुढाकार घेत भरपावसात नाली स्वच्छ केली. या श्रमदानामुळे परिसरातील मच्छरांचा उपद्रव आणि दुर्गंधीपासून ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला. गाव स्वच्छ ठेवण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा,' असा सकारात्मक संदेशही या माध्यमातून या दोघांनी दिला. त्यांच्या या उपक्रमामुळे सावरगावचे गणेश पायघन, ज्ञानेश्वर नागलकर यांच्यासह अनेक ग्रामस्थांनी भरभरून कौतुक केले आहे.

## गुरुकुल शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात

**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

येथील कोळी कारंजा स्थित गुरुकुल विद्यालयामध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा नव्या शैक्षणिक क्षेत्राचे उत्साहाने स्वागत करण्यात आले . त्यानिमित्त एका छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कारंजा लाड विभागाचे गटशिक्षणाधिकारी श्रीकांतजी माने , गुरुकुल विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल राऊत , उपमुख्याध्यापिका मेघा राऊत , पंचायत समितीचे केंद्रीय विशेष शिक्षक अतुल गणवीर उपस्थित होते. प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यात शाळेचा प्रथम दिन हा अविस्मरणीय असतो. शाळेच्या पहिल्या दिवशी आपसुकच विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता असते आणि त्याचे औचित्य साधून शाळेच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवणाऱ्या नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

## जातिगत जनगणना एक होण्यासाठी बंजारा समाजाकडे चालत आलेली सुवर्णसंधी -पिठाधीश्वर आ.बाबूसिंग महाराज

**■ प्रतिनिधी | मानोरा ■**

तालुक्यातील तीर्थक्षेत्र पोहरादेवी येथे बंजारा पिठाधीश्वर विधान परिषद सदस्य आ. बाबुसिंग महाराज (राठोड) यांच्या नेतृत्वाखाली आज देशभरातील बंजारा समाज बांधवांची विशेष चिंतन बैठक गंभीर मंथन करून संपन्न झाली यावेळी महाराज परिवारातील अनेक सदस्य, राजकीय, अध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर तथा देश भरातून मोठ्या प्रमाणात आलेले समाज बांधव जमले होते.

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या महाराष्ट्र व देशभरात माघारलेला बंजारा समाज कोट्यावधीच्या संख्येत अधिवास करीत असून विविध



राज्यामध्ये एकात्मता असलेल्या या समाजाला विविध श्रेणीत सूचीबद्ध करण्यात आलेले असल्याने शासनाच्या मुख्य प्रवाहापासून विलग झालेला हा आदिम समुदाय केंद्र शासनाने घोषित केलेल्या जातिगत जनगणनेच्या माध्यमातून एका सुचित बांधला जावा यासाठी समाजातील प्रज्ञावंत व कायद्यातील जाणकारांनी अभ्यास करून समाजाच्या विकासासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन बैठकीचे आयोजक व अध्यक्ष आ. बाबुसिंग महाराज यांनी मार्गदर्शन करताना मत व्यक्त केले.

अखिल भारतीय बंजारा लमाण शक्तीपीठ संस्था पोहरादेवी द्वारा आयोजित या बैठकीची प्रस्तावना सदाशिव चव्हाण यांनी करताना स्वातंत्र्योत्तर या समाजाला शासनाकडून एका सूचित आणण्यासाठी प्रयत्न न केल्या गेल्यामुळे एक भाषा एक, संस्कृती व चालीरीती संपूर्ण देशभरात एकच असलेला बंजारा समाज आपल्या न्याय हक्कापासून वंचित राहिलेला असून संघ सरकारने घोषित केलेल्या जातिगत जनगणनेच्या माध्यमातून या समाजाची देशपातळीवर एकी अधोरेखित होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले.

राज्य व परराज्यातून मोठ्या संख्येत बंजारा, लमाण, लंबाडी आधी नामाभिमान धारण केलेले गोरबंजारा समाज बांधव तथा मोठ्या प्रमाणात समाजातील भगिनींनी सुद्धा या बैठकीत सहभाग नोंदविला.

माजी विधान परिषद सदस्य निलय नाईक, मोहिनीताई नाईक, सुनील महाराज, शेखर महाराज यांचे समायोचीत भाषण यावेळी झाले.

## अशोक बुद्ध विहार, 'गंधकुटी' राजगाव येथे सहविचार सभा



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

रविवार दि.२३ रोजी दुपारी १२.३० वा.समन्वयक आयु.दीपक ढोले यांनी आवाहन केल्यानुसार राजगाव-कनेरगाव नाका, पेनगंगेच्या किनाऱ्यावर वसलेल्या गंधकुटी या निरव शांत, पवित्र धम्मभुमीत पुज्य भंते प्रज्ञापाल थेरो, पुज्य भंते प्रज्ञाशिल व भंते प्रियदर्शी यांच्या मार्गदर्शन व प्रमुख उपस्थितीत राजगाव-सायखेडा गट ग्राम पंचायतचे सरपंच आयु.आत्मारामजी ढोले यांच्या अध्यक्षतेखाली येणाऱ्या वर्षावास व आषाढ पौर्णिमेचे निमित्त साधुन परिसरातील श्रद्धावान उपासक, धम्म अनुयायी,कार्यकर्त्यांच्या सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले. प्रथमतः आदर्शांचे पुजन, उपासकांच्या याचने नंतर,पुज्य भंते यांच्याकडुन त्रिशरण-पंचशिल ग्रहन करण्यात आले. वर्षावासात बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे पठण व दरपौर्णिमेस सकाळी खिरदान,पौर्णिमेचे महत्व, परित्राण पाठाचे आयोजन करण्याचे ठरले.

## 'मन की बात' चा १२३ वा भाग वाशिममध्ये १८ ठिकाणी यशस्वीरीत्या

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाचा १२३ वा भाग आज भारतीय जनता पार्टी वाशिम शहर च्या वतीने वाशिम शहरातील विविध १८ ठिकाणी अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. जनतेच्या मनाशी थेट संवाद साधणारा हा कार्यक्रम प्रत्येक ठिकाणी उत्साहात आणि जनसामान्यांच्या मोठ्या सहभागासह संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे आयोजन आमदार श्याम खोडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. विशेषतः त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात झालेल्या मुख्य कार्यक्रमाला अधिवक्ता अभय घुडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे संवाद अधिक प्रभावी आणि परिणामकारक ठरला.

'मन की बात' हा कार्यक्रम केवळ रेडिओवरील संवाद नसून तो भारताच्या जनतेशी

**'जनतेच्या मनाशी थेट संवाद साधणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद**



जोडलेली एक लोकशाही चळवळ आहे. त्यातून नागरिकांमध्ये देशप्रेम, सामाजिक सहभाग आणि सकारात्मक विचारसरणी यांची प्रेरणा मिळते.

या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी वाशिम शहरातील माजी नगरसेविका आम्रपाली अनिल ताजने, बोध क्रमांक २२७, माजी नगरसेविका करुणाताई कल्ले, बूथ क्रमांक २२०, डॉक्टर कविता खरात, बुथ क्रमांक २२८, माजी नगरसेवक बाळू मुरकुटे, बुथ क्रमांक २७२, गिरीश शर्मा बुथ क्रमांक २७३, शेखर बंठे बुथ क्रमांक २३४, कपिल सरडा बुथ क्रमांक २५६, सौ छाया मडके बुथ क्रमांक २३०, देवेन बागरीच्या बूथ क्रमांक २२९, गणेश खंडाळकर बुथ क्रमांक २५९, भिमकुमार जीवनानी बुथ क्रमांक २२९, स्वप्निल जाधव बुथ क्रमांक २४७, सौ रत्नमाला नप्ते बूथ क्रमांक २३५, प्रदीप देशमुख बुथ क्रमांक २५४, संगीता इंगोले बूथ क्रमांक २८० व इतर असे ऐकून १८ प्रत्येक बूथ प्रमुख, स्थानिक पदाधिकारी आणि समर्पित कार्यकर्त्यांचे योगदान महत्त्वाचे राहिले. भाजपा वाशिम शहराध्यक्ष मनीष मंत्री यांनी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले आणि पुढे असे कार्यक्रम अधिक व्यापक पातळीवर राबवण्याचा संकल्प व्यक्त केला. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' या पंतप्रधान मोदींच्या विचारधारेला बळ देणारा हा उपक्रम भविष्यातही समाजमनाशी नातं अधिक दृढ करेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक २१६ ■ मंगळवार, १ जुलै २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# आंजी (मो) वि.वि. कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे संचालक मंडळ बरखास्त

## अनियमितता भोवली, प्रशासक म्हणून कदम यांची नियुक्ती

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील एक मोठी सेवा सहकारी संस्था असलेल्या आंजी (मोठी) विशाल विविध सेवा सहकारी संस्थेचे संचालक मंडळ सहाय्यक निबंधकांनी बरखास्त केले असून प्रशासकरची नियुक्ती केली आहे. संस्थेच्या कारभारात प्रचंड गोंधळ व अनियमितता असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. या निर्णयामुळे अध्यक्ष इंद्रजीत बत्रा व उपाध्यक्ष रूपराव मोरे गटाला जबर हादरा बसाला आहे.

आंजी (मोठी) विशाल विविध कार्यकारी सेवा संस्थेचा कारभार मागील काही वर्षापासून एककल्ली सुरू होता. शेतक-यांच्या हिताचे निर्णय न घेता अध्यक्ष इंद्रजीत बत्रा, उपाध्यक्ष रूपराव मोरे व संचालकांनी मनमर्जीपणे कारभार चालविला होता. सन २०२२ मध्ये झालेल्या संस्थेच्या निवडणुकीत देखील मोठया प्रमाणात गोंधळ करण्यात आला होता. विरोधत असलेल्या शेतक-यांचे भागभांडवल कमी असल्याचे कारण देत त्यांना मतदार यादीतून वगळण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता.



या उलट इंद्रजीत बत्रा व त्यांच्या सहका-यांनी आपल्या मर्जीतील लोकांना संस्थेचे सभासद केले होते. यातील काही सदस्य असे होते की त्यांच्या शेत जमीन नसताना देखील त्यांना सदस्य करण्यात आले. या मतदारांच्या पाठिंब्यावर बत्रा व त्यांच्या सहका-यांनी निवडणूक जिंकल्याचा आरोप करण्यात आला होता. यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका देखील दाखल करण्यात आली आहे. अध्यक्ष इंद्रजीत बत्रा व संचालक मंडळाने बेदरकारपणे संस्थेचा कारभार सुरू केल्याने सभासदांनी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांच्याकडे तक्रारी केल्या होत्या. या तक्रारींच्या अनुषंगाने सहाय्यक निबंधकांनी चौकशीचे आदेश दिले होते. चौकशी दरम्यान संस्थेने अनेक गंभीर बाबी आढळून आल्या. संसथेची व पुरक व्यवसायाची आर्थिक पत्रके एकत्रित न करता वेगवेगळी तयार करण्यात आली होती. संस्थेच्या सभासदांकडून अल्पमुदती कर्ज स्वरूपात वसुल केलेली ५ लाख ७८ हजार ७६६ रूपयांची रक्कम जिल्हा सहकारी बँकेत जमा केली नसल्याचे निषन्न झाले. तसेच संस्थेची अनिष्ठ तफावत ३ कोटी ३ लाख ७४ हजार ८४५ रूपये असल्याचे दिसून आले. संस्थेचे बँके कर्ज घेणे देणे याचा कुठेचा ताळमेळ केला नव्हता. लेखा परिक्षण अहवालात त्रुटी बाबत संस्थेने कोणतेची पुर्तत केली नव्हती. संस्थेच्या संचालक मंडळाने कर्तव्यात कसूर ठेवल्याचा ठपका ठेवत सहाय्यक निबंधक सुचिता गुघाणे यांनी संचालक मंडळ बरखास्त करून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे प्राधिकृत अधिकारी एस एम कदम यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली.

### सेवा सहकारी संस्थेच्या कारभारात प्रचंड अनियमितता

आंजी मोठी विशाल विविध सहकारी सेवा संथेच्या कारभारत प्रचंड अनियमितता होती. संचालक मंडळाने मनमर्जीने कारभार सुरू केला होता. भाग भांडवल कमी च्या नावावर पात्र शेतक-यांना मतदानापासून वंचित ठेवत आपल्या नातेवाईकांना व मर्जीतील लोकांना मतदार केले होते. यासंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्याने वरिष्ठांकडे दाद मागण्यात आली होती. विभागाच्या चौकशीत देखील प्रचंड सावळागोंधळ असल्याचे दिसून आले आहे.

**-सुनिल गफाट,** माजी जिल्हाध्यक्ष भाजप

# राष्ट्रीय महामार्गावर दुसऱ्यांदा पडले भ्रष्ट्राचाराचे भगदाड

**-संबंधित अधिकाऱ्यावर तात्काळ कारवाई करा**

**-आज राष्ट्रवादीचे नांदगाव चौकात रस्ता रोको आंदोलन**

**हिंगणघाट जनमाध्यम :** येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर नांदगाव चौक येथे असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज उड्डाणपुलावर चार वर्षांत दुसऱ्यांदा मोठा खड्डा पडलेला आहे. रस्त्याच्या मधोमध पडलेला हा खड्डा अपघातास निमंत्रण देत आहे. त्यामुळे रस्ता बांधकाम करणाऱ्या कंत्राटदारावर तत्काळ कार्यवाही करावी, पडलेल्या भगदाडाची दुरुस्ती करुन संभाव्य मोठी दुर्घटना टाळावी, संबंधित अधिकाऱ्यावर तात्काळ कारवाई करा या करिता आज १ जुलै रोजी राष्ट्रवादीचा नांदगाव चौकात रस्ता रोको आंदोलन करण्यात येत आहे असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांनी आवाहन केले आहे.



शहरातील मध्यभागातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील नांदगाव चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज उड्डाणपुलाच्या बांधकामाला अवघे चार वर्षे झाली. पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले आहे. काश्मीर ते कन्याकुमारी अशा प्रचंड वाहतुकीच्या राष्ट्रीय महामार्गावरील पुलावर मोठा खड्डा पडलेला आहे. त्यामुळे भरधाव वाहतुकीस हा खड्डा अडथळा ठरत आहे. महामार्गाने येता व जाता वाहनधारकांना हा खड्डा चुकवताना मोठी कसरत करावी लागत आहे. रात्रीच्या सुमारास वाहनधारकांना खड्डा दिसत नसल्याने अपघात होण्याची भीती निर्माण झाली आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती ते सेंट जॉन कॉन्व्हेंटपर्यंत उड्डाणपूल मागील चार वर्षांपूर्वी निर्माण करून वाहतुकीसाठी सुरू केला. मात्र, त्यानंतर अनेकदा बंद करून वाहतूक वेगळ्या रस्त्याने वळवण्यात आली. अनेकदा पुलाची डागडुजीही करण्यात आली. आता तर मधोमध आरपार दिसणारे मोठे भगदाड पडले आहे. त्यामुळे तत्काळ दुरुस्ती करावी, व संबंधित शासकिय आधिकारी व कंत्राटदारावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांनी केली आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस श.प पक्षाचे शहर अध्यक्ष बालू वानखेडे, सुनिल डोंगरे, अमोल बोरकर, प्रशांत लोणकर,ज्ञानेश्वर पुंड, सुशील घोडे, मोहम्मद शाहिद, हुकेश ढोकपांडे आदी उपस्थित होते.

# न.प.च्या घनकचरा संकलन केंद्रात टाकली जातात मृत जनावरे

**हिंगणघाट जनमाध्यम :** शहरापासून दोन किलोमीटर अंतरावर नगरपालिकेच्या वतीने घनकचरा संकलन केंद्र आहे. येथे शहरातील जमा केलेला सर्वच ओला आणि सुका कचरा संकलन केला जातो परंतु येथे शहरातील मृत



झालेले जनावरे उघड्यावर टाकून देत आहे .त्याची दुर्गंध सुटल्याने. संकलन केंद्रा जवळ असलेल्या सुरेश ढोकपांडे या शेतकऱ्याने पंधरा दिवस अगोदर नगरपालिकेला सदर्भात तक्रार दाखल केली तसेच आमदार समीर कुणावार यांना सुद्धा माहिती देऊन अर्ज सादर केला. आमदाराच्या आदेशाची नगरपालिकेच्या मुख्य अधिकाऱ्याने केराची टोपली समजून ही तक्रार कचरापेटीत टाकली असल्याची तक्रार शेतकरी सुरेश ढोकपांडे यांनी सदर प्रतिनिधी कडे केली आहे.

# जन आक्रोश समितीची पोलिसात तक्रार

## कंत्राटदार मडावीवर फौजदारी गुन्हा दाखल करा



**आर्वी जनमाध्यम :** तळेगाव (शा.पं.) राष्ट्रीय महामार्गाचे काम करताना टाकलेली गिट्टी समतल करुन त्यावर कोट तर टाकलाच नाही शिवाय बॅरिकेट सुद्धा लावले नाहीत. परिणामी वाहतुकीकरिता अडथळा निर्माण झाल्याने अपघात होऊन वाहनधारकाची जीवीत हाणी होण्याची शयता असल्याने कंत्राटदार दीपक मडावी याला जबाबदार धरुन त्याचेवर फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात यावी अशी मागणी आर्वीकर जन आक्रोश समितीने ठाणेदार सतिश डेहणकर यांच्याकडे सोमवार ३० जून रोजी तक्रार दाखल करुन केली आहे.

शहराच्या मध्यभागातुन जात असलेल्या आर्वी-तळेगाव (शा.पं.) महामार्गाचे बांधकाम कंत्राटदार दीपक मडावी हे करीत आहे. नगर परिषद कार्यालय ते बसस्थानकापर्यंत एका बाजूने रस्त्याचे सिमेंटीकरण केले. तो दोन पदरी मार्ग असला तरी झाडाच्या अडथळयामुळे एका पदरावरुनच दुतर्फा वाहतूक सुरू आहे. तर, दुसऱ्या बाजूने कंत्राटदाराने समांतर रस्ता खोदुन ठेवलेला आहे. पुढे रस्त्यावर पंधरा दिवसापासुन टाकलेल्या गिट्टीच्या ढिगाऱ्यांना समतल केले नाही. वाहतुकीकरिता मोकळा केलेल्या सिमेंट रस्त्याच्या समांतर हा खड्डा केलेला रस्ता आहे. त्याची खोली एक ते दीड फुटांची आहे. शिवाय गिट्टीचे ढिगारे सुद्धा आहे. कंत्राटदाराला गिट्टीचे ढिगारे समतल करुन त्यावर एक कोट करण्याची सुचना करावी तसेच बेजबाबदारपणे नागरिकांना त्रस्त केल्याबाबत फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. निवेदन देताना समितीचे सदस्य दशरथ जाधव, पंकज गोडबोले, नितीन आष्टीकर, मनिष उभाड, मिथुन कोरडे, बाळा नांदुरकर, विनय डोळे, गौतम कुंभारे, मनोज आगरकर आदींचा समावेश होता.

# कृषी केंद्र व्यावसायिकांचा बंद, शेतकऱ्यांची तारांबळ

## विनापरवाना अवैध कृषी निविष्ठा विक्री करणाऱ्यांचा विरोध

**वर्धा जनमाध्यम :** विनापरवाना अवैध बी, बियाणे, कीटकनाशक थेट शेतकऱ्यांच्या बांधावर विक्री होत आहे. त्यामुळे बी-बियाणे, खतांमुळे शेतकऱ्यांचेही मोठे नुकसान होत आहे. हे बियाणे शेतकऱ्यांना कमी दरात मिळत असल्याने तसेच कंपन्यांकडून वेगवेगळ्या आमीषाला बळी पडत असल्यामुळे बोगस बियाणे व खतांची जिल्ह्यात जोरात विक्री सुरू आहे. यावर जिल्हा प्रशासनाचे सातत्याने दुर्लक्ष होत असून शेतकऱ्यांचीही मोठी फसवणूक होत आहे. दरम्यान, या विनापरवाना कंपन्यांचे एजन्ट गावागावात पोहोचून बियाणे व खतांची विक्री करीत असल्याने परवानाधारक कृषी केंद्रांचेही मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे या प्रकाराच्या विरोधात जिल्ह्यातील परवानाधारक कृषी केंद्र संचालकांनी आज सोमवार ३० जून रोजी एक दिवसाचा संप पुकारत बोगस बी, बियाने, खतं, कीटकनाशकं विक्रेत्यांवर कारवाई करण्यात यावी, या मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. संपामुळे शेतकऱ्यांची तारांबळ उडाली आहे.



राज्यात एचटीबीटी कपाशी बियाण्याला प्रतिबंध घालण्यात आले आहे. असे असताना सुद्धा जिल्ह्यात बियाण्यांची अवैध विक्री केली जात आहे. आंध्रप्रदेश, गुजरात, तेलंगणा राज्यातून बियाणे व खतांची आयात करून एजन्ट मार्फत जिल्ह्यात वितरित केली जाते. शेतकऱ्यांना वेगवेगळे आमीष दाखवून तसेच कमी दरात मिळत असल्याने शेतकरीही या प्रलोभनाला बळी पडतात. खरेदीचे कुठलेही बील दिले जात नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना पीक विमा व नुकसान भरपाई सुद्धा मिळत नाही. बियाणे बोगस असल्यामुळे पिकांवर तणनाशक फवारताच पीक करपून जातात. मात्र, याबाबतची तक्रारही होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना अनेकदा नुकसान सहन करावे लागत आहे, संबंधित विक्रेते शेतक-यांना घरपोच हे आणून देतात. या प्रकाराला आळा घालण्यासाठी ठोस पाऊल शासन व प्रशासन स्तरावरून उचलण्यात यावे अशी मागणी या आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात आली.

### कृषी बाजारपेठेत शुकशुकाट

कृषी केंद्र व्यावसायिकांच्या एक दिवशीय संपामुळे जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या वर्धा शहरातील कृषी बाजारपेठेत शुकशुकाट होती. इतकेच नव्हे तर लाखो रुपयांच्या उलाढालीला ब्रेकच लागला होता. तर बियाणे, खत, फवारणीचे औषध खरेदीसाठी आलेल्या शेतक-यांना आल्या पावली परत जावे लागले.

### जिल्हा कचेरी समोर घोषणाबाजी

वर्धा जिल्हा कृषी व्यवसायी संघाच्या नेतृत्वात सोमवारी जिल्ह्यातील कृषी केंद्र व्यावसायिकांनी एक दिवसीय संप आंदोलन केले. या आंदोलनादरम्यान आंदोलनकर्त्या कृषी केंद्र व्यावसायिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर येत घोषणाबाजी केली. त्यानंतर विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांना सादर करण्यात आले. आंदोलनाचे नेतृत्व कृषी व्यावसायिक संघाचे अध्यक्ष रवी शेंडे, मनोज भुतडा, उमेश मुंदडा, श्री चांडक, एकनाथ चांडक, विनोद भुतडा,नरेंद्र पाटील, जयकरण शुक्ला, धर्मेंद्र राठी यांनी केले.

# खाजगी रुग्णालयातील परिचारिकेवर जीवघेणा हल्ला

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील विठ्ठल मंदिर रोड वरील एका खाजगी नेत्र रुग्णालयात काम करणाऱ्या परिचारिकेवर सायंकाळच्या सुमारास एका युवकाने जीवघेणा हल्ला केला.यात तरुणी गंभीर जखमी झाली असल्याची घटना सोमवारी घडली.

शहरातील एका नेत्र खाजगी रुग्णालयात परिचारिका म्हणून काम करीत होती.तिला भेटण्यासाठी एक युवक रुग्णालयात आला होता.परिचारिका व युवक दोघेही एकमेकांसोबत बोलत असताना, युवकाने जवळ असलेले शस्त्र बाहेर काढले आणि परिचारिकेवर



जीवघेणा हल्ला चढविला. सुदैवाने तरुणीने जीवाच्या आकांताने आरडाओरडा करीत पळ काढल्याने जीव वाचला दरम्यान हल्लेखोराला नागरिकांनी पकडून चोप देत रामनगर पोलिसांच्या स्वाधीन केले मात्र प्रकरण शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याने रामनगर पोलिसांनी शहर पोलिसांच्या ताब्यात दिले, रुग्णालय परिसरात नागरिकांची गर्दी असल्याने, एका तरुणाला तरुणीवर हल्ला होत असल्याचे दिसतात त्याने युवकाला अडविण्याचा प्रयत्न केला त्याने त्या ठिकाणाहून पळ काढला. तात्काळ जखमी अवस्थेत असलेल्या परिचरिकेला जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करीत उपचार करण्यात आले आणि पुढील उपचारार्थ सावंगी मेघे रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात घटनेची उशिरापर्यंत युवकावर गुन्हा दाखल करण्यात येणार अशी माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहेत.

# अंदोरीत शाश्वत शेतीचा आदर्श प्रमोद देहारे यांच्या शेतावर शेतकरी

## -शास्त्रज्ञ मंचाची प्रेरणादायी २९ वी सभा

**वर्धा जनमाध्यम :** शेतीमध्ये नवनवीन तंत्रज्ञान आणि प्रयोगांच्या माध्यमातून शाश्वत शेतीची निर्मिती करणारे देवळी तालुक्यातील अंदोरी येथील आदर्श शेतकरी प्रमोद देहारे यांच्या शेतावर डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र, सेलसुरा स्थापित शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाच्या २९ व्या सभेचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी शास्त्रज्ञ आणि शेतकऱ्यांनी एकत्र येऊन केळी व पपई पिकाची सखोल पाहणी केली. प्रमोद देहारे यांनी आपल्या शेतात ऑगस्ट २०२४ मध्ये केळीच्या टिशू कल्चर जी-९ वाणाची लागवड केली आहे. त्यांनी पिकाचे नियोजन करताना वाफे तयार करणे, ठिबक सिंचनाद्वारे अन्नद्रव्ये व खत व्यवस्थापन यांसारख्या शास्त्रोक्त पद्धतींचा अवलंब कसा केला, याविषयी उपस्थित शेतकऱ्यांना सविस्तर माहिती दिली. त्यांच्या नियोजनामुळे त्यांना यावर्षी सरासरी ३५ ते ४५ किलोपर्यंत केळीचे घड मिळत असून, हे इतर शेतकऱ्यांसाठी एक आदर्श ठरले आहे. यावेळी, कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. जीवन कतोरे यांनी केळीच्या बागेचे शास्त्रोक्त पद्धतीने नियोजन करण्यावर भर दिला. बागा चांगल्या स्थितीत ठेवण्यासाठी काय काळजी घ्यावी, याबाबत मार्गदर्शन करताना, त्यांनी केळीला विषाणूजन्य रोगांपासून, विशेषतः मोझॅक रोगापासून असलेल्या धोक्यावर प्रकाश टाकला. मोझॅक रोगाच्या प्रादुर्भावामुळे संपूर्ण बाग उपटून टाकावी लागू शकते, त्यामुळे केळीसाठी निरोगी बागेतील कंदाची निवड करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे मार्गदर्शन त्यांनी केले.

शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाचे अध्यक्ष दिलीप पोहणे यांनी अतिघन लागवड कपाशीसाठी योग्य जमिनीची निवड, अन्नद्रव्य व्यवस्थापन आणि सघन पद्धतीत झाडांची संख्या अधिक असल्याने कोरडवाहू कापूस उत्पादनात अधिक वाढ कशी होऊ शकते, तसेच शेतकरी अधिक उत्पन्न कसे मिळवू शकतात, याविषयी माहिती दिली.

सभेमध्ये विविध कृषी तज्ञांनी शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. डॉ. रुपेश झाडोदे यांनी खरीप हंगामातील पिकांच्या नियोजनाविषयी, तर डॉ. निलेश वझीरे यांनी पिकातील कीड व रोग नियंत्रणाविषयी मार्गदर्शन केले. टोकन यंत्र आणि बीबीएफ पद्धतीबद्दल डॉ. सविता पवार यांनी माहिती दिली. कुक्कुटपालन व्यवसायाविषयी डॉ. सचिन मुळे यांनी, तर कृषी उत्पादन प्रक्रिया तंत्रज्ञानाविषयी डॉ. प्रेरणा धुमाळ यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी हळद लागवड आणि काढणी पश्चात तंत्रज्ञान यांसारख्या विषयांवर शेतकरी व शास्त्रज्ञ यांच्यात सखोल चर्चा झाली.

# प्रधानमंत्री पिक विमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन

**वर्धा जनमाध्यम :** खरीप हंगाम सन २०२५-२६ या वर्षाकरीता उत्पादनावर आधारित सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना जिल्हयात राबविण्यात येत आहे. खरीप हंगाम २०२५ व रब्बी हंगाम २०२५-२६ या एक वर्षासाठी अधिसुचित क्षेत्रातील अधिसुचित पिकासाठी विमा क्षेत्र घटक धरुन राबविण्यात येत आहे.या योजनेत कर्जदार व बिगर कर्जदार शेतक-यांनी ३१ जुलै पर्यंत विमा हप्ता भरुन सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केले आहे.

सदरची योजना ही अधिसुचित केलेल्या पिकांसाठी केवळ अधिसुचित क्षेत्रासाठी लागू असेल. कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतक-यांसाठी ऐच्छिक असणार आहे. अधिसुचित क्षेत्रातील अधिसुचित पिकांसाठी खातेदारांचे व्यातिरिक्त कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरीया योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. मात्र भाडेपट्टीने शेतकरणा-यास नोंदणीकृत भाडेकरार पीक विमा संकेतस्थळावर अपलोड करणे बंधनकारक आहे. पिक विमा काढतांना शेतक-यांना रब्बीसाठी १.५ टक्के, खरीप हंगामासाठी २ टक्के तर खरीप आणि रब्बी हंगामातील पिकासाठी ५ टक्के असा मर्यादित ठेवण्यात आला आहे. खरीप २०२५-२६ मध्ये योजनेत सहभागी होण्यासाठी ?ग्रिस्टॅक अंतर्गत शेतकरी ओळखपत्र क्रमांक असणे बंधनकारक आहे. शेतक-यांना पीक नुकसान भरपाईसाठी ई पीक पाहाणी अंतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक आहे.

जिल्हयात भारतीय कृषि विमा कंपनी मुंबई यांच्याकडून राबविण्यात येत आहे आहे. योजनेंतर्गत खरीप व रब्बी हंगामाकरीता पिक पेरणीपासुन काढणी पर्यंतच्या कालावधीत विविध नैसर्गिक आपत्ती किंवा पीक उत्पादनावर विपरीत परिणाम करणा-या इतर बाबीमुळे शेवटी, पीक कापणी प्रयोग आधारे, तांत्रिक उत्पादन आधारे, सदर महसुल मंडळामध्ये पिकाच्या उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत येणारी घट धरुन नुकसान भरपाई देय असणार आहे.

कापूस पिकासाठी विमा संरक्षण ६० हजार रुपये विमा हप्ता ९०० रुपये, सोयाबिन विमा संरक्षण ५७ हजार ५०० रुपये विमा हप्ता ८६२ रुपये ५० पैसे, तूर विमा संरक्षण ४४ हजार रुपये विमा हप्ता ४४० रुपये, भुईमुंग पिकासाठी विमा संरक्षण ४२ हजार रुपये विमा हप्ता १०५ रुपये, मुग व उडिद विमा संरक्षण २३ हजार रुपये विमा हप्ता ५७ रुपये ५० पैसे, ज्वारी पिकासाठी विमा सरंक्षति रक्कम ३० हजार रुपये तर विमा हप्ता ७५ रुपये, शेतक-याला भरावा लागणार आहे.

कर्जदार शेतक-यांना योजनेत सहभागी होण्याचा, न होण्याचा पर्याय उलब्ध आहे. शेतकरी योजनेत सहभाग नोंदविण्यास इच्छुक नसेल तर तसे घोषणापत्र योजनेतील सहभागी होण्याच्या अंतिम मुदतीच्या ७ दिवस अगोदर देणे आवश्यक आहे.

योजनेत सहभागी होण्याच्या मुदतीच्या ७ दिवस अगोदर घोषणापत्र प्राप्त न झाल्यास कर्जदार शेतक-यांना पुढील हंगामाकरीता योजनेच्या सहभागातून वगळण्यात येईल. विमा योजनेत विमा घेतलेले पिक व ई पिक पाहणीमध्ये नोंदविलेले पिक यामध्ये तफावतचा मुद्द उद्भवल्यास ई पिक पाहणीमध्ये नोंदविलेले पिक अंतिम गृहीत धरण्यात येईल तसेच ई पिक पाहणी व प्रत्यक्ष पेरलेले पिक यामध्ये विसंगती आढळून आल्यास विमा अर्ज कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभाग नोंदविण्यासाठी शेतक-यांनी तात्काळ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, उपविभागीय कृषि अधिकारी, संबधित तालुका कृषि अधिकारी तसेच जवळच्या बँकेशी किंवा ग्राहक सेवा केंद्राशी संपर्क साधावा, असे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शंकर तोटावार यांनी कळविले आहे.


### जाहिर नोटिस

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार सुभाष शामरावजी होरे यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणे: मौजा देवळी, मौजा नं. ७२, प. ह. नं. २१ ता. देवळी जि. वर्धा येथील नगर परिषद च्या हद्दीतील शेत सर्वे कं. ६७/१ मधील प्लॉट कं. २० ज्याची एकूण आराजी १८०.०० चौ. मी म्हणजेच १९३६.८० चौ. फुट इतकी असुन त्याची

**चतुःर्सिमा :-**
पुर्वेसः ९ मिटर रूंदीचा लेआऊट रोड,
पश्चिमेसः प्लॉट कं. ११ व १४,
उत्तरेसः प्लॉट कं. २१,
दक्षिणेसः प्लॉट कं. १९,

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. २६,००,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेस्ती दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून तीन दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**ॲड. सचिन एस. कुरझडकर**
**साई नगर वर्धा**
**मो. नं. ९८६००४१३६१**



# ५७ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या सादर




## अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सत्ताधारी- विरोधकांचे आंदोलन

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभेचे पावसाळी अधिवेशन आजपासून (३० जून) सुरूवात झाली आहे. या अधिवेशनात १२ विधेयके मांडली जाणार आहे. मात्र त्याचपूर्वी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी शिवसेना शिंदे गटाने उद्धव ठाकरेंच्या विरोधात आंदोलन सुरु केले आहे. विधान भवनाच्या पाय-यांवर शिंदे गटाचे नेते आणि मंत्री ठाकरे गटाविरोधात आंदोलन करत आहेत. त्याचबरोबर विरोधकांनीही विधानसभेच्या पाय-यांवर आंदोलन सुरु केले आहे. उद्धव ठाकरे यांनी जाहीर सभेत कम ऑन किल मी म्हटले होते. त्याच्या खिल्ली उडवत शिंदेंचे आमदार उद्धव ठाकरेंच्या विरोधात घोषणा देत होत. शिवसेनेच्या ५९ व्या स्थापनादिनाच्या दिवशी शिवसेना युबीटी प्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजप आणि एकनाथ शिंदे यांना आव्हान दिले होते की, कम ऑन किल मी,असं म्हटलं होते. यावर शिंदे यांनी तर उद्धव यांना लक्ष्य करत म्हटले आहे की, मेलेल्या माणसाला मारण्याची काय गरज आहे असा हल्लाबोल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर केला होता. या टिकेनंतर शिवसेना शिंदे गटाने उद्धव ठाकरेंच्या विरोधात आंदोलन सुरु केले आहे. विधान भवनाच्या पाय-यांवर शिंदे गटाचे नेते आणि मंत्री ठाकरे गटाविरोधात आंदोलन करत आहेत. त्याचबरोबर विरोधकांनीही विधानसभेच्या पाय-यांवर आंदोलन सुरु केले आहे. तसेच या पावसाळी अधिवेशनात महाराष्ट्रातील शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंत हिंदी भाषेचा अभ्यास सुरू करण्यास वाढत्या विरोधाला तोंड देत, राज्य मंत्रिमंडळाने रविवारी त्रिभाषा धोरणाच्या अंमलबजावणीबाबतचे दोन जीआर (सरकारी आदेश) मागे घेण्याचा निर्णय घेतला. राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुंबईत पत्रकार परिषदेत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जीआर मागे घेण्यात आले आहेत.

## नवे मुख्य सचिव राजेश कुमार यांनी पदभार स्वीकारला

**मुंबई/प्रतिनिधी :**शासनाने राज्याच्या मुख्य सचिव पदी महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार यांची नियुक्ती केली आहे. मंत्रालयातील मुख्य सचिवांच्या



दालनात मावळत्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्याकडून त्यांनी ४९ वे मुख्य सचिव म्हणून पदभार स्वीकारला. राज्य शासनाच्या सर्व विभागांच्या योजनांना अधिक गती देउन सर्वसामान्यांना आपल्या कामांसाठी मंत्रालयापर्यंत येण्याची आवश्यकता भासू नये यासाठी काम करणार असल्याचे मुख्य सचिव राजेश कुमार यांनी यावेळी सांगितले. मुख्य सचिव राजेश कुमार (भा.प्र.से. १९८८) यांचा जन्म ३ ऑगस्ट १९६५ रोजी झाला. २५ ऑगस्ट १९८८ रोजी ते भारतीय प्रशासकीय सेवेत रुजू झाले. मूळचे राजस्थानमधील सवाई माधोपूर येथील असलेल्या राजेश कुमार यांनी इतिहास या विषयात पदव्युत्तर पदवी मिळविलेली आहे. राजेशकुमार यांनी यापूर्वी सोलापूर येथे अधिसंख्य सहायक जिल्हाधिकारी पदापासून २४ जुलै १९८९ रोजी आपल्या कारकीर्दीस सुरूवात केली. त्यानंतर सातारा येथे सहायक जिल्हाधिकारी, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अमरावती येथे आदिवासी विकास अपर आयुक्त, धाराशीव जिल्हाधिकारी, जळगाव जिल्हाधिकारी, सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त, केंद्रीय ग्रामविकास राज्यमंत्री यांचे खासगी सचिव, नाशिक येथे आदिवासी विकास आयुक्त, नवी मुंबई येथे एकात्मिक बालविकास आयुक्त, मंत्रालयात पाणीपुरवठा विभागाचे प्रधान सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभागाचे अपर मुख्य सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे अपर मुख्य सचिव तसेच महसूल व वन विभागाचे अपर मुख्य सचिव आदी महत्त्वपूर्ण पदांवर त्यांनी काम केले आहे.

## वंदे मातरम् व राज्यगीताने विधान परिषदेच्या कामकाजास सुरुवात

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य विधिमंडळाच्या सन २०२५ पावसाळी अधिवेशनाच्या कामकाजास विधानपरिषदेत वंदे मातरम आणि राज्यगीताने सुरुवात झाली. विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपसभापती डॉ.नीलम गो-हे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह मंत्री आणि विधानपरिषदेचे सदस्य यावेळी उपस्थित होते.यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी नवीन मंत्री भुजबळ यांचा सभागृहाला परिचय करून दिला.

## वि.परिषद तालिका सभापतींची नियुक्ती

**मुंबई/प्रतिनिधी :** विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात झाली असून विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी कामकाजासाठी तालिका सभापतींची नियुक्ती जाहीर केली. सभापती प्रा.शिंदे यांनी तालिका सभापती म्हणून सदस्य सर्वश्री अमित गोरखे, इद्रिस नायकवडी, कृपाल तुमाने, सुनील शिंदे आणि प्रज्ञा सातव यांची नियुक्ती करण्यात आल्याचे जाहीर केले.

## विधान परिषदेमध्ये दिवंगत माजी सदस्यांना श्रद्धांजली

**मुंबई/प्रतिनिधी :** विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ जयंत नारळीकर, विधान परिषद सदस्य अरुण काका भिमराव जगताप आणि रामदास भगवानजी आंबटकर यांच्या निधनाबाबत सभापती प्रा.राम शिंदे यांनी शोकप्रस्ताव मांडला.सभापती प्रा.शिंदे यांनी शोकप्रस्तावात जयंत नारळीकर यांच्या कार्याचा विशेष उल्लेख केला. कोल्हापूर येथे जन्मलेले नारळीकर हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे खगोलशास्त्रज्ञ होते. त्यांनी केम्ब्रिज विद्यापीठातून पीएच.डी. प्राप्त केल्यानंतर टाटा मूलभूत संशोधन संस्थेत विभागप्रमुख म्हणून १६ वर्षे कार्य करत संस्थेला जागतिक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. नंतर पुण्यात इंटर युनिव्हर्सिटीज सेंटर फार एस्ट्रोन मी अँड अस्ट्रोफिजिक्सची स्थापना करून संशोधन क्षेत्रात मोलाची भर घातली. पद्मभूषण, पद्मविभूषण, महाराष्ट्र भूषण यांसारखे अनेक राष्ट्रीय पुरस्कार त्यांना प्राप्त झाले. विज्ञानाचा सामान्यांशी संबंध जोडण्याचा त्यांचा प्रयत्न विशेषत्वाने उल्लेखनीय होता. त्यांच्या विज्ञानकथांच्या माध्यमातून त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्याचे कार्य केले.सभापती प्रा.शिंदे यांनी अरुणकाका जगताप यांचे सामाजिक योगदानही अधोरेखित केले. अहिल्यानगर जिल्ह्यातील भेंडी गावचे रहिवासी असलेले जगताप यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांपासून विधान परिषदेमध्ये दोन वेळा निवडून येईपर्यंतचा राजकीय प्रवास केला. समाजकार्य, शिक्षण संस्था, क्रीडा संघटना यामधून त्यांचा जनतेशी घनिष्ठ संबंध राहिला. त्यांच्या निधनामुळे स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये आप्तस्वकीय हरपल्याची भावना आहे, असे सभापती म्हणाले.ड?. रामदास आंबटकर यांचा जीवनप्रवास आणि कार्यकर्तृत्वाचा आढावाही सभागृहात मांडण्यात आला. वर्धा जिल्ह्यात जन्मलेले आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणून कार्यरत असलेले आंबटकर यांचा सहकारी संस्थांमध्ये मोठा सहभाग होता. ते २०१८ मध्ये विधान परिषदेवर निवडून आले. विद्यार्थी चळवळीतील त्यांचा २० वर्षांचा अनुभव आणि कार्यकर्तावृत्तीने केलेले काम आजच्या काळासाठी प्रेरणादायी आहे, असे सभापतींनी नमूद केले. या तिन्ही व्यक्तिमत्त्वांचे योगदान स्मरणीय असून त्यांच्या कार्याची प्रेरणा पुढील पिढ्यांना मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास सभापतींनी यावेळी व्यक्त केला.

---

**मुंबई/ प्रतिनिधी-**राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या सोमवारच्या पहिल्या दिवशी दोन्ही सभागृहात ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या मागण्या सादर केल्या. या मागण्यांवर पुढील आठवड्यात ७ आणि ८ जुलै रोजी चर्चा होउन त्या मंजूर केल्या जातील. सन २०२५-२६च्या पुरवणी मागणीत येत्या दोन वर्षात नाशिकमध्ये होउ घातलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन आणि अंमलबजावणी खर्चासाठी एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.



आज सादर झालेल्या पुरवणी मागण्यांपैकी १९ हजार १८३ कोटी रुपयांच्या मागण्या या अनिवार्य खर्चाच्या तर ३४ हजार ६६१ कोटीच्या मागण्या या कार्यक्रमांतर्गत खर्चाच्या आहेत. केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने ३ हजार ६६४ कोटीची तरतूद पुरवणी मागणीत करण्यात आली आहे. आगामी स्थानिक स्वाराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राज्य सरकारने पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून महापालिका, जिल्हा परिषदांना निधी उपलब्ध करून दिला आहे. पंधराव्या वित्त आयोगाने शिफारस केल्यानुसार ग्रामविकास आणि नगरविकास विभागाला ११ हजार ४२ कोटी रुपयांची अनुदाने दिली जाणार आहेत. तसेच नागरी पायाभूत विकास निधीच्या योजनेंतर्गत महापालिका, नगरपालिका, नगर पंचायतींना १ हजार ५०० कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे.

मेट्रो प्रकल्प, महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदांना मुद्रांक शुल्क अधिभार परतावा म्हणून ३ हजार २२८ कोटी रुपयांची तरतूद पुरवणी मागणीत आहे. केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ९८९ कोटी, मुंबई मेट्रो प्रकल्प, वाहतूक दळणवळण भुयारी मार्ग बांधण्यासाठी राज्य सरकारच्या हिश्श्याची दुय्यम कर्जाची रक्कम म्हणून २ हजार २४० कोटी रुपयांच्या निधीची उपलब्धता करून देण्यात आली आहे. राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून राज्य सरकारमार्फत सहकारी साखर कारखान्यांना खेळत्या भागभांडवलासाठी मार्जिन मनी लोन म्हणून २ हजार १८२ कोटींची तरतूद पुरवणी मागणीत करण्यात आली आहे. केंद्र सरकारकडून राज्यांना भांडवली खर्चासाठी ५० वर्षकरिता बिनव्याजी विशेष सहाय्य दिले जाते. या योजनेच्या अंतर्गत सरकारने २ हजार १५० कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत.

अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करणे तसेच पूर्ण सिंचन प्रकल्पांच्या वितरण प्रणालीत सुधारणा करण्यासाठी नाबार्डकडून मिळालेल्या २ हजार ९६ कोटीच्या कर्जाची तरतूद पुरवणी मागणीत दाखवण्यात आली आहे. जिल्हा मार्ग, रस्ते आणि पुलांच्या कामासाठी दोन हजार कोटी रुपये, सामाजिक न्याय विभागाच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन आणि संजय गांधी निराधार अनुदान योजनेसाठी अनुक्रमे २ हजार कोटी, १ हजार ५०० कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. इतर मागास आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रिक आणि मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी १ हजार ३०० कोटी रुपयांची तरतूद पुरवणी मागणीत आहे. राज्य मार्ग परिवहन महामंडळ अर्थात एसटीच्या सवलत मूल्यांची प्रतिपूर्ती म्हणून हजार कोटी रुपयांची तरतूद पुरवणी मागणीत करण्यात आली आहे. एस टी महामंडळासाठी १ हजार बारा कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मंत्र्यांना आयपॅड वाटण्यासाठी दिड कोटी रुपयांची, दूध उत्पादक शेतक-यांना सात रुपये प्रमाणे अनुदान देण्यासाठी ४६ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

### ❖ ठळक तरतूदी ❖

- मुंबईतील मेट्रो साठी घेतलेल्या बा कर्ज आणि त्यावरील व्याज देण्यासाठी १५०० कोटी
- नगर परिषद विशेष अनुदान १५०० कोटी
- मुंबईतील मेट्रोच्या प्रकल्पासाठी घेतलेल्या दुय्यम कर्जासाठी १७४० कोटी
- एमएमआरडीयला ५०० कोटी(ठाणे बोरीवली आणि ऑरेंज गेट ते मरिन ड्राईव्ह परिसर भुयारी मार्ग )
- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना नागरी पायाभूत सोयीसुविधांसाठी १५०० कोटी
- राज्यातील राज्य महामार्गाच्या चालू असलेल्या व नवीन बांधकामासाठी आस्थापना खर्च आणि हत्यारे व सयंत्रे यावरील खर्चासाठी १००० कोटी
- राज्यातील रस्ते व पुले यासाठी साडेसहाहजार कोटी
- रेवस रेड्डी सागरी महामार्गाच्या विकासासाठी ५०० कोटी
- अपुरे सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी १४०० कोटी रुपये
- वाईन उद्योगाला प्रोत्साहन आणि अर्थसहाय्य देण्यासाठी ३४ कोटी रुपय
- जिल्हा परिषदांच्या विवीध थकीत शुल्काच्या अनुदानासाठी १४०० कोटी
- अनुसूचित जातीसाठी महात्मा फुले जन आरोग्य योजनेसाठी १०० कोटी
- राज्यातील बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजनेसाठी १०० कोटी
- महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीसाठी पंधराशे कोटी
- राज्यातील आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी ३४५८ कोटी
- आशा स्वयंसेविका आणि प्रवर्तकांसाठी ६६७ कोटी रुपये
- आरोग्य विभागाच्या रुग्णवाहिका खरेदीसाठी २०० कोटी आणि आधी असलेल्या रुग्नवाहीकेच्या खर्चासाठी १०० कोटी
- जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सक्षमीकरणासाठी २०० कोटी रुपये
- सहकारी साखर कारखान्यांच्या मार्जिन मनी लोनसाठी २१८२ कोटी
- अंगणवाडी कर्मचा-यांच्या वेतनासाठी बाराशे सत्तावीस कोटी

### पुरवणी मागणीतील विभागनिहाय तरतुदी

- नगरविकास- १५ हजार ४६५ कोटी
- सार्वजनिक बांधकाम -. ९ हजार ६८ कोटी
- ग्रामविकास-.. ४ हजार ७३३ कोटी
- सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य-. ३ हजार ७९८ कोटी
- सहकार, पणन, वस्त्रोद्योग- २ हजार ८३५ कोटी
- महिला आणि बालविकास-. २ हजार ६६५ कोटी
- जलसंपदा-. २ हजार ६६३ कोटी
- गृह - १ हजार ४६१ कोटी
- विधी आणि न्याय-. १ हजार ३५३ कोटी

## ठाकरे बंधूंनी एकत्र येऊ नये असा GR काढलेला नाही

**मुंबई/प्रतिनिधी :** दोन भावांनी एकत्र येउ नये, असा मी जीआर काढला आहे का? असा मी जीआर काढलेला नाही. दोन भाउ एकत्र येत असतील, तर मला अतिशय आनंद आहे. त्यांनी जरूर एकत्रित यावे. तुमच्या काळामध्ये पहिली ते बारावी हिंदी सक्तीचा निर्णय का घेण्यात आला, असा प्रश्न राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांना विचारावा. बाकी त्यांनी एकत्रित यावे, क्रिकेट खेळावे, हॉकी खेळावे, टेनिस खेळावे, स्विमिंग करावे, जेवण करावे, आम्हाला काहीही हरकत नाही, असा खोचक टोला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लगावला.महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदासाठी रविंद्र चव्हाण यांनी अर्ज भरला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेही उपस्थित होते. मंगळवारी सायंकाळी पाच वाजता किरण रिजिजू याबाबत अधिकृत घोषणा करणार आहेत. अर्ज भरल्यानंतर पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे बंधू एकत्र येण्याबाबत विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देताना टोलेबाजी केली. तसेच मराठी भाषा आणि हिंदी सक्तीवरून विरोधकांकडून सुरू असलेल्या आरोप-प्रत्यारोपांचा समाचार घेतला.



CM फडणवीसांचा खोचक टोला

उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात जो अहवाल आला होता, तो येण्यामध्ये उद्धव ठाकरे यांचा उजवा हात असलेल्या उपनेत्याची महत्त्वाची भूमिका होती. त्या अहवालात पहिली ते बारावी हिंदी सक्तीची करा, असे म्हटले होते. तो अहवाल उद्धव ठाकरे यांनी स्वीकारला. त्यानंतर नेहमीच्या पद्धतीने घुमजाव केले. तरी आम्ही कोणताही इगो न मानता त्यासंदर्भात निर्णय केलेला आहे. पुन्हा एकदा सांगतो की, आम्ही निर्णय केला आहे. समिती तयार केलेली आहे. समिती ठरवेल. आम्ही कोणत्याही पक्षाचे हित बघणार नाही. आम्ही महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यांचे हित बघू. विद्यार्थ्यांच्या हिताचे जे असेल, तोच निर्णय महाराष्ट्र सरकार घेईल. कुणाच्याही दबावापुढे झुकणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठामपणे सांगितले.कोकणात आमचा विस्तार अतिशय चांगल्या पद्धतीने झालेला आहे. या विस्तारात रविंद्र चव्हाण यांचा विशेष मोलाचा वाटा आहे. रविंद्र चव्हाण यांचे काम केवळ कोकणापुरते मर्यादित नाही, संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचे काम आहे. महामंत्री म्हणून महाराष्ट्रात काम केले आहे. कोकणात आम्हाला विस्तार करण्यासाठी आणखी खूप वाव आहे. अर्थात आमची महायुती असल्यामुळे काही ठिकाणी आम्हाला मर्यादा आहेत. काही जागा आम्हाला लढता येत नाहीत. परंतु, आम्हाला संघटन वाढवायला आम्हाला मनाई नाही. कोकणातील कानाकोप-यात आमचे संघटन उभे राहील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्तकेला. दरम्यान, रविंद्र चव्हाण यांची भाजपाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी निवड निश्चित मानली जाते आहे. मंगळवारी यासंदर्भातील अधिकृत घोषणा केली जाईल. आम्ही सगळ्यांनी त्यांच्या नावाला पाठिंबा दिला आहे आणि त्यांचा अर्ज पक्षश्रेष्ठींकडे सोपवला आहे, अशी माहिती देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविंद्र चव्हाण यांच्याबद्दल कौतुकोद्गार काढले.

### भाजपला मिळणार नवा प्रदेशाध्यक्ष

## रविंद्र चव्हाण यांचा अर्ज दाखल




**मुंबई/प्रतिनिधी :** भाजप प्रदेशाध्यक्षपदाची निवडणूक प्रक्रिया सुरू झाली असून अपेक्षेप्रमाणे प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचा एकमेव अर्ज आला आहे. मंगळवारी पाच वाजता त्यांच्या निवडीबाबतची अधिकृत घोषणा होईल.रविंद्र चव्हाण यांनी भाजपा प्रदेशाध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आदी उपस्थित होते. या निवडणुकीसाठी केंद्रिय निरीक्षक म्हणून केंद्रिय मंत्री किरण रिजीजू मुंबईत दाखल झाले आहेत. रविंद्र चव्हाण यांनी अर्ज दाखल केला असून त्यांच्या निवडीची औपचारिकता बाकी आहे. मंगळवारी पाच वाजता याबाबतची अधिकृत घोषणा होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. भाजप एकमेव असा पक्ष ज्यात पूर्ण लोकशाही पदधतीने विविध निवडणूका होतात. मंगळवारी संध्याकाळी पाच वाजता वरळी डोममध्ये पदग्रहणाचा कार्यक्रम होईल त्यासाठी राज्यभरातून कार्यकर्ते येतील. महाराष्ट्राची निवडणूक झाल्यानंतर मुंबईसंदर्भात महाराष्ट्र अध्यक्ष व केंद्रिय नेतृत्व पुढील निर्णय घेतील. कोकणात आमचा विस्तार गेल्या काळात चांगल्या पद्धतीने झालाय त्यात रविंद्र चव्हाण यांचा मोलाचा वाटा आहे. ते कोकणातले असले तरी त्यांचे काम केवळ कोकणापुरते मर्यादित नाही. कोकणात विस्ताराला स्कोप खूप आहे. महायुतीमुळे काही जागा लढता येत नाहीत पण कोकणातल्या कानाकोप-यात संघटन उभे राहिल असेही ते म्हणाले.

## कुठलीही समिती नेमा, पण हिंदी सक्ती चालणार नाही म्हणजे नाही

### राज ठाकरे यांनी ठणकावले

**मुंबई/प्रतिनिधी :**शाळांमध्ये पहिली ते पाचवी इयत्तेसाठी हिंदी सक्ती चालणार नाही म्हणजे नाही, मग नरेंद्र जाधव यांची समिती नेमा वा आणखी कोणाची. महाराष्ट्राने व मराठी माणसाने या निर्णयाला ज्या प्रकारे विरोध केला आहे याची जाणीव जाधव यांनाही असेलच, अशा शब्दांत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज सरकारला पुन्हा एकदा इशारा दिला. येत्या ५ तारखेला विजयी मोर्चा होईल, त्यात मी सविस्तर बोलेनच असेही ते म्हणाले. मात्र शिक्षणक्षेत्राचे,शाळांचे इतरही अनेक मूलभूत प्रश्न आहेत त्यावर विरोधी आमदारांनी अधिवेशनात आवाज उठवावा अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शाळांमध्ये हिंदी शिकविण्यासंदर्भातील दोन्ही जीआर रदद केल्याची घोषणा केली. त्रिभाषा सूत्रावर विचार करण्यासाठी ड?.नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याचेही ते म्हणाले. त्यानंतर ५ तारखेचा राज व उद्धव ठाकरे यांचा मोर्चा रदद करण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले. मात्र ५ तारखेला विजयी मेळावा किंवा मोर्चा काढण्यात येणार आहे. हिंदीसक्तीचा निर्णय रद्द झाल्याबद्दल मनसे पदाधिका-यांनी आज राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ या निवासस्थानी जाउन त्यांचे अभिनंदन केले.महिला मनसैनिकांनी राज ठाकरे यांचे औक्षणही केले. त्यानंतर पत्रकारपरिषदेत राज ठाकरे म्हणाले, मराठी माणूस, मराठी भाषा या विरोधात जो कोणी जाईल त्याला आपला विरोधच असेल. हिंदी सक्तीचा निर्णय रद्द झाल्यानंतर मला खा. संजय राउत यांचा फोन आला होता. आपण विजयी मेळावा करूया असे ते म्हणाले. त्यावर माझ्या माणसांशी बोलून विजयी मेळावा घेण्यासंदर्भात चर्चा करतो असे मी त्यांना म्हणालो. अद्याप त्याचे ठिकाण निश्चित झालेले नाही. सगळ्यांशी चर्चा करून अंतिम करू. पाच तारखेच्या या मेळाव्यात कोणाचाही झेंडा नसेल असेही राज ठाकरे म्हणाले. महाराष्ट्रात खूप प्रश्न तुंबलेले आहेत. उगाच भाषेवर विषय आणू नका. आमदारांनीही आता या विषयावर अधिवेशनात चर्चा करून वेळ वाया घालवू नये, महाराष्ट्रातल्या मूलभूत प्रश्नांवर चर्चा करावी. जीआर रद्द झाला आहे. आता इतर विषयांवर बोलावे. शिक्षणात अनेक त्रुटी आहेत. शाळा नाहीयेत. शिक्षकांना पगार नाहीयेत. अशा इतर अनेक विषयांना हात घालावा, असं आवाहन राज ठाकरेंनी सर्वपक्षीय आमदारांना केले.राज ठाकरे यांनी साहित्यिक, कलाकार, मराठी पत्रकार आदी सगळ्यांचे आभार. विषय श्रेय घेण्याचा नाही मात्र सगळ्यात आधी आम्ही आवाज उठविला. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेसह इतरही पक्षांनी याला समर्थन दिले. त्यामुळे जर ५ तारखेला



मोर्चा निघाला असता तर न भूतो न भविष्यती असा तो मोर्चा असता असेही राज ठाकरे म्हणाले.

हिंदीसक्ती विरुद्धच्या लढ्यात उद्धव ठाकरे गट व मनसे या दोन्ही पक्षांचे पदाधिकारी व नेतेमंडळी एकत्र आल्यामुळे दोन पक्षाच्या आगामी युतीची चर्चा सुरू झाली आहे. यासंदर्भात राज ठाकरेंना पत्रकार परिषदेत प्रश्न विचारला असता त्यांनी, हिंदी सक्तीच्या या सर्वपक्षीय भूमिकेला पक्षीय लेबल लावण्याची गरज नसल्याचे सांगितले. मोर्चाला पक्षीय लेबल लावू नका,असामी आधीच सांगितले होते. आता विजयी मेळाव्यालाही पक्षीय लेबल लावू नका. युत्या-आघाड्या या सगळ्या गोष्टी होत राहतील. पण मराठी भाषा संपली तर परत येणार नाही. भाषा ही संस्कृती टिकवत असते. उद्या तीच गेली, तर या युत्या-आघाड्यांना काय अर्थ आहे? या सगळ्या गोष्टींचा विचार निवडणुकांच्या वेळी करता येईल. आता त्या गोष्टीचा विचार करता येणार नाही. आता हिंदीसंदर्भातील या सगळ्या गोष्टींकडे एक संकट म्हणूनच पाहायला हवे. त्याला राजकीय लेबलं लावू नयेत असे राज ठाकरे म्हणाले.

## यूएईने भारताची स्तुती केल्याने पाकला मिरची

### भारतासोबतचे संबंध आणखी मजबूत झाले

**नवी दिल्ली :** गेल्या काही वर्षांमध्ये भारताचे मुस्लिम देशांची संबंध दिवसेंदिवस मजबूत होत आहेत. एकीकडे भारताचे पाकिस्तनसोबतचे संबंध दिवसेंदिवस बिघडत आहेत, तर दुसरीकडे सौदी, इराण, यूएईसारख्या देशांसोबतचे व्यावहारिक संबंध मजबूत होत आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर तर अनेक देशांनी घटनेचे खंडन करताना पाकिस्तानलाही सुनावले. दरम्यान, आता पाकिस्तानचा मित्रराष्ट्र असलेल्या यूएईने भारताचे कौतुक केल्यामुळे पाकिस्तानला आणखी मिरची लागली आहे. यूएईचे राजदूत अब्दुलनासेर अलशाली म्हणाले की, भारतीय नागरिकांसाठी यूएईच्या व्हिसा ऑन अरायव्हल कार्यक्रमाचा विस्तार हा भारतासोबतच्या त्यांच्या कायमस्वरुपी भागीदारीचे प्रतिबिंब आहे. हे एक व्यावहारिक पाउल आहे, जे कुटुंबांना पुन्हा एकत्र येणे, व्यावसायिकांना सहकार्य करणे आणि सीमा ओलांडून व्यवसाय वाढवणे सोपे करेल. दोन गतिमान आणि दूरदर्शी राष्ट्र म्हणून, आम्ही आमच्या लोकांमध्ये आणि अर्थव्यवस्थेमध्ये आणखी मजबूत पूल बांधण्यासाठी वचनबद्ध आहोत, असेही त्यांनी सांगितले. नवी दिल्लीतील यूएई मिशनने भारतीय नागरिकांसाठी वाढीव व्हिसा ऑन अरायव्हल धोरणाचे महत्त्व अधोरेखित कराना, द्विपक्षीय संबंध वाढवण्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा असल्याचे वर्णन केले आहे. दरम्यान, भारत यूएईच्या पर्यटन यशाचा आधारस्तंभ बनला आहे. एका अंदाजानुसार २०२३ मध्ये सुमारे ४.५ मिलियन भारतीयांनी यूएईला भेट दिली.

## ठाकरे बंधूतील संवाद बघून डोमकावळे कावकाव करतायेत

### संजय राऊतांचा महायुतीच्या नेत्यांना टोला

**मुंबई :** राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या एकत्रित मोर्चाचा धसका घेउन सरकारने त्रिभाषा सूत्राचा जीआरच रद्द केला. आता मोर्चा ऐवजी जल्लोष मेळावा होणार आहे हे दोघे एकत्र येत असल्याने अनेक डोमकावळे अस्वस्थ होउन कावकाव करत आहेत असा टोला ठाकरे गटाचे नेते खा. संजय राउत यांनी आज लगावला. ठाकरे बंधु एकत्र येणार असल्याने महाराष्ट्राचे लक्ष या मोर्चाकडे लागले होते. मराठी माणसाची ताकद दिसणार होती. महाराष्ट्रात मराठी ताकदीचा विजय होणार होता, दोन ठाकरे बंधू एकत्र येत आहेत म्हणून देवेंद्र फडणवीस अस्वस्थ झाले होते, सत्ताधारी वैफल्यग्रस्त होते. महाराष्ट्रात राजकीय भूकंप होणार होता, म्हणून हा त्रिभाषा जीआर मागे घेतला अशी टीका संजय राउत यांनी केली. देवेंद्र फडणवीस हे केवळ अफवा पसरवत नाहीत, तर ते भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय धोरणानुसार खोटे बोलतात.



जसे नरेंद्र मोदी आणि अमित शहा खोटे बोलतात. अशा विषयात कोणाचा तरी सल्ला घेणे आवश्यक असते, त्यासाठी उद्धव ठाकरेंच्या काळात रघुनाथ माशेलकरांची समिती स्थापन केली होती. फडणवीस हे खोटे बोलतात त्यानी एकदा स्पष्ट करावे की आता त्यांनी नरेंद्र जाधवांची कमिटी का तयार केली आहे? अशी मागणीही संजय राउत यांनी केली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत मुंबईसह महाराष्ट्र काबीज करणे हे आमचे ध्येय आहे. तसेच मुंबईसह महाराष्ट्राची सत्ता मराठी माणसाच्या हातात देणे आमची भूमिका आहे, ठाकरे बंधू एकत्र येत असल्याचा धसका घेत सत्ताधारी घाबरले आहेत ही एक विजयाची पायरी आहे, इथून पुढे आम्ही एक-एक विजयाच्या पाय-या सर करत जाउ. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी मराठीसाठी एकत्र येउन आंदोलन करण्याची भूमिका घेतली यात सगळे आहे आहे.

याला बिटवीन द लाईन्स म्हणतात. दोन पक्षांमध्ये आणि दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्तम संवाद सुरू आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## पुन्हा अत्याचार

कोलकाता येथे २०२४ मध्ये आर जी कार मेडिकल कॉलेज बलात्काराच्या घटनेने देश हादरून गेला होता. आज २०२५ रोजी कोलकात्याच्या लॉ कॉलेजच्या पहिल्या वर्षाच्या विद्यार्थिनीवर तिघा जणांनी अत्याचार केल्याची घटना घडली आहे. त्यामुळे देशात संतापाची लाट उसळली आहे. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांचे सरकार आहे आणि एक महिला मुख्यमंत्री असतानाही अशा घटनांना रोखू शकत नाहीत हे भीषण वास्तव समोर आले आहे. कोलकाता, बिहार, पंजाब आणि हरियाणा येथील अशा अत्याचाराच्या घटना खूपच अस्वस्थ करणाऱ्या आहेत हे तर सत्य आहेच, पण येथे कायदा आणि सुव्यवस्था नाममात्रही अस्तित्वात नाही याची चिंता वाटते. कारण दररोज गुंड बंदुकीच्या जोरावर तरुणींवर अत्याचार करत आहेत आणि कायद्याचा खून पाडत आहेत हे वास्तव आहे. २०१२ च्या दिल्लीतील सामूहिक अत्याचाराच्या घटनेमुळे देश पेटून उठला आणि त्याच आगीत मनमोहन सरकारची आहुती पडली. कारण ते सरकार कुचकामाचे होते. त्या प्रकरणानंतर स्थापन झालेल्या न्यायमूर्ती वर्मा समितीने अनेक शिफारशी केल्या आणि त्याची अंमलबजावणी झाली, पण गुन्हेगारांना कायद्याचा धाक बसू शकलेला नाही हे वास्तव आहे. कोलकाता येथील लॉ कॉलेजच्या विद्यार्थिनीवर बलात्कार झाला त्याची कहाणी अंगावर काटा आणणारी आहे. तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आले आणि यात तिघे जण होते. यातील आरोपी मनोजित मिश्रा हा ३१ वर्षीय, तर दुसरा आरोपी झैब अहमद हा २१ वर्षीय आणि २० वर्षीय प्रमित मुखर्जी हे पीडितेच्या वर्गातीलच होते. तिच्या बलात्काराच्या घटनेचे शॉकिंग माहिती समोर आली आहे आणि त्यानुसार २४ वर्षीय ही विद्यार्थिनी कॉलेजच्या आवारात २५ जूनला असताना सायंकाळी ७.३० ते रात्री १०.३० वाजेपर्यंत तिच्यावर अत्याचार सुरू होते. आरोपींनी अत्याचाराचे फिल्मिंगही केले आणि तिला असे सांगून धमकावले की, जर तिने या गोष्टीची जाहीर वाच्यता केली, तर ते हा व्हीडिओ सर्वत्र व्हायरल करतील. ममता बॅनर्जी या पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आहे. पण त्या आपल्या राज्यातील अत्याचाराच्या घटनांना आळा घालू शकल्या नाहीत. उलट मोदी सरकारवर रोज त्या नवनवीन आरोप करत आहेत. संबित पात्रा यांनी राज्य सरकारवर आरोप केला आहे की, राज्य सरकार पुरस्कृत हा बलात्कार आहे आणि त्यासाठी राज्य सरकारला कठोर शिक्षा झाली पाहिजे. कारण कोणत्या पक्षाचे सरकार हे महत्त्वाचे नाही, तर एका स्त्रीची अब्रू गेली आहे आणि त्यामुळे गुन्हेगारांना कठोरातील कठोर शिक्षा झाली पाहिजे. पण आपल्याकडे तितकी परिपक्व व्यवस्था नाही. त्यामुळे आरोपी कोणत्या पक्षाचा आहे आणि त्याने केलेला गुन्हा किती गंभीर आहे हे अगोदर पाहिले जाते. आरोपींनी या मुलीवर नृशंस अत्याचार केलेच पण फोर्सफूल पेनेट्रेशन म्हणजे डॉक्टरी भाषेत ज्याला जबरदस्तीने बळजबरी करणे असे म्हटले जाते. हे चालू असताना ती मुलगी असहाय्य किंकाळ्या फोडत होती. आता या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एसआयटी स्थापन झाली आहे आणि तपास लगेच सुरू झाला आहे, पण आरोपींना कितपत शिक्षा होईल हा वादाचा प्रश्न आहे. कारण आरोपी जरी वरच्या वर्गातील नसले तरीही सरकार ममता दीदींचे आहे आणि ते अशा अनेक गुन्हेगारांना पाठीशी घालत असते हा इतिहास आहे. त्यातील एक आरोपी हा तृणमूल काँग्रेसचा पदाधिकारी आहे. त्यामुळे त्याला वाचवले जाणार हे स्पष्ट आहे. गेल्या काही वर्षांपासून कोलकात्यात अशा घटनांमध्ये दुप्पट वाढ झाली आहे. विनयभंगाच्या घटनांमध्ये तिप्पट वाढ झाली आहे. ही आकडेवारी उगीचच म्हणून घुसडण्यात आली नाही, तर नॅशनल क्राईम ब्युरोने दिली आहे. गेल्या एनसीआरबीच्या अभ्यासात बंगालला महिलांवरील अत्याचाराच्या बाबतीत पहिल्या क्रमांकाचे राज्य ठरवले आहे. ही बाब कोणत्याही सरकारसाठी भूषणावह नाही आणि ज्या राज्याच्या मुख्यमंत्री महिला आहे त्या राज्याला तर अजिबातच शोभणारी नाही. पण हे वास्तव आहे. २०१२ मध्ये निर्भया बलात्कार प्रकरण घडले, पण त्यापासून बंगालने काहीही धडा शिकलेला नाही हे सीआयडी अधिकारी सांगतात हे सत्यच आहे. देशात स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये घट होत असताना मात्र बंगालमध्ये आणि कोलकात्यात त्या घटना जास्त वाढल्या आहेत आणि हुंडाबळीच्या प्रथा नष्ट तर झालेली नाहीच, पण जास्तच ती गडदपणे प्रकाशित झाली आहे. आरोपींना शिक्षा होईल का ते माहीत नाही. कारण आपले कायदे गुन्हेगारांना सर्वप्रकारची मदत करणारे आहे. त्यामुळे आंध्र प्रदेशात दोन वर्षांपूर्वी एका बलात्कारातील आरोपीला पोलिसांनी सपवले होते. त्यावर बराच बवाल झाला होता, पण त्यातील दिलासादायक बाब अशी की अनेकांनी पोलिसांच्या त्या कृत्याचे समर्थनही केले होते. यात आरोपी सत्ताधारी पक्षाचे असल्याने त्यांना शिक्षा होईल याची हमी नाही. शिवाय आरोपींची पोहोच फार वरच्या वर्तुळात असली तर ते निर्दोष सुटण्याची शक्यताच जास्त. कोलकाता येथील लॉ कॉलेजची विद्यार्थिनी किती आशा, आकांक्षा घेऊन कॉलेजमध्ये आली असेल. तिची स्वप्ने किती असतील, त्या स्वप्नांना चूड लावण्याचे पाप बंगाल सरकारने केले आहे. ममता बॅनर्जी यांनी राजीनामा देण्याची मागणी होईल आणि त्या काही तसे करणार नाहीत, पण गुन्हेगारांना त्यांचे सरकार तारणहार ठरले आहे. हा काळा डाग त्या पुसून टाकू शकत नाहीत. भारतात पितृसत्ताक पद्धत टिकून आहे आणि ती नष्ट होईपर्यंत बलात्काराच्या घटना कधीच नष्ट होणार नाही. राजकारण, कारस्थान आणि कट प्रत्येक गुन्ह्याभोवती दिवसेंदिवस वाढत असतो आणि त्या परिस्थितीत पीडितेच्या कुटुंबाला न्याय मिळत नाही अशी देशात स्थिती आहे. प्रत्येक घटनेनंतर मूक मोर्चा, कँडल मोर्चा असे प्रकार घडतात. पण गुन्हेगार मोकाट सुटतात. लॉ कॉलेजच्या या घटनेबद्दल असे काही होऊ नये इतकीच इच्छा आहे.

# त्रिभाषा धोरणाबद्दल फडणवीस सरकारची भूमिका दुटप्पीच !

विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने सध्या राज्यात हिंदी भाषा अनिवार्य करण्याचा राज्य सरकारच्या निर्णयावरून उसळलेल्या असंतोषाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकाराची बाजू सविस्तरपणे मांडली.त्रिभाषा सुत्राबद्दल तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात डॉ . रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली गेली.त्या समितीचा अहवाल उद्धव ठाकरे कसा स्वीकारला आणि आमच्या सरकारनं या संदर्भात केवळ आदेश कसे काढले म्हणजे माशेलकर समितीच्या अहवालाची अंमलबजावणी कशी केली याची साधार,तारीखवार माहिती विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आणि या वादाला उद्धव ठाकरे याचेच सरकार कसे जबाबदार आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केला.थोडक्यात सर्व खापर उद्धव ठाकरे यांच्यावर फोडण्याचा तो प्रयत्न होता.यावेळी उपस्थित असलेले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तर 'चोराच्या उलट्या बोंबा' अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली सरकारची टिंगल केली.विरोधी पक्षाच्या भूमिकेवर टीका करण्याचा अधिकार विद्यमान मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना नक्कीच आहे पण,ते दोघेही म्हणजे विद्यमान सरकार दुटप्पीपणाने वागत आहे हे स्पष्ट सांगायला हवे.

त्रिभाषा सूत्राबद्दलची सर्व प्रक्रिया त्या सरकारनं केली म्हणून आजच्या सरकारनं त्या निर्णयाचं श्रेय स्वत:कडे घेणं टाळलं तर मग मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा केवळ आदेश काढण्याचं काम केलेलं असतांना त्याचं श्रेय राज्य आणि केंद्रातल्या भाजप सरकारांना आणि त्यातही विशेषत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देण्याचा दुटप्पीपणा देवेंद्र फडणवीस यांच्यासह तमाम भाजपवले आणि एकनाथ शिंदे यांनी का दाखवला ? मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची सर्व प्रक्रिया राज्यात काँग्रेसचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आणि केंद्रात डॉ . मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचंच सरकार असतांना पूर्ण झालेली आहे . त्याचं आदेश केवळ नरेंद्र मोदी पंतप्रधान असतांना जारी झालेला , या वास्तवाचा विसर पडावा इतकी देवेंद्र फडणवीस यांची स्मरणशक्ती क्षीण झालेली का , असा प्रश्न निर्माण होतो .

ही माहिती काही माझी नाही , तेव्हा मुख्यमंत्री असणारे पृथ्वीराज चव्हाण यांची आहे . फेब्रुवारी महिन्यात दिल्लीत झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात पृथ्वीराज चावण यांची जाहीर मुलाखत मी आणि राजीव खांडेकर यानं मिळून घेतली होती . अभिजात भाषेच्या दर्जाबाबत मी विचारलेल्या एका प्रश्नाला पृथ्वीराज चव्हाण यांनी ही माहिती दिली आहे . ती अशी....

**प्र. ब. :** तुम्ही प्रशासनात इतकं प्रदीर्घ काळ काम केलं त्या अनुषंगानं विचारतो . सध्या मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याबद्दल बरीच चर्चा आहे . माझी अशी माहिती आहे की किंवा मला जेवढं कांही कळलं आहे त्याप्रमाणं मराठी भाषेच्या अभिजात दर्जाचा प्रस्ताव तुमच्या कारकीर्दीत म्हणजे , काँग्रेसच्या राजवटीत पहिल्यांदा सादर झाला होता . हे खरं आहे का ? का याचं सगळं क्रेडिट घेण्याचा प्रयत्न सत्ताधाऱ्यांकडून होतो ?

**पृथ्वीराज चव्हाण :** मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला याबद्दल सर्वांचं



अभिनंदन . मला वाटतं त्याबद्दल आपण पार्श्वभूमीकडे नाही गेलो तर तो मनमोहनसिंगजी यांच्यावर अन्याय ठारेल . याबद्दल थोडी पार्श्वभूमी सांगतो. अभिजात भाषेचा दर्जा देण्याची संकल्पना २००४ मध्ये डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारमध्ये आली . तामिळनाडू सरकारच्या आग्रहास्तव हा विषय चर्चेला आला . सांस्कृतिक मंत्रालयानं पंतप्रधानांच्या आदेशावरुन 'क्लासिकल लँग्वेज' म्हणजे काय , कुणाला 'अभिजात भाषा' म्हणायचं याबद्दल नियमावली ठरवली . मनमोहनसिंग यांच्या कॅबिनेटनं ; त्यात शरद पवार होते , महाराष्ट्रांचे अनेक दिग्गज होते ; २००४मध्ये निर्णय घेतला . त्यानंतर २००४ मध्ये तामिळ भाषेला पहिल्यांदा हा दर्जा केंद्र सरकारकडून देण्यात आला . त्यानंतर २००५ मध्ये संस्कृत, मग मल्याळम , कन्नड, तेलगू, आणि शेवटी २०१५ मध्ये ओडिया भाषेला हा दर्जा मिळाला.

मी जेव्हा मुख्यमंत्री म्हणून २०१० साली महाराष्ट्रात आलो तेव्हा हा विषय मला माहिती होता कारण मी ही सर्व कागदपत्रे २००४ साली पंतप्रधान कार्यालयाचा राज्यमंत्री म्हणून हाताळली होती . मी जेव्हा मराठी भाषेचा आढावा घेतला आणि विचारलं की मराठी भाषेचं काय झालं ? तर कुणाला कांही माहिती नव्हतं . म्हणजे २००४ ते २०१०पर्यंत या विषयाबद्दल कुणीही ऐकलं नव्हतं , कुणाला कांही माहिती नव्हतं असंच म्हणावं लागेल . मग मी अधिकारी आणि तज्ज्ञांना बोलावलं , चर्चा केली आणि मी २०११ साली डॉ . रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली . त्यामध्ये डॉ. नागनाथ कोतापल्ले, डॉ. कल्याण काळे, प्रा. हरी नरके यांच्यासह अनेक तज्ज्ञांचा समावेश होता . अन् त्यांना सांगितलं की आपण लवकरात लवकर अर्ज केला पाहिजे . कारण अभिजातसाठी मराठी सर्व नियमात बसते आहे . त्या समितीनं सात-आठ बैठका घेतल्या . मग अहवाल तयार करण्यासाठी एक उपसमिती नेमली . त्या समितीनं मे २०१३ मध्ये मला ४३५ पानांचा अहवाल सादर केला . त्या अहवालात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा का द्यावा हे पुराव्यासह दिलेलं होतं . तो अहवाल केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाला पाठवायचा तर अधिकाऱ्यांनी सांगितलं , हा अहवाल इंग्रजी भाषेत करावा लागेल , तिथं मराठी समजेल कसं ? त्यासाठी आणखी सात-आठ महिने लागले कारण ते जुने संदर्भ भाषांतरित करणं कांही सोपं नव्हतं . मला वाटतं २०१३च्या शेवटी तो केंद्र सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाकडे मी स्वत: दिला . मला आठवतं तेव्हा श्रीमती शैलजा त्या खात्याच्या मंत्री होत्या आणि त्यांना सांगितलं की त्यावर लवकर प्रोसेसिंग करा . मग नियमाप्रामानं तो अहवाल साहित्य अकादमीकडे दिला गेला . त्यांनाही मी विनंती केली की लवकर करा . साहित्य अकादमीनं २०१४ च्या फेब्रुवारीमध्ये की मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला पाहिजे , अशी शिफारस केंद्र सरकारला केली .

**प्र. ब. :** मग मराठीला अभिजात दर्जा मिळण्यासाठी एवढा उशीर का झाला ?

**पृथ्वीराज चव्हाण:** दुर्दैवानं फेब्रुवारी ते २०१४ कांहीच झालं नाही . नंतर पांच वर्ष आमचं सरकार नव्हतं . २०१४ मध्ये केंद्र सरकार बदललं. मग उद्धवजींचं सरकार आलं . मग कोविड आला . मग शिंदेचं सरकार आलं ; त्यांची प्राथमिकता वेगळी होती ! अखेर २०२४ मध्ये निवडणुकीच्या तोंडावर एकदम ३/४ भाषांना हा दर्जा दिला . ठीक आहे , 'देर से आये , दुरुस्त आये' .

**प्र. ब. :** पण , अभिजात दर्जा मिळाला म्हणजे नेमकं काय मिळालं ?

**पृथ्वीराज चव्हाण :** एक आर्थिक तरतूद असते . माझ्या माहितीप्रमाणं ५०० कोटी रुपये त्या भाषेच्या विकासासाठी दिले जातात. अंधुक आठवतं त्याप्रमाणं भाषेच्या संवर्धनासाठी , जगात प्रसार करण्यासाठी कांही सवलती दिल्या जातात .

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ( आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ) यांचा या संमेलनात सक्रिय सहभाग होता . त्यांनी ही मुलाखत पूर्ण ऐकली नसेल तरी शासना यंत्रणेकडून त्याचा गोषवरा त्यान समजला असणारच ; ती एक नियमित प्रक्रियाच आहे . आता प्रश्न असा की , अभिजात भाषेची प्रक्रिया ज्यांच्या काळात पूर्ण झाली त्यानं श्रेय देण्याचा राजकीय उमदेपणा तेव्हा देवेंद्र फडणवीस यांनी का दाखवला नाही ? तसं घडलं नसेल तर माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या म्हणण्याचं राज्य सरकारनं खंडन का केलं नाही ? पहिल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात त्यांनी हा मराठीला अभिजात भाषेच्या दर्जाचा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांनी निकालात का काढला नाही ? म्हणूनच म्हटले त्रिभाषा सूत्राबाबतच्या सध्या स्थगित केलेल्या निर्णयाबद्दल देवेंद्र फडणवीस दुटप्पी आहेत !

**प्रवीण बर्दापूरकर**
मो.९११९८२२०५५७९९

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण: घोषणांची झगमग, अंमलबजावणीची अंधारी वाट



भारतातील राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० (NEP 2020) हे देशाच्या शैक्षणिक इतिहासातील एक महत्त्वाकांक्षी दस्तऐवज आहे. 'तीन वेळा हजेरी घ्या, तीन भाषा शिकवा, व्यावसायिक शिक्षण द्या, कौशल्यविकास करा' अशा घोषणांनी भरलेले हे धोरण प्रथमदर्शनी आकर्षक आणि प्रगतिशील वाटते. परंतु या घोषणांचा आभास आणि खऱ्या अंमलबजावणीतील दरी हीच चिंतेची बाब ठरते. या धोरणाच्या मुळाशी जर डोकावले, तर असे दिसते की, यातून भारतातील सामाजिक, आर्थिक, भौगोलिक आणि सांस्कृतिक वास्तव नजरेआड केले गेले आहे.

भारत हा शहरी नवमध्यमवर्गाच्या आकांक्षा पूर्ण करणारा देश नाही, तर तो बहुसंख्य अल्पभूधारक, गरिब, ग्रामीण आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांचा देश आहे. अशा देशात 'पाश्चिमात्य' शिक्षणधोरणांचे अनुकरण हे धोरणात्मक दुर्भाग्य आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार, भारतातील एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ६८.८४% लोक ग्रामीण भागात राहतात, तर ३१.१६% लोक शहरी भागात राहतात. याचा अर्थ असा की, भारतातील बहुसंख्य जनता ग्रामीण भागात राहते लाखो विद्यार्थी अजूनही दोन वेळचे अन्न, पिण्याचे स्वच्छ पाणी, आणि चांगली शाळा यासाठी संघर्ष करत आहेत. अशा परिस्थितीत शासनाने 'नव्या धोरणांतर्गत' किती नवे शिक्षक नेमले? किती सरकारी शाळा उभ्या केल्या? या प्रश्नांची उत्तरे शून्यावर येऊन थांबतात.

आज एकीकडे सरकारी व अनुदानित शाळा बंद करण्याचा, तर खासगी, इंग्रजी माध्यमाच्या, विनाअनुदानित शाळा चालू करण्याचा व्यवस्थात्मक अजेंडा शासन राबवत आहे. ही दिशा केवळ बाजारीकरणाचीच नाही, तर कल्याणकारी राज्याच्या आत्म्यालाच दुर्लक्षित करणारी आहे. गरिबांच्या शिक्षणाचे हक्काचे व्यासपीठ सरकारच नष्ट करत असेल, तर सामाजिक न्याय, समतेची संकल्पना आणि 'सबका साथ, सबका विकास' हे फक्त राजकीय घोषवाक्य ठरतात.

### शिक्षणाचा अधिकार आणि शासनाचे उत्तरदायित्व

भारतीय संविधानाच्या कलम २१-अ नुसार प्रत्येक बालकाला ६ ते १४ वयोगटात मोफत व सक्तीचे शिक्षण मिळणे हा त्याचा मूलभूत अधिकार आहे. पण या अधिकाराला पूरक म्हणून आवश्यक असलेली व्यवस्थात्मक कुवत आपण उभी केली आहे का? शिक्षक भरती प्रक्रिया थांबलेली आहे. शिक्षकांच्या १०० टक्के जागा भरल्या जात नाहीत. असंख्य जिल्हा परिषद शाळांमध्ये एकच शिक्षक कार्यरत आहे. मूलभूत सुविधांचा अभाव आहे. अभ्यासक्रम, प्रशिक्षण, शिक्षक व साधनसामग्री या बाबतीत शासनाचा अंमल केवळ कागदावर दिसतो.

स्थानिक अस्मिता, भाषिक गौरव, मातृभाषेतील शिक्षण यासंबंधी शासनाचा दृष्टिकोन कुठे आहे? आज इंग्रजी माध्यमातील शाळांमध्येच यशाचे गमक मानले जाते. मराठी भाषेतील गुणवत्तावान शिक्षण राबवण्याऐवजी शासन इंग्रजी शाळा सुरू करत आहे. शिक्षणाचा उद्देश हा मातृभाषेतील सर्जनशील विचारांची अभिव्यक्ती आणि समज असावा की,फक्त जागतिक बाजारात काम मिळवण्याचे साधन? हाच प्रश्न राज्य शासनाने स्वतःला विचारायला हवा.

शाळा म्हणजे केवळ इमारत नाही, ती एक संस्कृती असते, स्वातंत्र्यानंतर निर्माण झालेल्या जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका यांच्या शाळांनी देशाला उत्तम नेते, प्रशासक, विचारवंत, डॉक्टर, शास्त्रज्ञ दिले. गावोगावी उभ्या राहिलेल्या या शाळा हे सामाजिक समतेचे, प्रगतीचे आणि लोकशाही शिक्षणाचे प्रतीक होत्या. त्या काळात आर्थिक परिस्थिती हलाखीची असली तरी, शाळा गावाच्या जवळ होत्या, परवडणाऱ्या होत्या आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण पुरवत होत्या.

आज मात्र शासनाला या शाळा 'परवडत' नाहीत. शिक्षणाच्या नावाखाली खाजगीकरण, केंद्रीकरण, डिजिटल विभाजन आणि स्पर्धात्मक बाजारशक्ती वाढत आहे. गावात रस्ता, ब्रिज, कॉम्प्लेक्स होतोय, पण शिक्षणाच्या शाळा मात्र बंद होतात. ही स्थिती एका उदासीन आणि बाजारपेठा चालवणाऱ्या व्यवस्थेची जाणीव करून देते.

### शिक्षणाचा खरा उद्देश काय?

शिक्षण हे केवळ नोकरी मिळवण्याचे साधन नसून व्यक्तिमत्त्व घडवण्याची, सामाजिक समतेचा पाया रचण्याची आणि राष्ट्रीय अस्मितेची उभारणी करणारी प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया बाजारातील उत्पादनप्रणालीप्रमाणे 'आउटपुट ओरिएंटेड' म्हणजे 'फलनिष्पत्ती-केंद्रित' किंवा 'परिणाम-आधारित'. असू शकत नाही. शिक्षणात मूल्ये, समता, न्याय, सर्जनशीलता आणि भाषिक गौरव यांचा समावेश हवा. राज्य शासनाने आणि केंद्र शासनाने शिक्षणाची दिशा केवळ जागतिक स्पर्धेसाठी नव्हे तर स्थानिक गरजांसाठी ठरवली पाहिजे.

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० वास्तवाचे विश्लेषण

शिक्षक भरती व कमतरता- मार्च २०२४ मध्ये अधिवेशनात लोकसभेत उत्तर देताना शिक्षण मंत्री म्हणाले की, देशात २०२३ अखेर पर्यंत ११.१६ लाख शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने मान्य केले आहे,आता तर २०२५ मध्ये १४ लाखापेक्षा जास्त शिक्षकाचा जागा रिक्त आहे. महाराष्ट्रात २०२३ मध्ये १.२५ लाख शिक्षकांची पदे रिक्त होते सध्या १,५०,००० पेक्षा जागा रिक्त असू शकतात. ज्यामुळे जिल्हा परिषद शाळांमध्ये 'एक शिक्षक – सर्व वर्ग' ही स्थिती विद्यमान आहे. रिक्त जागांमुळे सर्वसामान्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. परिणामी, ज्या पालकांना समाजव्यवस्थेचे जाण आणि भान आहे, असे पालक आपला उदरनिर्वाह तुटपुंज्या उत्पन्नात करत असतानाही आपल्या मुलाला खाजगी शाळेत घालतात. कारण त्यांना आपल्या मुलाला शिकवायचे आहे, त्याचे भवितव्य घडवायचे आहे,हीच त्यांची महत्त्वाकांक्षा आहे.

मात्र, ही अशी भयावह परिस्थिती महाराष्ट्रात निर्माण झालेली असताना, जनप्रतिनिधी या प्रश्नाकडे दुर्लक्ष करतात, हे अत्यंत दुर्दैवी आहे. शिक्षण हक्काचा कायदा अस्तित्वात असतानाही, पुरोगामी महाराष्ट्रात मुलांचे शिक्षणच धोक्यात येणे ही बाब खेदजनक आणि शासनाच्या संवेदनशून्यतेचे द्योतक आहे. मात्र, हे सारे होत असताना राजकीय नेते, लोकप्रतिनिधी, आणि शिक्षण खात्याचे अधिकारी गप्प आहेत. कोणत्याही अधिवेशनात शिक्षक भरतीवर ठोस योजना मांडली जात नाही. दरवेळी आश्वासनांचे ढग जमतात, पण शिक्षक भरतीचा पाऊस मात्र पडत नाही. शिक्षण ही राज्याची जबाबदारी असताना राज्यच जर आपल्या जबाबदारीपासून पळ काढत असेल, तर हा लोकशाहीचा पराभव नाही का? आज गरज आहे ती शिक्षण क्षेत्राला सर्वोच्च प्राधान्य देण्याची. शिक्षक भरती प्रक्रियेला त्वरित गती देणे, रिक्त जागा तातडीने भरून शाळांना पुन्हा सक्षम बनवणे आणि शिक्षणाचा दर्जा टिकवून ठेवणे हे सरकारचे आद्य कर्तव्य आहे. शिक्षक ही केवळ एक नोकरी नसून, ती समाज परिवर्तनाची बीजं पेरणारी संस्था आहे, याची जाणीव शासनाला ठेवावी लागेल.

भारतातील ११.१६ लाख शिक्षक पदांची कमतरता (मार्च २०२४ पर्यंत):

केंद्र सरकारचे मान्यतापत्र त्यातील प्रमुख राज्यांमधील रिक्त पदांची विभागणी:

राज्याचे नाव अंदाजे रिक्त शिक्षक पदे (२०२३ अखेर)

- उत्तर प्रदेश २.१५ लाख
- बिहार २.०७ लाख
- पश्चिम बंगाल १.१७ लाख
- महाराष्ट्र १.२५ लाख
- मध्यप्रदेश ८९ ,०००
- झारखंड ८२ ,०००
- राजस्थान ७५ ,०००
- ओडिशा ७२ ,०००
- छत्तीसगड ६२ ,०००
- आंध्रप्रदेश ५३ ,०००
- इतर राज्ये १.११ लाख

### शाळा बंद होण्याची स्थिती आणि वास्तवचित्र

भारतातील २०१० ते २०२० या दहा वर्षांच्या कालावधीत देशभरात तब्बल १.५ लाख शाळा बंद झाल्या आहेत. महाराष्ट्रात दरवर्षी सरासरी ३०० ते५०० शाळा बंद होत असल्याचा अहवाल राज्य शिक्षण आयुक्तालयाकडून प्रसिद्ध करण्यात आला आहे. ही आकडेवारी चिंताजनक असून, ग्रामीण व वंचित भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा थेट परिणाम होत आहे.

नीती आयोगाच्या २०२२ च्या शैक्षणिक गुणवत्तेच्या निर्देशांकानुसार, देशातील शाळांची पायाभूत स्थिती अतिशय दुबळी आहे.३१ % शाळांमध्ये शौचालये कार्यरत नाहीत,४१% शाळांमध्ये सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध नाही, ५५ % शाळांमध्ये संगणक वा डिजिटल साधनांचा अभाव आहे.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020) नुसार इयत्ता ६वी पासून व्यावसायिक शिक्षण सुरू करण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात केवळ १२ % शाळांमध्येच व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. त्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षकच उपलब्ध नाहीत, आणि व्यावसायिक शिक्षकांची पदे तर अस्तित्वातच नाहीत. यामुळे ही योजना केवळ कागदोपत्री मर्यादित राहिली आहे.

३ फेब्रुवारी २०२५ रोजी शासन निर्णय काढून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठी भाषेसंदर्भात मोठा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र सरकारने राज्यातील सरकारी आणि निमसरकारी कार्यालयांमधील सर्व अधिकारी, कर्मचारी यांना फक्त मराठीत बोलणे बंधनकारक केले आहे. यासंदर्भात जारी केलेल्या शासन निर्णयात स्थानिक स्वराज्य संस्था, सरकारी महामंडळे आणि सरकारी अनुदानित आस्थापनांमध्ये देखील मराठी बोलणे सक्तीचे आहे. २०२४ मध्ये मराठी भाषा धोरणात मराठी भाषेचे जतन, संवर्धन, प्रचार, प्रसार व विकास होण्याच्या अनुषंगाने केवळ शिक्षणाचेच नव्हे तर सर्व लोकव्यवहाराचे होता होईल तेवढे मराठीकरण होणे आवश्यक आहे. त्यासाठी संवाद, संपर्क आणि सर्व स्तरावरील व्यवहारासाठी मराठी भाषेचा वापर करणे आवश्यक आहे, असे एकीकडे म्हणतात, दुसरीकडे इंग्रजी माध्यम शाळांची संख्या २०१० मध्ये ७,००० वरून २०२३ मध्ये १३,५०० वर पोहोचली,तर मराठी माध्यम शाळांची संख्या १९,०००, वरून घटून १४,५०० वर आली आहे. हे परिवर्तन केवळ भाषिक नसून, सामाजिक आणि सांस्कृतिक ओळखीवरही परिणाम करणारे आहे.याकडे सरकार कधी लक्ष देणार हा अत्यंत चिंतनाचा प्रश्न आहे. १५ मार्च २०२४ ला संच मान्यतेच्या संदर्भात नवीन निर्देश जाहीर केले अनेक मराठी शाळा आणि मराठी शाळेतील शिक्षक अतिरिक्त व्हायला लागले परंतु या मराठी शाळा जिवंत राहिला पाहिजे यासाठीच कोणते धोरण शासन अवलंबताना दिसत नाही, मराठी शाळा कशा बंद करता येईल याचा षडयंत्र सरकारच्या माध्यमातून सुरू असल्यास सातत्याने लोकांमध्ये चर्चा होत आहे.

(Unified District Information System for Education Plus) च्या अहवालानुसार २०१० ते २०२३ या कालावधीत शासकीय शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या ३५% नी घटली, तर खासगी शाळांतील विद्यार्थी संख्या ४२ % नी वाढली. यामुळे शालेय शिक्षणाचे खाजगीकरण वाढत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. याच काळात भारत शिक्षणावर GDP च्या केवळ २.९ ३ इतका खर्च करतो, जे NEP ने शिफारस केलेल्या ६ % च्या निकषाच्या निम्म्यापेक्षाही कमी आहे. या सर्व आकडेवारीवरून स्पष्ट होते की राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी अत्यंत मर्यादित स्वरूपात होत आहे. शिक्षकांची कमतरता, शाळांची पायाभूत सुविधांची दुर्दशा, स्थानिक भाषांचे दुर्लक्षण, शाळा बंद होण्याची वाढती प्रवृत्ती आणि शिक्षणाचे आक्राळविक्राळ खाजगीकरण ही सर्व अत्यंत गंभीर समस्या आहेत.

शैक्षणिक धोरण हे केवळ घोषणापत्र न राहता सामाजिक न्यायाचे प्रभावी हत्यार असले पाहिजे, ही आज देशवासीयांची रास्त आणि टोकदार अपेक्षा आहे. भारताच्या शैक्षणिक धोरणाला नव्या दृष्टिकोनाने तपासण्याची गरज आहे. शिक्षणाच्या प्रश्नांमध्ये सामान्य नागरिक, पालक, शिक्षक, समाजशास्त्रज्ञ आणि विधिज्ञ यांचा सहभाग हवा. शासनाच्या प्रत्येक निर्णयावर प्रश्न विचारणारे, अभ्यास करणारे आणि सजग राहणारे नागरिक निर्माण झाले, तरच खऱ्या अर्थाने शिक्षण लोकशाहीचे माध्यम बनू शकेल. अन्यथा ही धोरणं केवळ घोषणाच राहतील.

**डॉ. प्रशांत विघे**
राज्यशास्त्र विषयाचे लेखक
९३२६८७७७४९

# पालकमंत्री संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमांचा जल्लोष

## शुभेच्छांचा वर्षाव ; जनतेच्या उपस्थितीने यवतमाळ शहर गजबजले





जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री, तसेच यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री तथा शिवसेनेचे लोकप्रिय नेते ना. संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवार, दिनांक ३० जून २०२५ रोजी यवतमाळ जिल्ह्यात विविध ठिकाणी सामाजिक, शैक्षणिक व जनकल्याणकारी कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांना शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध पक्षांचे मान्यवर, तसेच सर्वसामान्य नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला.

यावर्षी वाढदिवसाच्या निमित्ताने मंत्री संजय राठोड यांनी पहाटे आपल्या गावी पहूर इजारा येथे जाऊन मातापित्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी त्यांच्या पत्नी शीतल राठोड यांच्यासह संपूर्ण परिवार उपस्थित होता. कुटुंबियांसह त्यांनी गावकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. त्यानंतर यवतमाळ शहरातील विश्रामगृह परिसरात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व कृषी क्षेत्रातील द्रष्टे नेते कै. वसंतराव नाईक यांच्या फलकावर पुर्णाकृतपुतळ्याचे अनावरण ना. संजय राठोड यांच्या हस्ते संपन्न झाले. या वेळी बोलताना त्यांनी वसंतराव नाईक यांच्या कार्याचे स्मरण करत, कृषी व ग्रामीण विकासासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगितले. विश्रामगृह येथे जिल्हाभरातून तसेच राज्याच्या विविध भागांतून आलेल्या शिवसैनिकांनी, पक्ष पदाधिकाऱ्यांनी, विविध सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी, व्यापारी वर्ग, युवक, महिला तसेच सर्वसामान्य नागरिकांनी पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ देत मंत्री राठोड यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. संपूर्ण परिसर 'संजय राठोड यांच्यावर प्रेम करणारी जनता मोठ्या प्रमाणात उपस्थित होती. शिवसेना जिंदाबाद' अशा घोषणांनी दुमदुमून गेला होता. वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, गरजूंना अन्नधान्य वाटप, वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, महिलांसाठी आरोग्य जनजागृती शिबिर आदी विविध उपक्रम राबविल्या जात आहे. ना. संजय राठोड यांच्या हस्ते विविध सामाजिक उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमात हजारो नागरिकांनी उपस्थिती लावून मंत्री राठोड यांच्याविषयी असलेली आपुलकी आणि विश्वास दाखवला. जनतेच्या गगनभेदी जयघोषात संपूर्ण परिसर उत्सवमय झाला होता. यावेळी बोलताना पालकमंत्री संजय राठोड यांनी सांगितले की, "यवतमाळ जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होण्यासाठी मी नेहमीच कटिबद्ध आहे. विकास कामांसोबतच सामाजिक बांधिलकी जपणं हीच खरी सार्वजनिक जीवनातील मोठी जबाबदारी आहे. नागरिकांच्या प्रेमातूनच मला कार्य करण्याची प्रेरणा मिळते." या कार्यक्रमांसाठी जिल्ह्यातील विविध भागातून नागरिक, शिवसैनिक, महिला, युवक मोठ्या संख्येने आले होते. संपूर्ण दिवसभर यवतमाळ शहरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

## विद्युत करंट लागून ४, वर्षीय चिमुकलीचा मृत्यू



बाभूळगाव : महावितरण कंपनीच्या ताराच्या तंगव्याच्या विद्युत तारेचा करंट लागून 4 वर्षीय चिमुकलीचा जागीच मृत्यू झाल्याची घटना दि.30 जूनच्या दुपारी 12.30 वाजताच्या दरम्यान बाभूळगाव तालुक्यातील गवंडी येथे घडली. या दुःखद घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त केल्या जात आहे. तन्श्री संजय कोरटकर वय 4 वर्ष रा. गवंडी असे मृतक चिमुलीचे नाव आहे. पोलीस सूत्राच्या माहिती नुसार मृतक तन्श्रीचे आई वडील मेंढर चरायला बाहेर गावी जात असल्याने गेल्या चार वर्षा पासून ही फिर्यादी ताराचंद राहेश्वराव कोरटकर रा. गवंडी यांच्या कडे राहत होती. दि.30 रोजी फिर्यादीची आई हिने गावामध्ये आंबे विकण्याकरिता आलेल्या विक्रेत्या कडून आंबे विकत घेतले व खाली टोपली तन्श्री हिला परत नेऊन देण्यास सांगितले गावातील रंगराव बाळकृष्ण कोरटकर यांच्या घरा जवळ जात असतांना तेथे वितरण कंपनीच्या ताराच्या तंगव्याच्या सिमेंट पोल होता.

## ग्राहक संरक्षण परिषदेत दाखल तक्रारींवर कालमर्यादेत कारवाई करा : जिल्हाधिकारी विकास मीना



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : कायद्याने ग्राहकांना विविध प्रकारचे संरक्षण दिले आहे. तसेच त्यांना उत्तम प्रकारच्या सेवा, वस्तू उपलब्ध व्हाव्या, त्यांची कुठेही फसवणूक होऊ नये यासाठी नियमावली करण्यात आली आहे. जिल्ह्यात सर्वत्र या नियमांचे पालन होणे आवश्यक आहे. जिल्ह्यात ग्राहकांच्या होणाऱ्या तक्रारी तसेच जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेत दाखल तक्रारींवर विभागांनी कालमर्यादेत कारवाई केली पाहिजे, अशा सूचना जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केल्या.

महसूल भवन येथे जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीला अप्पर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, जिल्हा पुरवठा अधिकारी सुधाकर पवार, पोलिस उपअधीक्षक सुनिल हुड, जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वरकड यांच्यासह अशासकीय सदस्य डॉ.नारायण मेहरे, प्रा. डॉ.केशव चेटुले, विरेंद्र चौबे, हितेश शेठ, डॉ.के.एस.वर्मा, संतोष डोमाळे, शेखर बंड, प्रमोद कुमार बाजोरीया, राजेंद्र निमोदिया, श्री.देशमुख उपस्थित होते. ऑक्टोबर 2023 पासून परिषदेकडे 121 तक्रारी प्राप्त झाल्या आहे. त्यापैकी 78 तक्रारींचे निराकरण झाले आहे. उर्वरीत तक्रारी का प्रलंबित राहिल्या याचा विभागांनी आढावा घेऊन अहवाल सादर करावे. जे विभाग ग्राहकांशी संबंधित आहे, त्यांनी प्रत्येक महिन्यात ग्राहकांच्या तक्रारी, ग्राहकांना देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांबाबत नियमितपणे कारवाई करणे आवश्यक आहे. विभागांनी अशी कारवाई करुन प्रत्येक महिन्यात केलेल्या कारवाईचा अहवाल करावा, असे निर्देश देखील जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. ग्राहकांचे जे सामुहिक स्वरुपाचे प्रश्न आहे, असे प्रश्न परिषदेच्या सदस्यांनी प्राधान्याने मांडले पाहिजे, कमी कालावधीत अधिक ग्राहकांना कसा दिलासा देता येईल, यासाठी सर्व विभागांसह अशासकीय सदस्यांनी प्रशासनास सहकार्य करावे. सध्या खरीप हंगाम सुरु आहे, त्यामुळे ग्राहकांना योग्य दरात आणि गुणवत्तेचे बियाणे, खते, औषधे उपलब्ध झाले पाहिजे. कृषी निविष्ठांच्या बाबतीत जिल्ह्यात कुठेही शेतकरी ग्राहकांची फसवणूक होऊ नये, यासाठी सजग राहण्याचे निर्देश त्यांनी दिले. सर्व कृषी केंद्राच्या ठिकाणी बियाणे, खते, औषधांचे दरपत्रक व साठ्याची माहिती लावणे बंधनकारक आहे. परंतू काही दुकानांमध्ये त्याचे पालन केले जात नाही, अशी तक्रार सदस्यांनी केली. त्यामुळे येत्या दोन दिवसात कृषी विभागाने अशी माहिती कृषी केंद्र चालकांनी प्रदर्शित केली किंवा नाही याचा फोटोसह अहवाल सादर करण्यात यावा, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या. परिषदेत दाखल तक्रारींवर वेळेत कारवाईसाठी विभागांना नोडल अधिकारी नेमण्याचे निर्देश मागील बैठकीत देण्यात आले होते, ज्या विभागांनी अशी नियुक्ती केली नसेल त्यांनी ती तातडीने करुन घ्यावे, असे ते म्हणाले. ॲटोरिक्षाचे दरपत्रक, जनरीक औषधांची उपलब्धता, राशनकार्ड वाटप, ध्वनीप्रदुषण, वजनकाटयांची तपासणी, दुध, दही व दुग्धजन्य पदार्थांमधील भेसळ, अन्न व औषधांची शुद्धता, गुणवत्ता आदी विविध विषयांवर सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर कारवाईचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

## पाळोदी येथे रात्रीच्या अंधारात शस्त्राचा धाक दाखवून धाडसी दरोडा



जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - तालुक्यातील पाळोदी येथे शस्त्राच्या धाकावर रात्रीच्या अंधारात चौघांकडून दरोडा टाकला आहे. दरोडा टाकून १ लाख ९२ हजार ४३५ रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. ही घटना दि.२८ जून २०२५ रोजीचे रात्री २.३० वाजताच्या दरम्यान घडली आहे. गावात दरोडा पडल्याने रहिवाशांमध्ये आता भीतीचे वातावरण पसरले आहे. रमेश श्रीराम बांडे वय ४९ वर्षे रा.पाळोदी यांनी दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात २५ ते ३० वर्षे वयोगटातील दरोडेखोराविरोधात दि.२८ जून २०२५ रोजीच्या रात्री ५.०५ वाजता शहर पोलिस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हे दाखल आले. शहर पोलीस ठाण्याच्या सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार रमेश बांडे हे शेतकरी व दुधाचा व्यवसाय करून उदरनिर्वाह करतात. त्यानंतर त्यांनी उठून पाहिले असता काही जण त्यांच्या घरामध्ये शिरल्याचे दिसून आले. त्यानंतर काही दरोडेखोर वरच्या मजल्यावर गेले होते. वरच्या मजल्यावरील कपाटात ठेवलेले १ लाख ८५ हजार ४३५ रुपयाचे वेगवेगळ्या प्रकारचे सोन्याचे दागिने व नगदी ७ हजार रुपये असा एकूण १ लाख ९२ हजार ४३५ रुपयाचा मुद्देमाल १० मिनिटात दरोडा टाकून पसार झाले आहे. अज्ञात दरोडेखोराविरोधात शहर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हे दाखल झाले आहे.

### घटनास्थळावर श्वान पथक दाखल

घटनेचे गांभीर्य लक्षात घेता दि.२८ जून २०२५ रोजीच्या सकाळी शहर पोलीस ठाण्याचे पोलिस पथक श्वान घेऊन घटनास्थळावर दाखल झाले होते. त्यानंतर घरात सर्व परिसर दाखवून दरोडेखोर ज्या दिशेने पसार झाले होते. त्या दिशेने श्वानाकडून कल्पूव लावण्याचा प्रयत्न केला जात होता.

## मुलांना त्यांच्या आवडीनुसार स्वप्न निवडू द्या : भार्गव राजे

### डॉ. कलाम फोरमकडून गुणवंत विद्यार्थी सत्कार व करिअर मार्गदर्शन सोहळा



जनमाध्यम प्रतिनिधी

दिग्रस - डॉ एपीजे अब्दुल कलाम फोरम यांच्यावतीने विद्यानिकेतन इंग्लिश मिडीयम स्कूल, दिग्रस येथे गुणवंत विद्यार्थी गौरव व करिअर मार्गदर्शन कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमात दहावी, बारावी, नीट, क्रीडा तसेच विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या 51 विद्यार्थ्यांचा, शिक्षकांचा आणि नागरिकांचा सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. भार्गव करिअर अकादमी नांदेडचे संचालक भार्गव राजे, ठाणेदार वैजनाथ मुंडे, गटशिक्षणाधिकारी मुकेश कोंडावार, सेवानिवृत्त मुख्याध्यापक हाजी मुश्ताक शेख, समाजसेविका उज्वला मानकर, वहिद भाई, डॉ कलाम फोरमचे संस्थापक मिर्झा अफजल बेग आणि अध्यक्ष फिरोज खान मंचावर उपस्थित होते.

मुख्य वक्ते भार्गव राजे यांनी विद्यार्थ्यांशी आणि पालकांशी संवाद साधत करिअर निवडीबाबत मार्गदर्शन केले. "डॉक्टर आणि इंजिनीयर यांच्यापलीकडेही अनेक करिअरच्या संधी आहेत. मुलांच्या आवडीनिवडीनुसार त्यांच्या कलाचे पालन करत त्यांना स्वप्न निवडू द्या," असे आवाहन त्यांनी केले. मोबाईलच्या अतिवापरावर भाष्य करत ते म्हणाले, "आज मोबाईल आपल्याला वापरतो आहे, आपण मोबाईलला वापरायला शिकलं पाहिजे." शिरीन मेमोरियल फाऊंडेशनचे संस्थापक हाजी मुश्ताक शेख, ठाणेदार वैजनाथ मुंडे आणि गटशिक्षणाधिकारी मुकेश कोंडावार यांनीही उपस्थित विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश देत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या सत्कारसोहळ्याचे संचलन आमीन चौहान यांनी तर आभार मिर्झा नासिर बेग यांनी मानले. प्रास्ताविक हाजी अफजल बेग यांनी केले. आतीक मौलाना महाराष्ट्रवाले, शेतकरी मित्र संतोष चव्हाण, ॲड. अमोल साळुंखे, नगर परिषद माजी सभापती सैय्यद अक्रम, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख किरण बारशे, मजहर अहेमद खान, बशीर शेख, बंडू खडसे, अलीमोहंमद भाटी, डॉ दीपक नगरमाळीया, डॉ भारत दुधे, रमेश कोपरकर, उल्हास सावळे यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे संगीत शिक्षक मोरेकर, गजानन पाटील आणि डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम फोरमचे मिर्जा नासिर बेग, फारुक अहेमद, आरिफ शेख, अमीन नौरंगाबादे, मोहम्मद परसुवाले, फारुक चव्हाण, सादिक गारवे, असिफोद्दीन काजी, फैयाज शेख, जुनेद शेख, शारिक शेख व इतर सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. या कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वेचक

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपा एकहाती सत्ता मिळवणार : ॲड. प्रफुल चव्हाण



वणी - आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपा एकहाती सत्ता मिळवणार असे ठामपणे भाजपचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष ॲड.प्रफुल चव्हाण यांनी सांगितले. येथील वसंत जिनिंग हॉल मध्ये दिनांक २९ जुन रोजी संकल्प से सिद्धीतक अभियानाच्या समारोपप्रसंगी त्यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी ओबिसी मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, माजी आमदार संजीवरेड्डी बोदकुरवार, माजी जिल्हाध्यक्ष तारेंद्र बोर्डे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य विजय चोरडिया, वणी विधानसभा प्रमुख, संजय पिंपळशेंडे, माजी महामंत्री रवी बेलुरकर, जिल्हा उपाध्यक्ष नितीन वासेकर, वणी तालुका अध्यक्ष प्रदिप जेऊरकर, शहराध्यक्ष ॲड. निलेश चौधरी, माजी जिल्हा परिषद सदस्या सौ मंगलाताई पावडे, वणी तालुका अध्यक्षा मिराताई पोतराजे, जयमाला दर्वे, उमाताई पिदुरकर, संध्याताई अवताडे, मारेगाव तालुका अध्यक्ष अविनाश लांबट, झरी तालुका अध्यक्ष नागेश घुगुल, प्रा. महादेव खाडे, श्रीकांत पोटदुखे, संतोष डंभारे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. मागेल त्याला घरकुल, विशेष म्हणजे अतिक्रमण धारकांनाही घरकुल, विज, रस्ते, जलजिवन मिशन अंतर्गत हर घर नळ, लाडकी बहिण योजना अशा अनेक योजना राबविल्या, आम्ही जो शब्द दिला तो पाळला त्यामुळे जनता आमच्या पाठीशी आहे आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आम्ही एकहाती सत्ता मिळवू असे नवनिर्वाचित भाजपचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष ॲड प्रफुल चव्हाण यांनी सांगितले.

### घाटोडी/पुसद परिसरात सौर ऊर्जेच्या विज निर्मितीच्या प्रकल्पाला सुरुवात



पुसद - शहरापासून दहा ते बारा किलोमीटर अंतरावर सौर ऊर्जेच्या वीज प्रायव्हेट लिमिटेड प्रकल्पाला सुरुवात झाली आहे. पुसद शहरापासून दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या एमआयडीसी परिसरात जवळपास १२० एकरामध्ये सौर ऊर्जेचे प्रकल्प उभारले जात आहे. या प्रायव्हेट असलेल्या प्रकल्पातील निर्मिती होणारे वीज शासनाला विकल्या जाणार आहे. पुसद दिग्रस रोडला लागूनच असलेल्या एमआयडीसी क्षेत्राची जागेवर सौर ऊर्जेच्या प्रकल्पाची निर्मिती होत आहे. सध्या प्रकल्पाचे २५ टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यासाठी परराज्यातून विशेष अधिकारी व कर्मचारी पुसद येथे काम करीत आहेत. त्याशिवाय स्थानिकांना सुद्धा रोजगाराची संधी प्रकल्पाच्या कामाकरिता मिळालेली आहे. तालुक्यातील बान्सी, पिंपळखुटा येथील शेत जमिन भाडेतत्त्वावर अधिग्रहित केली आहे. त्या ठिकाणी सुद्धा प्रकल्प उभारणीचे काम वेगाने सुरु आहे. तालुक्यातील मोहा इजारा येथील शेत जमीन अधिग्रहित करण्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरु आहे. अधिग्रहित केलेल्या शेत जमिनीच्या मोबदल्यामध्ये शेतमालकाला दर महिन्याला मोबदला देखील दिला जाणार आहे.

### तालुक्यातील खरीप हंगाम नियोजन पेरणी ७५ हजार हेक्टरच्या वर होणार



पुसद - तालुका कृषि अधिकारी व कृषि विभाग पंचायत समिती, पुसद यांचे मार्फत दि.२७ जून २०२५ रोजी राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या अध्यक्षतेखाली पुसद येथील वसंतराव नाईक स्मृती प्रतिष्ठान सभागृहात तालुक्यातील कृषि निविष्ठा विक्रेत्यांची सभा घेण्यात आली. सदर सभेस उपविभागीय अधिकारी (प्रांत) आशिष बिजवल उपस्थित राहुल तालुक्यात विविध शेती सलग्न व्यवसाय बद्दल तसेच जलसंधारण व्यवस्थापन व पाणी वापराबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. सभेचे प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी विजय मुकाडे यांनी केले असून त्यांनी तालुक्यातील खरीप हंगाम नियोजन पेरणी ७५ हजार ५०० हेक्टरवर होणार असून सद्यस्थितीत जवळपास ४५ हजार हेक्टर वरती पिकाची पेरणी झाली असून उर्वरित पेरणी चालू आहे तसेच सद्यस्थिती पीक परिस्थिती उत्तम असून वाढीच्या अवस्थेत असल्याबाबत तालुक्याची पीक परिस्थितीबद्दल सांगितले. तसेच राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी चालू खरीप हंगामात बियाणे, खते, कीटकनाशके उपलब्धतेबाबत आढावा घेतला. तसेच निविष्ठा विक्रेत्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत खतांचा साठा कमी पडू देणार नाही असे आश्वासन दिले. यावेळी कृषि निविष्ठा विक्रेता संघाचे अध्यक्ष सुधीर पळसकर, रणवीर टाले पाटील, कृषी अधिकारी शंकर राठोड यांचेसह पुसद तालुक्यातील कृषि निविष्ठा विक्रेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आंतरराज्य गुन्हेगार टोळीचा पर्दाफाश ; काही तासांत आरोपींना बेड्या



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : शहरातील स्टेट बँक ऑफ इंडियामधून पैसे काढल्यानंतर एका वृद्ध नागरिकाची रोकड चोरी करणाऱ्या आंतरराज्य टोळीचा यवतमाळ पोलीसांनी अवघ्या काही तासांत पर्दाफाश करत दोन आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. या प्रकरणातील आरोपी हे आंध्रप्रदेशातील असल्याचे निष्पन्न झाले आहे.

यवतमाळ शहर पोलीस स्टेशन येथे प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी अशोक खंडुजी भंडारे (वय ७७, रा. सिद्धेश्वर नगर, यवतमाळ) यांनी दिनांक २६ जून रोजी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यांनी स्टेट बँक ऑफ इंडियामधून एक लाख रुपये काढले होते. त्यापैकी ४० हजार रुपये फायनान्स कार्यालयात भरल्यानंतर उर्वरित ६० हजार रुपये गाडीच्या डिक्कीत ठेवले. यावेळी त्यांची मोपेड पंचर असल्याने ते पंचर काढण्यासाठी गेले असता, अनोळखी व्यक्तीने डिक्कीतून पैसे काढून पळ काढला. पुढे काळ्या रंगाच्या युनिकॉर्न दुचाकीवर दुसऱ्या व्यक्तीसह आरोपी पसार झाले. याप्रकरणी शहर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा क्रमांक ६७२/२०२५, कलम ३०९(४), ३(७) भादंवि नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली डिबी पथकाला तसेच नाकाबंदी पथकांना अलर्ट करण्यात आले. पाळत ठेवत असताना माहिती मिळाली की आरोपी दारव्हा दिशेने पळाले आहेत. यानंतर लाडखेड पोलीस स्टेशनच्या ठाणेदार व पथकाच्या मदतीने कारवाई करून केवळ काही तासांतच आरोपींना अटक करण्यात आली. अटक करण्यात आलेले आरोपी प्रविणकुमार मेकाला दास (वय २७) व रोड्डा दासु रोड्डा बाबु (वय ३४), दोघेही रा. बिसुंटा, ता. दारकम, जिल्हा नेल्लोर, आंध्रप्रदेश येथील रहिवासी आहेत. तपासादरम्यान आरोपींनी अशा प्रकारचे तब्बल १० गुन्ह्यांची कबुली दिली आहे.

## पालकमंत्री संजय राठोड यांच्याहस्ते बोरी येथील उड्डाणपूलाचे लोकार्पण



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : दारव्हा तालुक्यातील बोरी अरब गावाजवळ अडान नदीच्या पुलावर बांधण्यात आलेला उड्डाणपुल व पोहोच मार्गाच्या कामाचे लोकार्पण आज पालकमंत्री तथा राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्याहस्ते झाले. २७ कोटी रुपये खर्च करून हा भव्य पुल व पोहोच मार्ग साकारण्यात आला आहे.

बोरी येथे झालेल्या लोकार्पण प्रसंगी सार्वजनिकबांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता सुषमा बोंदरे, उपविभागीय अधिकारी विजय सुर्यवंशी, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा कालिंदा पवार, जीवन पाटील, बांधकामचे कार्यकारी अभियंता शुभम पुरकर, तहसीलदार रवि काळे, पराग पिंगळे, यशवंत पवार, बोरीचे सरपंच लक्ष्मण वांजरेकर, उपसरपंच ओमबाबू लड्डा, छोटी बोरीचे उपसरपंच सतिश शेटे, मनोज सिंघी, भाऊराव ढवळे, बाळासाहेब दौलतकार, पुलाचे कंत्राटदार अब्रार अहमद आदी उपस्थित होते. तब्बल २७ कोटी रुपये खर्च करून हा पुल व पोहोच मार्गाचे बांधण्यात करण्यात आले आहे. या कामामध्ये मुख्य पुलासह पोहोच मार्गाचा समावेश आहे. पालकमंत्री संजय राठोड यांनी पुलाच्या नामफलकाचे अनावरण व फित कापून उद्घाटन केले. गेल्या काही दिवसांपासून नागरिकांना प्रतिक्षा असलेला पुल वाहतुकीस खुला झाल्याने पावसाळ्याच्या दिवसांमध्ये अडान नदीला पुर आल्याने होत असलेली गैरसोय टळण्यासोबतच परिसरातील नागरिकांना वाहतुकीची उत्तम सुविधा निर्माण झाली आहे.

यावेळी पुलाचे कंत्राटदार अब्रार अहमद यांनी पुलाचे काम उत्तमपणे केल्याबद्दल पालकमंत्र्यांच्याहस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. उद्घाटनानंतर पालकमंत्री संजय राठोड यांनी पुलावरुन पायदळ चालत पुल व पोहोच मार्गाची पाहणी केली.

## घाटंजी नगरपरिषद हद्दीतील शेकडो अतिक्रमणधारक पट्टे आणि घरकुलापासून वंचित

### महेश पवार यांचा संवाद कार्यक्रम, हजारो अतिक्रमण धारकाची उपस्थिती लक्षवेधून गेली



जनमाध्यम प्रतिनिधी

घाटंजी - अतिक्रमण धारकांना पट्टे व घरकुल मिळावे यासाठी संवाद कार्यक्रमाचे आयोजन घाटंजी येथील जलाराम मंदिरात सामाजिक कार्यकर्ते महेश पवार आणि अतिक्रमणधारक संघर्ष समितीने आयोजित केलेले होते. या कार्यक्रमाला स्थानिक नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी सुरेशजी डहाके सर माजी तालुकाध्यक्ष, आनंद वैद्य तालुका अध्यक्ष भाजपा पांढरकवडा, सामाजिक कार्यकर्ते महेश पवार, धीरजजी शर्मा, विष्णू नामपेल्लीवार, अनंतराव कटकोजवार, सुभाष देवळे, फारुक नाथिया, हितेश गढीया, गणेश उम्मरकर, रीना धनरे, साधना माहूरवार, पुष्पा नामपेल्लीवार, सुषमा खांडरे, योगिता पवार उपस्थित होते. यावेळी फुटपाथ वर व्यवसाय करणाऱ्या छोट्या व्यावसायिकांना शाल व स्मृतीचिन्ह देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत केंद्र व राज्य सरकारने बेघर कुटुंबांना घर देण्याची महत्त्वकांक्षी मोहीम हाती घेतली आहे. याच अनुषंगाने मंत्रिमंडळाने दिनांक १३ नोव्हेंबर २०१८ च्या बैठकीत राज्यातील महसूल विभागाच्या अखत्यारीतील सर्व प्रकारच्या शासकीय जमिनीवर निवासी प्रयोजनासाठी अतिक्रमण केलेल्या आणि प्रधानमंत्री आवास योजनेसाठी पात्र असलेल्या अतिक्रमण धारकांना या योजनेचा लाभ मिळावा यासाठी शासकीय जमिनीवरती त्यांना अतिक्रमण नियमाकूल करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे त्या संदर्भातले अध्यादेश १७ नोव्हेंबर २०१८ रोजी प्रकाशित करण्यात आला मात्र आजपर्यंत या अतिक्रमण धारकांना जमिनीचे पट्टे व घरकुल मिळालेले नाही हा लढा २०२१ पासून महेश पवार सातत्याने देत आहे. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी अमित प्रधान, गोपाल काळे, प्रीतम हिवाळे, रवी भोजवार, सुरेश गेडाम, उत्तम मेश्राम, सुरेश ढोणे, विष्णु शिंदे, संदीप कुडुमते, विश्वनाथ लोहकरे, प्रदीप बावणे, संतोष ओंकार, निर्मला राठोड, छाया पाटील, गोलू पुरी, सुनिता दरणे, विवेक घोडे, धनंजय भोरे, सागर मोहुर्ले, विजय रामटेके, राहुल गायकवाड, संतोष जीवने, राहुल धांदे, रोहित तेलंगे, संतोष बोरुले आदींनी अथक परिश्रम घेतले.

**अतिक्रमण धारकांसाठी सरकारने २०१८ मध्ये परिपत्रक काढले. यात वेळोवेळी सुधारणाही झाल्या मात्र त्याची अद्यापही अंमलबजावणी झालेली नाही. प्रशासनाणे या परिपत्रकाला केराची टोपली दाखवलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील लाखो अतिक्रमणधारक पट्टे आणि घरकुल पासून वंचित आहे. आम्ही यासंदर्भात लवकरच मुख्यमंत्री यांना भेटणार आहोत. - महेश पवार, सामाजिक कार्यकर्ता घाटंजी**

## यवतमाळ नगरपरिषद कार्यालयावर फाटलेला राष्ट्रध्वज फडकवला

### जागरूक नागरिकाची पोलीस ठाण्यात तक्रार




जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : यवतमाळ नगरपरिषद कार्यालयाच्या इमारतीवर फाटलेला भारतीय राष्ट्रध्वज (तिरंगा) फडकवण्यात आला असून त्यामुळे राष्ट्रध्वजाचा घोर अपमान झाल्याचा प्रकार समोर आला आहे. यासंदर्भात यवतमाळ येथील एका जागरूक नागरिकाने शहर पोलीस स्टेशनमध्ये लेखी तक्रार दाखल करत दोषींवर तत्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

या घटनेचे फोटो आणि व्हिडिओ नागरिकांच्या मोबाईलमध्ये रेकॉर्ड झाले असून, सोशल मीडियावरही या प्रकारबद्दल संताप व्यक्त होत आहे. भारतीय राष्ट्रध्वज हा आपल्या देशाच्या अस्मितेचे, स्वाभिमानाचे प्रतीक आहे. परंतु, नगरपरिषद प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळेच अशा प्रकारे फाटलेला ध्वज इमारतीवर लावण्यात आला असल्याचा आरोप तक्रारकर्त्याने केला आहे. तक्रारीत म्हटले आहे की, फाटलेल्या राष्ट्रध्वजाचे प्रदर्शन हे "प्रतीकांचा अपमान प्रतिबंधक कायदा, 1971" च्या कलम 2 नुसार शिक्षेस पात्र आहे. तसेच भारताचा झेंडा संहिता, 2002 च्या भाग II, कलम 2.2 (b) नुसार, फाटलेला, मळलेला अथवा अशोभनीय स्थितीतील राष्ट्रध्वज फडकवणे हा राष्ट्रध्वजाचा थेट अपमान आहे. पुढील काळात असे प्रकार टाळण्यासाठी नगरपरिषदेस कायदेशीर सूचना द्याव्यात. घटनेनंतर नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून, अनेकांनी सोशल मीडियावरून या प्रकाराचा निषेध नोंदवला आहे. यवतमाळ शहरातील अनेक राष्ट्रप्रेमी नागरिकांनी देखील या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे. दरम्यान, यवतमाळ पोलिसांनी सदर तक्रारीचा तपास सुरू केल्याचे प्राथमिक माहितीवरून समजते.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### ‘रिससिटेशन डायनॅमिक्स ट्रेनिंग सेशन्स’चे आयोजन

**अमरावती-** श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील आपत्कालीन वैद्यकीय विभागा अंतर्गत रिससिटेशन डायनॅमिक्स ट्रेनिंग सेशन्सचे आयोजन अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच विभाग प्रमुख डॉ. पदमाकर सोमवंशी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते.कार्यक्रमाचे नियोजन आणि संचालन डॉ. सुदेश दारवेकर (सहाय्यक प्राध्यापक, आपत्कालीन वैद्यकीय विभाग) यांनी केले. त्यांनी मुद्देसूद समजावून सांगणे आणि प्रत्यक्ष हाताळणी (हँड्स-ऑन ट्रेनिंग) यावर भर देत प्रशिक्षण अधिक प्रभावी बनवले. महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांनी आपत्कालीन सेवा देण्यासाठी अशा जीवनावश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित केले. डॉ. सोमवंशी यांनी युवा डॉक्टरांनी अशा प्रशिक्षण सत्रांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करत आपत्कालीन विभाग अशा उपयुक्त शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन नियमितपणे करत राहील, असे सांगितले. प्रभावी इमर्जन्सी रेस्पॉन्स टीम तयार करण्यासाठी वैद्यकीय व नर्सिंग कर्मचाऱ्यांची समर्पित भूमिका आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. डॉ. रोहिणी यादगिरे यांनी एअरवे मॅनेजमेंट आणि डीफिब्रिलेटर या कार्यशाळांचे यशस्वी संचालन केले. नर्सिंग इन्स्टिट्यूटचे प्राचार्य विवेक वेदा यांनी यावेळी शुभेच्छा दिल्या.स्कील लॅबचे प्रभारी डॉ. सुषमा पांडे यांनी या प्रशिक्षणाचे उपयुक्ततेवर प्रकाश टाकला.संचालन डॉ. सुदेश दारव्हेकर तर डॉ. स्वप्नील पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.उपक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये हर्षदा ठाकरे, वैष्णवी धर्माळे, अजिक्य गावंडे आणि स्कील लॅबच्या कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचे छायाचित्रण राहुल लकडे यांनी केले.



### प्रमिला डोंगरे अ.भा.उपभोक्ता उत्थान संघठनच्या विदर्भ अध्यक्षपदी

**अमरावती-**येथील समाज सेविका प्रमिला डोंगरे यांची अखिल भारतीय उपभोक्ता उत्थान संघठनच्या विदर्भ अध्यक्ष पदावर नियुक्ती महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष विनोद गायकवाड यांनी केली आहे.याप्रसंगी, संघटनेचे राष्ट्रीय महासचिव बाळासाहेब पांडे, महाराष्ट्र उपाध्यक्ष नंदगोपाल पांडे, बुलढाणा जिल्हाध्यक्ष डॉ.ए.आर.वानखडे आदी मान्यवर उपस्थित होते.प्रमिला डोंगरे यांच्या निवडीचे स्वागत आदिवासी हेअर ऑइल परिवाराचे प्रशांत चौधरी, सलीमभाई शेख, अनिल ईखार, मनोहर बठे, कैलास गावनर, हरीश वऱ्हाडे, रामदास वानखडे, दिलीप निघोट, अमोल पाटील, सुभाष डोंगरे, प्रज्ञा मेश्राम,डिंपल झोले, राजश्री बकाले, हिराताई सोनटक्के, चरण झोले आदींनी केले.विदर्भस्तरीय कार्यकारिणी लवकरच गठीत करून ग्राहकांच्या विविध समस्या सोडविण्यात येतील असे प्रतिपादन नवनियुक्त विदर्भ अध्यक्षा प्रमिला डोंगरे यांनी नियुक्ती प्रसंगी केले.



### ‘स्टुडंट इंडक्शन’कार्यक्रम

**मोर्शी-**श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित श्री आर. आर. लाहोटी विज्ञान महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी स्टुडंट इंडक्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनाशी परिचित करून देणे,त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे आणि शैक्षणिक तसेच सामाजिक दृष्टिकोन वाढवणे होते.उदघाटनिय कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी. एन. चौधरी हे तर उद्घाटन म्हणून प्रा. व्ही. डब्लू. अंबाडकर उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. जी. सि. कांबळे, प्रा. डॉ. ए. व्ही. कोहळे कार्यक्रम समन्वयक प्रा. डॉ. व्ही. टी. हुमणे, डॉ. एन. आर. नहाटे व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी. एन. चौधरी यांनी महाविद्यालयीन शिक्षणाच्या संधी, जबाबदाऱ्या आणि नैतिक मूल्यांवर आधारित भाषण दिले.तर प्रमुख अतिथीनि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.संचालनाची जबाबदारी प्रा. डॉ. एस. आर. जयसिंगपुरे तर प्रा. डॉ. एन. आर. नहाटे यांनी आभारप्रदर्शन केले.कार्यक्रम समन्वयक प्रा. डॉ. व्ही. टी. हूमने व प्रा. डॉ. एन. आर. नहाटे यांनी आठवडाभराच्या उपक्रमांचे नियोजन व व्यवस्थापन उत्कृष्टरीत्या पार पाडले.

### तक्षशिला महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवाला प्रारंभ

**अमरावती-**तक्षशिला महाविद्यालय, दारापूर (पूर्वीचे रामकृष्ण महाविद्यालय) याच्या २५ वर्षांच्या यशस्वी शैक्षणिक वाटचालीनिमित्त रौप्य महोत्सवाचे उद्‌घाटन दिनांक २८ जून रोजी महाविद्यालयात उत्साहात पार पडले. संस्थेच्या अध्यक्षा कीर्ती अर्जुन यांच्या संकल्पनेतून आकारलेला हा वर्षभर चालणारा महोत्सव सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांद्वारे ग्रामीण भागाच्या विकासाशी जोडलेला आहे.प्रारंभप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मल्लू पाडवल, उपसरपंच जमील पटेल, विश्वंभर मारके, राजूभाऊ गवई, विनायकराव गवई आणि गावातील अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते. उपेस्थितांनी या उपक्रमासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली. यावेळी ताईंनी सुचवलेल्या पाच कलमी कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याचा निर्धार करण्यात आला. महोत्सवाअंतर्गत वर्षभर पाच महत्त्वाचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. प्रास्ताविक डॉ. यशवंत हरणे, `आभार प्रदर्शन डॉ. अनिल भगत यांनी केले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाणीपुरवठा व स्वच्छतेबाबत न.पं.ठरली कुचकामी

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

नांदगाव शहराला आठ ते दहा दिवसाआड पाणीपुरवठा होत असून त्यातही दूषित पाणीपुरवठा व स्वच्छतेवर नियंत्रण ठेवणारी नगरपंचायतची यंत्रणा पूर्णपणे कुचकामी ठरली असून शहरातील नागरिकांना सोई सुविधा पुरविण्यास नगरपंचायत प्रशासन अपयशी ठरले असल्याचा आरोप नागरिकाकडून होत आहे.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या चांदी प्रकल्पपा मध्ये परिपूर्ण पाणीसाठा असताना सुद्धा नगरपंचायतचे नियोजना अभावी आठ ते दहा दिवसा आड शहराला दूषित पाणीपुरवठा होत आहे तेव्हा नांदगाव वासियांना तीव्र पाणी टंचाईचा सामना करावा लागत असून या पाणीटंचाईच्या प्रश्नावर मे महिन्यात शेकडो महिलांनी शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात नगरपंचायत वर घागर मोर्चा काढला होता. तरीसुद्धा नगरपंचायत प्रशासनाकडून या समस्येची दखल घेण्यात आली नसून पाणीपुरवठ्यामध्ये सुधारणा करण्यात आली नाही. आजही शहराला दूषित पाणीपुरवठा होत असून पाण्याचा दुर्गंध सुद्धा येत आहे याबाबत नगर पंचायतला वारंवार नागरिकांनी तक्रारी देऊनही स्वच्छ पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांत तीव्र असंतोष निर्माण आहे. चांदी प्रकल्पावरून पाणी खंडेश्वर मंदिरावरील जलशुद्धीकरण केंद्रावर येते मात्र सदर पाण्याचे योग्य प्रकारे शुद्धीकरण केले जात नाही व शहरात काही ठिकाणी अनेक दिवसा पासून पाईपलाईन लिकेज असल्याने नागरिकांना नळातून दूषित पाणीपुरवठा येत आहे. असा नागरिकांचा आरोप आहे नगरपंचायत मध्ये प्रशासकीय राजवट असल्याने प्रशासनावर कोणताच वचक नाही त्यामुळे नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविण्यात नगरपंचायत यंत्रणा कुचकामी ठरत असल्याचा आरोप असून पावसाळा सुरू झाला असताना सुद्धा फक्त दर्शनीय भागातीलच नाले साफसफाई करण्यात आली शहरातील नाल्या तुंबड भरल्या असून अनेक जागी अस्वच्छता पसरलेली आहे. थातुर माथुर साफसफाई केली जात असून



मोजक्या कचरा गाडीचे भरोशावर शहराच्या स्वच्छतेची मदार आहे स्वच्छतेच्या नावावर नगरपंचायतचे प्रशासन देखावा करीत असून नगर पंचायत प्रशासकीय यंत्रणा पाणीपुरवठा व स्वच्छता यावर नियंत्रण ठेवण्यास पूर्णपणे कुचकामी व अपयशी ठरली असल्याचा आरोप नागरिकाकडून होत आहे.

> दूषित पाणी पुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त झाले असून शहरातील स्वच्छता सुद्धा परिपूर्ण होत नाही फक्त स्वच्छतेच्या नावावर व पाणी पुरवठ्याचे नावावर महिन्याकाठी लाखो रुपये कंत्राटदाराचे घशात घातले जात असून नागरिकांचे कर वसुलीवर नगरपंचायत फक्त उधळण करीत आहे.
>
> **प्रकाश मारोटकर,**
> विधानसभा समन्वयक, शिवसेना ठाकरे गट



# शेतकऱ्यांना बोगस बियाणांची मिळाली भरपाई

## प्रसन्न काठोळे यांच्या पुढाकाराला यश

**अचलपूर/वार्ताहर**

तालुक्यातील हनवतखेडा येथील शेतकऱ्यांना बोगस बियाणांमुळे झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई मिळवून देण्यात यश आले आहे. या प्रक्रियेत जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे विशेष कार्य अधिकारी योगेश कोठेकर यांनी विशेष सहकार्य केले तर भाजयुमो अमरावती ग्रामीणचे जिल्हाउपाध्यक्ष व सावळी (दा) ग्रामपंचायतीचे उपसरपंच प्रसन्न साहेबराव काठोळे यांनी शेतकऱ्यांच्या मागणीचा पाठपुरावा करत प्रशासनाशी सातत्याने संपर्क ठेवून काम तडीस नेले.

भरपाईच्या रकमेत ज्ञानेश्वर इंगळे यांना २०,००० रुपये,



रोहित घोम १३,००० रुपये, रोशन वऱ्हेकर १३,००० रुपये, रमेश अवतारे १३,००० रुपये, रोशन पुंडकर २०,००० रुपये, सहदेवराव घोम २०,००० रुपये अशा पद्धतीने नुकसान भरपाई वाटप करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी या निर्णयाबद्दल समाधान व्यक्त केले असून, जिल्ह्याचे पालकमंत्री बावनकुळे, विशेष कार्य अधिकारी कोठेकर तसेच प्रसन्न काठोळे यांचे आभार मानले आहेत. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे या निर्णयातून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

### पावसाळी अधिवेशनाच्या कामकाजाकरिता

# तालिका सभाध्यक्ष म्हणून आ.सुलभा खोडके यांच्या नावाची घोषणा

**अमरावती/का.प्र.**

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनासाठी विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी विधानसभेच्या तालिका सभाअध्यक्ष म्हणून जेष्ठ विधानसभा सदस्य आ.सुलभा संजय खोडके यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. पावसाळी अधिवेशनाचे कामकाज चालविण्यासाठी पीठासीन सभाअध्यक्ष अँड.राहुल नार्वेकर यांच्याबरोबरच सभागृह चालविण्यासाठी तालिका अध्यक्ष म्हणून आ.सौ.सुलभाताई संजय खोडके यांचे नाव घोषित झाल्याने सभागृहातील सर्व सदस्यांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी विधानसभेमध्ये मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस, उपमुख्यंमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार देखील उपस्थित होते.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात साधारणत:आठ तासांचे कामकाज चालणे अपेक्षित असते. अर्थातच आठ तास पीठासीन अध्यक्ष त्या खुर्चीवर बसून राहू शकत नाहीत. त्यामुळे अध्यक्ष अनुपस्थित असतील तेव्हा सभागृहाचे कामकाज चालविण्यासाठी तालिका अध्यक्षांचे



एक पॅनल तयार करण्यात येते. या पॅनलवर महाराष्ट्र विधानसभेच्या नियम ८ पोटनियम १ अन्वये तालिका सभाध्यक्ष म्हणून आ. सुलभा खोडके यांच्या नावाची घोषणा केली. महाराष्ट्र विधानसभेवर तिसऱ्यांदा निवडून आल्या असून एक अभ्यासू व विधानसभेच्या कामकाजही उत्तम जाण असलेल्या जेष्ठ सदस्य म्हणून सुद्धा त्यांची सभागृहात ओळख आहे.आमदार सुलभा खोडके यांची पावसाळी अधिवेशनाच्या तालिका सभाध्यक्ष म्हणून घोषणा झाली असून पीठासीन अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अनुपस्थितीत त्या अधिवेशनाचे कामकाज सांभाळणार आहे.

# वाढत्या चोरीला अंकुश लावण्यासाठी पुकारलेल्या उपोषणाची सांगता

**अचलपूर/वार्ताहर**

वणी बेलखेडा येथे जनावरे व शेती यंत्राच्या वाढत्या चोरीला अंकुश लावण्यासाठी पोलीस प्रशासनाविरोधात ग्रामस्थांनी पुकारलेल्या उपोषणाची आ.प्रवीण तायडे यांच्या मध्यस्थीने सांगता झाली.उपोषणस्थळी अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी उपोषण कर्त्यांची भेट घेऊन अमरावती जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्याशी चर्चा करून पोलीस प्रशासनाने दिलेल्या लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे घेतले.

यामध्ये उपोषणकर्ते मुकेश म.अलोने, आशिष प्र. पाटील, मुकेश ब. पाटील, गुणवंतराव ना. अलोने यांच्या शी आ.प्रवीण



तायडे यांनी २८ जून रोजी भेट घेतली .यावेळी आमदार प्रवीण तायडे यांनी उपोषणकर्त्यांच्या सर्व मागण्या जाणून घेऊन तत्काळ अमरावती जिल्हा ग्रामीण पोलीस अधिक्षक विशाल आनंद यांना फोन करून उपोषणकर्त्याच्या सर्व समस्या तातडीने सोडण्याचे आदेश दिले .यानंतर २९ जून रोजी चांदुर बाजार चे तहसीलदार रामदास शेळके व ब्राह्मणवाडा थडी पोलीस स्टेशन चे ठाणेदार प्रशांत जाधव यांनी उपोषणकर्त्यांना कारवाई संदर्भात लेखी स्वरुपात आश्वासन दिले. यानंतर उपोषणकर्त्यांना निंबू पाणी देऊन त्यांचे उपोषण मागे घेतले. यावेळी आमदार प्रवीण तायडे यांचे प्रतिनिधी व भाजपा पक्षाचे नेते प्रमोद कोरडे, गजानन कोल्हे, नरेश बर्वे, अभिजित तायडे, माधव अवघड, सुरेश वानखडे, भाजप तालुकाध्यक्ष हर्षल धुळे, तालुकाध्यक्ष रमेश तायवाडे, तसेच सौ.अक्षराताई लहाने, अनिकेत वाठ, आशिष मेहेत्रे, अमोल गावंडे शाखाध्यक्ष भा.ज.पा. वनी बेलखेडा, चंद्रशेखर खाडगळे, दीक्षित खाजोने, अजिंक्य चुनडे, गोलू अर्डक, प्रवीण कोठाळे, सागर शिरभाते, पंकज वरठी, मोंटू दाभाडे, सतीश गहलोत, बाळासाहेब अलोणे, गोपाल अलोणे तसेच गावकरी व भाजपा कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# पाच वर्षांच्या पाठपुराव्याने मंजूर झाले येवदा येथे ग्रामीण रुग्णालय

**अमरावती/का.प्र.**

येवदा तालुका दर्यापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन अखेर पाच वर्षाच्या अविरत पाठपुराव्याने ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयात झाले आहे. याकरिता उबाठा गटाचे जिल्हा समन्वय प्रदीप वडतकर यांची संघर्षमय वाटचाल उल्लेखनीय ठरली आहे.



दर्यापूर तालुक्यातील सर्वात मोठे प्राथमिक आरोग्य केंद्र म्हणून येवदा या आरोग्य केंद्राचा समावेश होतो. या आरोग्य केंद्र अंतर्गत परिसरातील दहा ते बारा गावे आरोग्याच्या दृष्टीने जोडली गेली आहेत. तीस खाटांचे ग्रामीण रुग्णालय व्हावे याकरिता उबाठा गटाचे जिल्हा समन्वय प्रदीप वडतकर यांनी १० जुलै २०१७ रोजी जिल्हा शल्य चिकित्सक यांना निवेदन सादर केले होते. तदनंतर सतत पाच वर्ष जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य उपसंचालक, आरोग्य सेवा सहसंचालक, आरोग्य विभागाचे अप्पर मुख्य सचिव,आरोग्य विभागाचे आयुक्त व आरोग्यमंत्री यांचे स्तरावर अविरत पत्रव्यवहार व पाठपुरावा केल्याने अखेर २२ ऑगस्ट २०२३ रोजी शासनाने येवदा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन तीस खाटाच्या ग्रामीण रुग्णालयात केले आहे.

### वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

**अमरावती-**लॉन्स क्लब अमरावती इंद्रपुरीचे माजी अध्यक्ष व विविध पदे लायनिजाम मध्ये भूषवणारे प्रदीप राजा यांचा ६९ वा वाढदिवस विविध उपक्रमांनी भक्तिधाम येथे साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रदीप राजा व त्यांच्या पत्नी नायनाबेन राजा यांचा गुजराती समाजाचे हसमुख कारिया यांच्या हस्ते शाल व पुस्तक प्रदान करून साजरा करण्यात आला.कार्यक्रमास लालचंद गुप्ता, सोनाला बेन, पोपट अमृतभाई पटेल मनीकांत दंड शैलेश कारिया पांडुरंग भाऊ, बंडूभाऊ पाटील रामप्रकाश गिल्डा विवेक सहस्त्रबुद्धे घनश्याम नागरेचा मनीष व गुंजन तेली, दिलीप करवा, सुभाष गावपांडे, सुरेश राजा, रमेश लड्ढा ,शिवकिरण भट्टड, प्राचार्य डॉ. गोकुळदास सारडा हजर होती.

# डॉ.राजेश उमाळे यांनी दिल्या ग़ज़लगायकीच्या टिप्स

## सुस्वर संगीत कला अकादमीतर्फे गायन कार्यशाळा

**अमरावती/का.प्र.**

सुस्वर संगीत कला अकादमी कराडच्या वतीने नुकतेच ग़ज़लगायन सप्रयोग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.‘ग़ज़ल- सुगम संगीत व उपशास्त्रीय संगीतातील विधा’, असा कार्यशाळेचा विषय होता. ऑनलाइन पद्धतीने झालेल्या या कार्यशाळेत एकूण ५० विद्यार्थी सहभागी झाले होते. सुरवातीला सुस्वर कला अकादमीच्या अध्यक्ष असलेल्या शास्त्रीय गायिका स्वागता पोतनीस यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील उद्दिष्ट विषद करून सांगितले. याप्रसंगी काही निवडक ग़ज़लांचे सादरीकरण अमरावतीचे लोकप्रिय ग़ज़ल गायक ग़ज़लरत्न राजेश उमाळे यांनी केले. काही मराठी तर काही उर्दू गजला कशा गाव्यात याचे त्यांनी प्रात्यक्षिक केले. ग़ज़ल गायकीचे वेगळेपण विषद करताना ते म्हणाले की, ग़ज़लचे वर्गीकरण चार उपप्रकारात होते रिवायती म्हणजे पारंपरिक विषय हाताळणारी ग़ज़ल,

तरक्की पसंद म्हणजे सुधारणावादी ग़ज़ल, जदीद म्हणजे आधुनिक ग़ज़ल आणि राजकीय सामाजिक विषयावर विनोदप्रधान किंवा व्यंगात्मक स्वरप्रधानता असलेली हजल. गायकी ही शास्त्रीय संगीतासाठी गायली जाते मात्र ग़ज़ल गायकी निर्माण करणाऱ्या ज्येष्ठ श्रेष्ठ कलाकारांनी शास्त्रीय गायकीपेक्षा वेगळी केली असली तरी ती इतर उपशास्त्रीय संगीत प्रकाराप्रमाणे नसून तिची शैली भिन्न असल्याचे दिसून येते, असे ते म्हणाले. सुगम ग़ज़ल आणि रागांवर आधारित ग़ज़ल गायकीचे दोन प्रकार दिसून येतात. ग़ज़ल गायकी म्हणजे केवळ स्वरगायन नसून त्या गायनात राग, प्रकृती, त्याचे चलन, आरोह-अवरोह, रागाची जाती, अविर्भाव, तिरोभाव, सरगम, लयकारी इत्यादी सांकेतिक घटकांचा विचार होणे महत्त्वाचे असते असे त्यांनी सांगितले. ग़ज़ल गायन प्रभावी होण्यासाठी प्रथम त्या ग़ज़लमधील काव्याचा भावार्थ समजून ती स्वरबद्ध करून गाण्याचा प्रयत्न करणे हे कसब त्या गायकाचे असते, असे मत डॉ. राजेश उमाळे यांनी मांडले. या कार्यशाळेतून विद्यार्थ्यांना ग़ज़ल



गायकीचा समर्पक टिप्स त्यांनी दिल्या. कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांच्या अनेक प्रश्नांचा उलगडा डॉ. राजेश उमाळे यांनी केला. सुरेश भटांच्या ‘इतकेच मला जाताना सरणावर कळले होते’, या ग़ज़लेने कार्यशाळेचा समारोप झाला. त्यांना तबला संगत राकेश जेडियार यांनी केली.

**भारताने २०४७ पर्यंत २०० ते ३०० ट्रिलियन डॉलरपर्यंतची अर्थव्यवस्था होण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी केवळ पारंपरिक पद्धतींवर नव्हे, तर नवकल्पनांवर आधारित तंत्रज्ञानावर भर देणे आवश्यक आहे. यासंदर्भात कृत्रिम बुद्धिमत्ता हे एक असे क्षेत्र आहे ज्याच्या वापरामुळे उत्पादनक्षमता, कार्यक्षमता, मानवी श्रमाची बचत आणि निर्णयक्षमता यामध्ये अभूतपूर्व वाढ शक्य होते. या सर्जनशील बदलात शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत असून, विशेषतः अभियंता शिक्षण हे बदलाच्या केंद्रस्थानी आहे व राहील.**

# एआय भरारीचे विस्तारते अवकाश




परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे, असे म्हटले जात असले तरी जीवन व्यवहारात आणि भौतिक गोष्टींमध्ये, अर्थकारणामध्ये होणारी परिवर्तने घडताना आणि स्वीकारताना त्यामध्ये आपण कशाप्रकारे, किती प्रमाणात सहभागी होतो, यावर आपल्याला मिळणारे फायदे-तोटे ठरत असतात. उदाहरणार्थ, नव्वदीच्या दशकामध्ये भारतामध्ये संगणक क्रांतीची सुरुवात झाली, तेव्हा अनेकांनी त्यावर टीकाटिपणी करून त्याला विरोध करण्यामध्ये आपली शक्ती खर्च केली. याउलट ज्यांना या अद्भुत साधनाचे महत्त्व उमगले आणि ज्यांनी या परिवर्तनामध्ये स्वतःला झोकून दिले त्यांनी वेगाने प्रगतीची शिखरे गाठली. हा पूर्वेइतिहास गाठीशी असल्यामुळे आज कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या परिवर्तनकारी लाटेबाबत भारतीय अत्यंत सक्रियतेने सहभागी होताना दिसताहेत. इतिहासातील चुकांमधून धडा घेऊन वर्तमानात त्या चुका टाळण्याचा जो प्रयत्न करतो त्याचा भविष्यकाळ उज्ज्वल असतो. त्यानुसार वर्तमानातील एआय क्रांतीमध्ये भारत हा जगातील सर्वात वेगाने प्रगती करणारा देश ठरत असून, त्याचा प्रगत तंत्रज्ञानातील सहभाग दिवसेंदिवस बळकट होत आहे. या क्षेत्रामध्ये भारताने गेल्या काही वर्षांमध्ये भरीव प्रगती केली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे केवळ संगणकीय गणना किंवा मशिन लर्निंग नव्हे, तर ती एक व्यापक परिवर्तनाची लाट आहे, जी संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेवर आणि विशेषतः भारतासारख्या विकसनशील देशावर खोल परिणाम घडवत आहे. एकेकाळी विज्ञानकथांपुरती मर्यादित असलेली ही संकल्पना आज व्यवहारातील प्रत्येक क्षेत्रात जिवंत वास्तव ठरत आहे.

भारतासारखा देश, ज्याची लोकसंख्या १४० कोटींवर पोहोचलेली आहे, जिथे ७० कोटींहून अधिक इंटरनेट वापरकर्ते आहेत आणि जिथे यूपीआय, आधार, डिजिलॉकर, ओएनडीसीसारखी डिजिटल पायाभूत साधने तयार आहेत, त्या देशासाठी एआयच्या विस्ताराला गती मिळण्यासाठी अनुकूलता आहे. त्यामुळेच आज एआयच्या क्षेत्राच्या केवळ उद्योगधंदेच नव्हे, तर शिक्षण, आरोग्य, कृषी, प्रशासन, सुरक्षा आणि दैनंदिन जीवनाचेही स्वरूप झपाट्याने बदलत आहे. मध्यंतरी, केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती-तंत्रज्ञान मंत्रालयाने सादर केलेल्या ‘भारताची कृत्रिम बुद्धिमत्ता क्रांती : विकसित भारताकडे जाणारा मार्ग’ या अहवालानुसार, २०२६ पर्यंत भारताला सुमारे १० लाख प्रशिक्षित एआय तज्ज्ञांची गरज भासणार आहे.

भारताने २०४७ पर्यंत २०० ते ३०० ट्रिलियन डॉलरपर्यंतची अर्थव्यवस्था होण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी केवळ पारंपरिक पद्धतींवर नव्हे, तर नवकल्पनांवर आधारित तंत्रज्ञानावर भर देणे आवश्यक आहे. यासंदर्भात कृत्रिम बुद्धिमत्ता हे एक असे क्षेत्र आहे, ज्याच्या वापरामुळे उत्पादनक्षमता, कार्यक्षमता, मानवी श्रमाची बचत आणि निर्णयक्षमता यामध्ये अभूतपूर्व वाढ शक्य होते. या सर्जनशील बदलात शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत असून, विशेषतः अभियंता शिक्षण हे बदलाच्या केंद्रस्थानी आहे. अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषदेच्या आकडेवारीनुसार, २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी बी.टेक. अभ्यासक्रमासाठी मंजूर झालेल्या जागांची संख्या मागील चार वर्षांच्या तुलनेत १६ टक्क्यांनी वाढली आहे. या वाढीमध्ये संगणक विज्ञान आणि एआय, यंत्राधिष्ठित शिक्षण, माहितीशास्त्र, सायबर सुरक्षा, आभासी संगणन व ब्लॉकचेन इत्यादी क्षेत्रांत ५० टक्क्यांहून अधिक वाढ झालेली आहे. ही वाढ उद्योगधंद्यांच्या वाढत्या मागणीशी थेट संबंधित आहे. आजची शिक्षण पद्धती केवळ विषयकेंद्रित राहिलेली नसून, ती आता आंतरशाखीय स्वरूपात विकसित होत आहे. विज्ञान-तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित या शाखांमध्ये आता कला, मानवशास्त्र, मानसशास्त्र, विधिशास्त्र आणि व्यवस्थापनशास्त्र यांचाही समावेश होऊ लागला आहे. यामुळे एआयशी निगडित विद्यार्थी केवळ कोड लिहिणारे नव्हे, तर विचार करणारे, संकल्पनांची उभारणी करणारे आणि समाजहितासाठी नवकल्पना राबवणारे नेतृत्ववर्ग म्हणून घडत आहेत.

अलीकडेच, बोस्टन कन्सल्टिंग ग्रुप (बीसीजी) चा एक अहवाल प्रसिद्ध झाला असून, त्यातून भारतातील एआय बाजारपेठेतील क्रांतिकारी बदलांवर विस्ताराने प्रकाश टाकण्यात आला आहे. या अहवालात म्हटले आहे की, २०२७ पर्यंत भारतातील आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) बाजारपेठ ३ पटीने वाढून १७ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. भारतातील एआयमध्ये वाढती गुंतवणूक, स्टार्टअप्सची लाट, डिजिटल सिस्टीम आणि मजबूत टॅलेंट बेस, यामुळे एआय बाजारपेठेचा वेग वाढला आहे. जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या एआय बाजारपेठांपैकी एक म्हणून भारतातील एआय बाजारपेठेकडे पाहिले जात आहे. सद्यस्थितीत भारताकडे एआय क्षेत्रातील १६ टक्के मनुष्यबळ असून, याबाबत भारत अमेरिकेनंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. अहवालात म्हटले आहे की, सध्या भारतात ६ लाखांहून अधिक एआय व्यावसायिक आहेत. २०२७ पर्यंत त्यांची संख्या वेगाने वाढून १२.५ लाख होण्याची शक्यता आहे. २०२५ पर्यंत भारतात ४५ नवीन डेटा सेंटर्स तयार होणार असून, यामुळे १०१५ एमडब्ल्यू इतकी अतिरिक्त संगणकीय क्षमता तयार होईल. सरकारच्या एआय मिशन इंडियांतर्गत १०,००० कोटींची गुंतवणूक केली जात आहे. या माध्यमातून १०,००० हून अधिक जीपीयूंचा राष्ट्रीय क्लस्टर तयार केला जाईल, जो संशोधन, प्रशिक्षण आणि नवकल्पनांसाठी अत्यंत उपयुक्त ठरेल.

सध्या भारतात ४,५०० पेक्षा अधिक एआय स्टार्टअप्स कार्यरत असून, त्यापैकी तब्बल ४० टक्के केवळ गेल्या ३ वर्षांत स्थापन झाले आहेत. आरोग्यसेवा, कृषी, वाहतूक, शिक्षण, फिनटेक, रिटेल, मीडिया आणि लॉजिस्टिक्स यासारख्या क्षेत्रांमध्ये हे स्टार्टअप्स एआयद्वारे स्थानिक समस्या सोडवत आहेत. उदाहरणच घ्यायचे झाल्यास, आज बँका व विमा कंपन्या ग्राहकांची पतक्षमता मोजण्यासाठी एआय वापरत आहेत. एआयच्या साहाय्याने अंडररायटिंग प्रक्रियेचा कालावधी सुमारे ७० टक्क्यांनी कमी झाला आहे. यामुळे सूक्ष्मकर्ज आणि कमी हप्त्यातील विमा अशा योजना ग्रामीण व दुर्लक्षित घटकांपर्यंत पोहोचल्या आहेत. कर्ज फसवणुकीचा भविष्यकालीन अंदाज लावण्यासाठी प्रेडिक्टिव्ह एआयचा वापर केला जात आहे. अशाच प्रकारे किरकोळ विक्री व ई-कॉमर्सच्या क्षेत्रात वैयक्तिकृत उत्पादन शिफारसींमुळे ग्राहकांचा कन्व्हर्जन रेट १०-१५ टक्क्यांनी वाढला आहे. शिक्षणाच्या क्षेत्रात आज अनेक एआय ट्यूटर व अ?डॅप्टिव्ह लर्निंग प्लॅटफॉर्म्स ग्रामीण व स्थानिक भाषांतील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत. अनेक एज्युटेक कंपन्यांना ३०-४० टक्के नवीन ग्राहकवाढ ही टियर २-३ शहरांतून झाली आहे. एआय निदान प्रणाली आणि दूरस्थ सल्ला देणाऱ्या टूल्समुळे आरोग्यसेवा ग्रामीण भागामध्ये पोहोचली आहे.

देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असणाऱ्या कृषी क्षेत्रातही एआयचा वापर झपाट्याने वाढला आहे. भारताची ५० टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. आजवर पारंपरिक पद्धतीने शेती करणाऱ्या अन्नदात्या शेतकऱ्याला आता आधुनिक तंत्रज्ञानाची जोड लाभल्याने अनेक बाबतीत परिवर्तन घडताना दिसत आहे. काही स्टार्टअप्स शेतकऱ्यांना रिअल-टाईम सल्ला, बाजारभाव, खरेदी-विक्री विश्लेषण देत आहेत. पीक उत्पादनाचा अंदाज घेण्यासाठी सॅटेलाईट डेटा व एआय संगणन यांचा वापर केला जातो. कृषी विमा, मायक्रो-क्रेडिट यासाठी शेतकऱ्यांचे डिजिटल प्रोफाईल एआयद्वारे तयार होताहेत. याचाच अर्थ जवळपास सर्वच क्षेत्रामध्ये एआयचा सहभाग कसा करून घेता येईल आणि त्याआधारे वेळ, श्रम आणि पैसा यामध्ये बचत करून कार्यक्षमता व परिणामकारकता कशाप्रकारे वाढवता येईल, यासाठी खूप मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू आहेत. एआय हा एक ‘मार्जिनल प्रोजेक्ट’ नसून, ‘कोअर ड्रायव्हर’ आहे. त्यामुळे उद्योगांनी एआयला केवळ साहाय्यक प्रणाली म्हणून न पाहता, संपूर्ण मूल्यसाखळीतील बदल घडवणारा केंद्रबिंदू म्हणून पाहायला हवे. आजच्या काळात वेग हे अस्तित्व टिकवण्याचे साधन आहे. एआयच्या स्पर्धेत जो लवकर शिकेल, प्रयोग करेल आणि सुधारेल, तोच टिकेल. आज भारत केवळ एआय ग्राहक नाही, तर तो एआय सोल्यूशन्सचा उगमस्थान ठरत आहे; पण एआयचा फायदा ग्रामीण, अल्पसंख्याक, महिला व समाजाच्या दुर्बल घटकांपर्यंत पोहोचला पाहिजे.

भारताने आपल्या संधी योग्यरीतीने ओळखल्या आणि स्थानिक गरजांवर आधारित, न्याय्य व जबाबदारीपूर्ण एआयचा विकास केला, तर तो केवळ जगाचे अनुकरण करणारा देश राहणार नाही, तर एआयचे आंतरराष्ट्रीय आराखडे ठरवणारा देश बनेल. कृत्रिम बुद्धिमत्ता बाजारपेठेतील झपाट्याने होत असलेली वाढ नव्या जागतिक अर्थव्यवस्थेची नांदी ठरत आहे. उद्योग, शेती, आरोग्य, सेवा क्षेत्र, तसेच इतर अनेक क्षेत्रांमध्ये एआयचा जास्तीत जास्त वापर झाल्यास भारताला २०३० पर्यंत सुमारे ३३.८ लाख कोटी रुपयांचा आर्थिक फायदा होऊ शकतो. ‘बीसीजी’च्या अहवालात म्हटल्यानुसार, एआयकडे व्यापक आणि जबाबदारीपूर्ण दृष्टिकोनातून पाहिल्यास भारतात आर्थिक प्रगतीसह सामाजिक विकासही साधता येईल.

असे असले तरी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या शर्यतीत भारत जेव्हा जागतिकस्तरावर स्पर्धा करत आहे, तेव्हा काही धोरणात्मक बाबी महत्त्वाच्या असून, त्यांचाही विचार केला गेला पाहिजे. उद्योग-व्यवसायांमध्ये एआयचा वापर वाढत असला, तरी केवळ एकेरी प्रकल्प नव्हे, तर संपूर्ण व्यवसायाच्या केंद्रस्थानी एआय असणे आवश्यक आहे. शासकीय योजना व खासगी क्षेत्रातील कौशल्य व तंत्रज्ञान यांचा मिलाफ होणे गरजेचे आहे. सर्वात कळीचा मुद्दा म्हणजे एआय वापरतानाच वैयक्तिक माहितीचे संरक्षण अत्यंत आवश्यक आहे. भारतातील डिजिटल कायदे, डेटा संरक्षण विधेयक व नैतिक निकष अधिक स्पष्ट व कठोर असले, तरी सध्याच्या सायबरविश्वात हॅकर्सचा धुमाकूळ वाढतो आहे. दुसरीकडे, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील दिग्गज कंपन्यांच्या विश्वासार्हतेबाबतही ठामपणे सांगता येत नाही. अशा स्थितीत एआयच्या लाटेवर स्वार होताना वैयक्तिक आणि गोपनीय माहितीच्या सुरक्षिततेबाबत भान हरपून चालणार नाही.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे रोजगार. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम २०२५ च्या अधिवेशनात प्रकाशित झालेल्या ‘भविष्यातील नोकऱ्या’ या अहवालात नमूद करण्यात आले आहे की, २०३० पर्यंत जगभरात १७ कोटी नव्या एआय नोकऱ्या निर्माण होतील; पण त्याच वेळी ९.२ कोटी पारंपरिक नोकऱ्या नष्ट होतील याचाही उल्लेख आहे. तसेच, हे अंदाजात्मक आकडे आहेत. प्रत्यक्षात एआय जसजसे प्रगत होत जाईल तसतसे ते अधिकाधिक प्रमाणात नोकऱ्यांवर गदा आणणारे ठरेल, असे जगभरातील अभ्यासकांचे म्हणणे आहे. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने वेगाने विकास करत असताना उद्योग-व्यवसायांचा विस्तार वाढेल, पसारा वाढेल, पुरवठा गतिमान होईल; पण त्यातुलनेत रोजगारनिर्मिती पुरेशा प्रमाणावर होणार नसेल तर अशा विकासातून प्रगती साधली असे म्हणता येईल का? तसेच एआयच्या क्षेत्रात होणाऱ्या रोजगारनिर्मितीबाबत आज केले जाणारे दावे उद्या कायम राहतील, असे ठामपणाने सांगता येत नाही. याचे कारण मुळातच एआय हे तंत्रज्ञान जसजसा वापर वाढेल तसतसे विकसित होत जाणार आहे आणि रोजगारनिर्मितीसाठी ही बाब धोकादायक आहे. कारण, एआय टूल्स ही केवळ सर्च इंजिन्स नाहीत. ती जनरेटिव्ह एआय, प्रेडिक्टिव्ह एआय आदींच्या माध्यमातून अधिक प्रगत होत जात आहेत. या प्रगतीचा वेध घेणारे, त्याहून अधिक प्रगत असणारे, कौशल्याधिष्ठित मनुष्यबळ तयार करणे हे आपल्यापुढील सर्वात मोठे आव्हान असेल. तसेच, एआय ही संधी असली तरी ते धोका होऊ नये यासाठी नैतिक चौकटी, पारदर्शक डेटा वापर, पूर्वग्रह निर्मूलन आणि मानवी हस्तक्षेप कायम ठेवणे गरजेचे आहे; अन्यथा, ही प्रगती विषमतेला खतपाणी घालू शकते.

**● डॉ. योगेश प्र. जाधव**

---



# आठवणी आणीबाणीच्या!

आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी १८ जानेवारी १९७७ रोजी अचानकपणे लोकसभा निवडणुकांची घोषणा केली.त्यांचा हा निर्णय सर्वांनाच आश्चर्यचकित करणारा होता.त्यांनी आणीबाणी जारी केली तेंव्हा देशातील जनतेला जो धक्का बसला होता, त्यापेक्षा जास्त धक्का त्यांनी लोकसभा निवडणुकांची घोषणा केल्यानंतर देशातील जनतेला बसला.विरोधी पक्षाच्या नेत्यांचा तर त्यावर विश्वासच बसला नव्हता.तुरूंगात असलेल्या विरोधी पक्षाच्या काही नेत्यांनी इंदिरा गांधी यांचे रेडिओ वरील भाषण ऐकले नव्हते, त्यामुळे तुरूंगाचे? दरवाजे उघडून त्यांची जेंव्हा सुटका झाली तेव्हा त्यांना आश्चर्याचा सुखद धक्का बसला.

इतकेच नव्हे तर इंदिरा गांधी यांच्या काही सहकाऱ्यांनाही त्याची माहिती नव्हती, त्यामुळे तेही आश्चर्यचकित झाले.फेब्रुवारी १९७७ मध्ये जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीच्या रामलीला मैदानात विरोधी पक्षांची जी सभा झाली तीला उपस्थित असलेला प्रचंड जनसमुदाय पाहता, लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे काय होणार याचा अंदाज सर्वांनाच आला होता.

२ फेब्रुवारी १९७७ रोजी इंदिरा गांधी यांना आणखी एक धक्का बसला.इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळातील त्यांचे निकटचे सहकारी जगजीवन राम यांनी अचानकपणे आपल्या मंत्रिपदाचा तसेच पक्षाचा राजीनामा देऊन इंदिरा गांधी यांना अनपेक्षित धक्का दिला.त्यांच्याबरोबरच उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री हेमवतीनंदन बहुगुणा आणि ओरिसाच्या माजी मुख्यमंत्री नंदिनी सत्पथी यांनी पक्षाचा त्याग केला.त्यांच्या पक्षत्यागामुळे वारे कोणत्या दिशेने वाहत आहेत याचा अंदाज सर्वांना आला.कॉंग्रेसमधून बाहेर पडल्यानंतर वरील नेत्यांना’ कॉंग्रेस फॉर डेमॉक्रसी’ या पक्षाची स्थापना केली आणि आपला पक्ष जनता पक्षाबरोबर आघाडी करणार असल्याचे जाहीर केले.

या पार्श्वभूमीवर लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेसचा दारुण पराभव होणार हे मतदानाअगोदरच निश्चित झाले होते.२० मार्च १९७७ रोजी जेंव्हा निवडणुकीचे निकाल बाहेर येऊ लागले तेंव्हा पहिल्या तासातच काँग्रेसचा मोठा पराभव होणार याचा अंदाज आला.दक्षिण भारताने काँग्रेसची लाज राखली, मात्र उत्तर भारतात काँग्रेसचा पुर्णपणे सफाया झाला.उत्तर भारतात काँग्रेसला एकही जागा जिंकता आली नाही.इंदिरा गांधी यांचा रायबरेलीतून तर संजय गांधी यांचा अमेथीतून पराभव झाला.

इंदिरा गांधी यांचे विशेष सहाय्यक मोहंमद युनूस यांनी आपल्या’ परसन्स पॅशन्स आणि पोलिटिक्स ’या आपल्या पुस्तकात इंदिरा गांधी यांचा निवडणुकीत पराभव झाल्यानंतरचा घटनाक्रम मोठ्या रोचकतेने मांडला आहे.इंदिरा गांधी या त्यांच्या रायबरेली मतदार संघातून निवडणूक हरत असल्याचे संकेत १९ मार्च रोजी दुपारी चार वाजता मिळाले होते.एका बातमी नुसार इंदिरा गांधी या त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी राजनारायण यांच्या बऱ्याच मागे पडत चालल्या होत्या.ही बातमी पंतप्रधानांचे खाजगी सचिव धवन यांनी पंतप्रधानांच्या निवासातील एका खोलीत येऊन सांगितली.त्यावेळी त्या खोलीत इंदिरा गांधी, मोहंमद युनूस आणि इंदिरा गांधी यांची नातवंडे असे सर्वजण बसले होत. मोहंमद युनूस लिहितात की, आम्हाला ती बातमी ऐकून आश्चर्याचा धक्काच बसला.परंतु त्याही परिस्थितीत न डगमगता इंदिरा गांधी यांनी धवन यांना सांगितले की, त्यांनी रायबरेली येथे फोन करून तिथे नक्की काय परिस्थिती आहे हे जाणून घ्यावे.रात्री आठ वाजता इंदिरा गांधी या मोठ्या मताधिक्याने हरणार हे नक्की झाले, तेंव्हा मोहंमद युनूस हे तिथेच होते.इतक्या वर्षांचा इतिहास सरकन त्यांच्या डोळ्यासमोर आला.युनूस पुढे लिहितात की इंदिरा गांधी यांनी माझ्याकडे पाहून स्मितहास्य केले आणि म्हणाल्या,तू राजकारणात नसल्यामुळे तुला आता हायसे वाटत असेल.

तेवढ्यात एक सामाजिक कार्यकर्त्या आणि पंतप्रधानांच्या कुटुंबाशी निकटचे संबंध असलेल्या,पुपूल जयकर आत आल्या.त्या खूपच खचलेल्या वाटत होत्या.इंदिरा गांधी यांनी त्यांची समजूत काढत म्हटलं की, असं कधी कधी घडतं.तू खचून जाऊ नकोस.त्यावर डोळ्यात पाणी आणून पुपूल जयकर उत्तरल्या की, इंदू,ते ठीक आहे,पण ते तुझ्या बाबतीत घडायला नको होते.

युनूस यांनी पुढे लिहिले आहे की, त्यानंतर आम्ही ड्रॉइंग रुममध्ये त्याबाबत काही काळ चर्चा केली.नंतर सोनिया गांधी आम्हाला डायनिंग रूमकडे घेऊन गेल्या.तेथे इंदिरा गांधी या स्वस्थपणे जेवत होत्या.इतरांचे मात्र जेवणाकडे लक्ष नव्हते.इंदिरा गांधी या मनातल्या मनात पुढील हालचालींचा विचार करत असाव्यात.रात्री साडेदहा वाजता केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक बोलावण्यात आली.त्या बैठकीत आणीबाणी उठवण्यात आली.बैठक मध्यरात्री संपली.तो पर्यंत इंदिरा गांधी यांच्या निवडणुकीतील पराभवावर शिक्कामोर्तब झाले होते.

रात्री अकरा वाजता संजय गांधी आणि त्यांची पत्नी मनेका गांधी हे अमेथीहून परत आले.संजय गांधी यांचाही अमेथी मतदारसंघातून पराभव झाला होता.मध्यरात्री राजकारणी लोक आपापल्या घरी परतले.मात्र रात्री दोन वाजता इंदिरा गांधी यांच्या भोवती कॅबिनेट सेक्रेटरी,होम सेक्रेटरी आणि इतर खासगी सचिवांचा घोळका कायम होता.त्या पटापट कागदपत्रांवर सह्या करत होत्या, चर्चा करत होत्या, अधिकाऱ्यांशी बोलत होत्या, मध्येच आपल्या कुटुंबातील व्यक्तींशी बोलत होत्या.निवडणूक हरल्यामुळे निर्माण होणाऱ्या निराशेचा लवलेशही त्यांच्या चेहऱ्यावर दिसत नव्हता.

मोहंमद युनूस जेंव्हा पहाटे परत इंदिरा गांधी यांच्या निवासस्थानी गेले तेंव्हा त्यांनी पाहिले की घरातील सर्वजण अगोदरच उठून सामानाची बांधाबांध करत होते.इंदिरा गांधी यांनी घरातील सर्वांना सक्त सूचना दिल्या होत्या की आपण आता इथे एक क्षणही राहणे इष्ट ठरणार नाही.१२, विलिंग्डन क्रिसेंट हे निवासस्थान इंदिरा गांधी यांना उपलब्ध करून देण्यात आले होते.या नवीन जागेत सुध्दा इंदिरा गांधी यांना भेटण्यासाठी रोज बरेच लोक येत असत.

**● अभय गोखले**

---

# डॉक्टर्स डे : जिद्द आणि सर्मपणाचे एक उदाहरण

ज्यांच्या हातात स्कॅलपेल आहे, पण मनात करूणा आहे. ज्याचे ध्येय केवळ उपचार नाही, तर जिवन वाचवणे आहे... असे देवदूत म्हणजे डॉक्टर! आठवा तो करोनाचा भयानक काळ, जेव्हा लोक घरात बंद होते आणि डॉक्टर स्वत:च्या जीवाची पर्वा न करता रात्रंदिवस रुग्णांवर उपचार करुन त्यांचे प्राण वाचवत होते, डॉक्टरांचे हे योगदान खरच कौतुकास्पदच आहे. डॉक्टर्स रुग्णांना आपले कुटुंब मानतात आणि शेवटच्या क्षणापर्यंत त्यांचे प्राण वाचवण्याचा प्रयत्न करतात. जर तुम्हाला धर्माचे पालन करायचे असेल तर डॉक्टरांकडून शिका, तो धर्मात कोणाचाही जीव घेत नाही तर जीव वाचवतो. ‘मुखवट्या मागे: काळजीवाहकाची काळजी घेणे’; २०२५ च्या डॉक्टर्स डे ची थीम डॉक्टरांच्या कल्याणाची कबूली देण्याची आणि त्यांना पाठींबा देण्याची गरज यावर भर देते. हे ओळखून की रुग्णांप्रती समर्पण असूनही त्यांना काळजी आणि लक्ष देण्याची देखील आवश्यकता आहे.

राष्ट्रीय डॉक्टर्स दिन दरवर्षी १ जुलै रोजी साजरा केला जातो. प्रसिद्ध डॉक्टर, शिक्षणतज्ञ आणि बंगालचे दुसरे मुख्यमंत्री डॉ. बिधानचंद्र रॉय यांच्या जयंती निमीत्य हा दिवस साजरा करण्यात येतो. हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असलेल्या डॉक्टरांचे योगदान मान्य करण्यासाठी आणि त्यांचे आभार मानण्यासाठी साजरा केला जातो. डॉ. बिधानचंद्र रॉय यांना आदरांजली वाहण्यासाठी १९९१ मध्ये भारतात पहिल्यांदा डॉक्टर्स डे साजरा करण्यात आला. तब्बल १४ वर्षे बंगालचे मुख्यमंत्री म्हणून कार्यरत असलेले डॉ. बिधानचंद्र रॉय ह्यांचे आरोग्य सेवेत मोठे योगदान आहे. त्यांचा जन्म १ जुलै १८८२ रोजी पाटणा, बिहार येथे झाला व त्यांचे निधन देखील १ जुलै १९६२ मध्ये झाले होते. जाधवपुर राजयक्ष्मा हॉस्पिटल, महिला आणि मुलांसाठी चित्तरंजन सेवा सदन, कमला नेहरू मेमोरियल हॉस्पिटल, व्हिक्टोरिया कॉलेज आणि चित्तरंजन कॅन्सर हॉस्पिटल सुरु करण्यात त्यांनी महत्तवाची भुमिका बजावली.

डॉ. बिधानचंद्र रॉय ह्यांनी कलकत्ता येथून वैद्यकीय पदवी पुर्ण केली आणि नंतर लंडनमध्ये एमआरसीपी आणि एफआरसीपी पदवी प्राप्त केली आणि त्याच वर्षी त्यांनी भारतात वैद्यकीय कारकीर्दीची सुरुवात केली. ते एक स्वातंत्र्यसैनिक होते कारण त्यांनी महात्मा गांधींनी केलेल्या चळवळींमध्ये भाग घेतला होता आणि उपोसणात सुद्धा त्यांची काळजी सुद्धा घेतली होती. स्वातंत्र्यानंतर ते भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नेते झाले आणि नंतर ते पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री होते. फेब्रुवारी १६६१ मध्ये त्यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांचा आदर आणि श्रद्धांजली अर्पण म्हणून शासनाने डॉ.बी.सी. रॉय राष्ट्रीय पुरस्कार त्यांच्या स्मरणार्थ १९७६ मध्ये सुरु केला.

हा दिवस साजरा करण्याचा उद्देश डॉक्टरांचे योगदान, त्यांच्या कार्याबद्दल लोकांमध्ये जागरुकता निर्माण करणे होय. जगात डॉक्टरांचा खुप आदर केला जातो, भारतात सुद्धा त्यांची पुजा केली जाते. तसे, कोणत्याही मनुष्याची तुलना देवाशी करणे योग्य नाही. परंतू डॉक्टरांनी आपल्या कामाद्वारे हा पदवी प्राप्त केली आहे. तसे मृत्यू हा देवाच्या हातात आहे, परंतू देवाने डॉक्टर बनवून एखाद्या व्यक्तीला वाचवण्याचा अधिकार नक्कीच दिला आहे असे म्हणने वावगे ठरणार नाही. वेगवेगळ्या देशांमध्ये वेगवेगळ्या दिवशी हा दिन साजरा केला जात असल्याने हा दिवस साजरा करण्याचा इतिहासही आपला स्वत:च आहे. १ जुलै रोजी भारतात,




३० मार्च अमेरिकेमध्ये आणि २७ फेब्रुवारीला व्हिएतनाममध्ये डॉक्टर्स दिन साजरा केला जातो.

डॉक्टर सर्वांना गंभीर परिस्थितीत उपचार देतात, ते आपले जीवनदाते आहेत. मात्र काहीवेळा शोकमग्न नातेवाईकांकडून भावना अनावर झाल्यास डॉक्टरांवर प्राणघातक हल्ले होण्याच्या घटना घडतात, त्याचे समर्थन नक्कीच करता येत नाही. अशा घटना निंदणीय`आहेत. जो आपल्या जीवाची बाजी लावून दुसऱ्याच्या प्राणाचे रक्षण करतो, त्याच्या जीवीताची हानी होईल असे कृत्य कोणीही करू नये. ९ ऑगस्ट २०२४ रोजी कोलकत्याच्या आर.जी. कार मेडीकल कॉलेज आणि हॉस्पीटलमधील एका महिला प्रशिक्षणार्थी डॉक्टर मोमीता रॉय हीचेवर बलात्कार करून हत्या करण्यात आली, ज्याने जनतेच्या विवेकाला हादरवून टाकले. आपल्या सेवेने लाखो लोकांचे जिवन सुंदर करणाऱ्या सर्व डॉक्टरांना राष्ट्रीय डॉक्टर्स दिनाच्या अनंत शुभेच्छा.

**● डॉ. विजय बाबर, वर्धा**
**मो. नं. ९४२३११८८०६**

# गरजू रुग्णांना वेळेवर दर्जेदार रुग्णसेवा मिळावी : आ. पठाण

■ प्रतिनिधी | अकोला ■

**राज्यातील गरीब, गरजू रुग्णांना वेळेवर दर्जेदार अशी वैद्यकीय सेवा मिळावी, सोबतच सद्यस्थितीत असलेली वैद्यकीय व्यवस्था ही आणखीन सुलभ व पारदर्शक व्हावी अशी सकारात्मक सूचना आ. पठाण यांनी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी विधानभवनाच्या सातव्या मजल्यावर धर्मादाय रुग्णालयांच्या कार्यपद्धतीसंदर्भात पार पाडलेल्या बैठकीत दिल्या.**

## धर्मादाय रुग्णालयांच्या पारदर्शकतेसाठी महत्त्वपूर्ण बैठक संपन्न



या बैठकीत राज्यातील धर्मादाय रुग्णालयांमध्ये गरीब व गरजू रुग्णांना वेळेवर व दर्जेदार वैद्यकीय सेवा मिळावी, यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा झाली. धर्मादाय रुग्णालयांवर देखरेख ठेवण्यासाठी कार्यरत असलेल्या संयुक्त समित्यांची कार्यपद्धती, निगराणी प्रक्रिया, तसेच पोर्टलवर माहिती अपलोड करणे, निधीचा खर्च आणि न्यायालयीन आदेशांचे पालन यावर सखोल विचारविनिमय झाला.

या बैठकीस धर्मादाय समितीचे सदस्य आ. साजिद खान पठाण विशेष उपस्थित होते. त्यांनी रुग्णसेवा अधिक सुलभ आणि पारदर्शक व्हावी यासाठी अनेक सकारात्मक सूचना मांडल्या. धर्मादाय आयुक्तांचाही या बैठकीत सहभाग होता. धर्मादाय रुग्णालयांच्या व्यवस्थापनात उत्तरदायित्व व पारदर्शकता आणण्यासाठी ही बैठक उपयुक्त ठरली आहे.

राज्यातील रुग्णांना गुणवत्तापूर्ण सेवा मिळावी या उद्देशाने शासन प्रयत्नशील असून, ही बैठक धर्मादाय रुग्णालय क्षेत्रात आवश्यक सुधारणा घडवून आणण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

# प्रा. डॉ. अभिजीत मुळे पाटील यांना राज्यस्तरीय स्वामी विवेकानंद कर्तृत्व सन्मान पुरस्कार

## सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील कार्याची दखल; प्रेरणादायी योगदानाची पावती

■ प्रतिनिधी | अकोला ■

सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात दिलेल्या दीर्घकालीन व बहुआयामी योगदानाची दखल घेत, स्वामी विवेकानंद ग्रुप ऑफ ऑर्गनायजेशन यांच्यातर्फे यंदाचा राज्यस्तरीय स्वामी विवेकानंद कर्तृत्व सन्मान – २०२५ हा पुरस्कार प्रा. डॉ. अभिजीत मुळे पाटील यांना जाहीर करण्यात आला.

सन्मान प्रदान सोहळा आज अकोल्यातील ओझोन सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल येथे पार पडला. सुप्रसिद्ध वैद्यकीय तज्ञ डॉ. विनीत हिंगणकर यांच्या हस्ते डॉ. मुळे पाटील यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्रा. डॉ. अभिजीत मुळे पाटील हे युवकांच्या प्रश्नांवर झगडणारे, सदैव जनसंपर्कात राहणारे, लोकशाही मूल्यांचा आदर करणारे आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन असलेले उच्चशिक्षित युवा नेतृत्व म्हणून परिचित आहेत.त्यांनी आजवर आरोग्य शिबिरे, ग्रामीण भागातील तरुणांसाठी करिअर मार्गदर्शन, सामाजिक संस्थांशी सहकार्य, तसेच वंचित आणि उपेक्षित घटकांसाठी निःस्वार्थपणे कार्य करत समाजात बदल घडविण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या कृतीशील उपक्रमांमुळे अकोला जिल्ह्यात सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात त्यांनी स्वतःची ठसठशीत ओळख निर्माण केली आहे.

या कार्यक्रमास स्वामी विवेकानंद ग्रुप ऑफ ऑर्गनायजेशनचे अध्यक्ष दिलीप अंधारे, उपाध्यक्ष प्रा. राजेश पाटील ताले, प्रा. प्रतिक पाटील ताले, प्राचार्य गोपाल मानकर, अस्थीरोगतज्ञ डॉ. प्रणय महल्ले, युवा उद्योजक नीरज देशमुख, पंचायत समिती सदस्य सचिन थोरात आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या या यशाबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवर, सहकारी, सामाजिक संस्था, शाळा-महाविद्यालये आणि नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



**'हा सन्मान माझा नाही, आमचा आहे' – डॉ. मुळे पाटील**

पुरस्काराबद्दल आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना डॉ. मुळे पाटील म्हणाले की, 'हा पुरस्कार माझ्या वैयक्तिक यशाचे प्रतीक नसून, माझ्या सहकाऱ्यांचे, मार्गदर्शकांचे व जनतेच्या पाठिंब्याचे प्रतीक आहे. हे कार्य अधिक जोमाने पुढे नेण्याची ही प्रेरणा आहे. समाजासाठी काम करणे हेच खरे जीवन आहे.'

# राहेर गावाला पूराचा धोका

## कोल्हापुरी बंधाऱ्यात अडकला घाणकचरा



**खेट्री :** पातूर तालुक्यातील राहेर गावाजवळील उतावळी नदीवरील कोल्हापुरी बंधाऱ्यात अडकलेल्या लाकूड व घाणकचऱ्यामुळे परिसरात गंभीर पूरस्थिती निर्माण होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे बंधाऱ्याच्या मोहऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात लाकूड व कचरा अडकला असून, त्यामुळे नदीपात्रातील पाण्याचा प्रवाह अडवला गेला आहे. परिणामी, आसपासची शेती खरडून गेली असून, काही घरे पाण्याखाली गेल्याने पडझड झाली आहे.

गंभीर बाब म्हणजे या बंधाऱ्यात अडकलेला कचरा अद्यापही काढण्यात आलेला नाही. त्यामुळे पुन्हा एकदा पाऊस झाला, तर नदीतील पाणी गावात घुसण्याचा धोका अधिकच वाढला आहे. यामुळे राहेर गावातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

स्थानिक ग्रामस्थ बंडू पाटील यांनी सांगितले की, 'अतिवृष्टीमुळे बंधाऱ्यात अडकलेला कचरा व लाकूड आजही तसाच आहे. आधीच शेतीचे मोठे नुकसान झाले असून, वेळीच उपाययोजना न केल्यास गावात मोठा पूर येऊ शकतो. संबंधित विभागाने तातडीने लक्ष घालून हा कचरा काढावा.'

संबंधित कोल्हापुरी बंधारा विभागाच्या अधिकाऱ्यांनी याकडे त्वरित लक्ष देणे गरजेचे असून, कचरा व लाकूड निघेपर्यंत संभाव्य आपत्तीची टांगती तलवार गावावर आहे.

# शिवधाराची महानगरात वृक्षारोपण मोहीम



**अकोला :** सामजिक व अध्यात्मिक सेवेत सेवारत शिवधारा मिशन फाउंडेशनच्या वतीने वृक्षारोपण अभियान साकार करण्यात आले.शिवधारा मिशन फाउंडेशनचे संस्थापक पु संत डॉ.संतोषदेव महाराज यांनी जेवढे वृक्ष लावाल तेवढे मानवाचे आरोग्य अबाधित राहून ते दीर्घायु होतील.या विश्वस्तरीय संकल्पना नुसार शिवधारा प्रत्येक वर्षी वृक्षारोपण मोहीम आयोजित करीत असते.महाराज श्रीच्या कृपेवरून स्थानीय सिंधी कॅम्प परीसरातील झूलेलाल वाटिका येथे मिशनच्या वतीने पिंपळ, निंब, तुळस, आवळा व बेलपत्र याचे वृक्षारोपण करण्यात आले. या अभियानात शिवधारा परिवारने लावण्यात आलेल्या वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्याचा संयुक्तपणे संकल्प केला. शिवधारा परिवारच्या या वृक्षारोपण अभियानात झूलेलाल वाटिका मॉर्निंग ग्रुपचे सहकार्य लाभले.यावेळीबशिवधारा परिवारच्या वतीने सर्वांचे आभार मानण्यात आले.

# दहा एकरात पेरलेले बियाणे उगवलेच नाही

## पातुर तालुक्यातील अंबाशी येथे धक्कादायक प्रकार उघडकीस

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील अंबाशी येथील शेतकरी पती-पत्नीच्या नशिबी मोठा फसवणुकीचा प्रसंग आला आहे. नंदकुमार लाहोळे आणि त्यांची पत्नी संगीता लाहोळे यांनी अकोला येथील एका कृषी केंद्र संचालकाकडून २२,५०० रुपये खर्च करून दहा बॅग बियाणे खरेदी केली होती. त्यांनी २२ जून रोजी दहा एकर शेतीत पेरणी केली, आणि त्यानंतर लगेच दमदार पाऊसही झाला.

मात्र, २८ जून रोजी शेताची पाहणी करताना एकही बियाणे उगवले नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. या प्रकारामुळे दोघांच्याही पायाखालची जमीन सरकली. त्यांनी पेरणीसाठी व्याजावर पैसे उधार घेतले होते, त्यामुळे आर्थिक संकट आणखीनच गडद झाले आहे.

या प्रकरणात कृषी केंद्र संचालकाने बोगस बियाणे विकल्याचा आरोप होत असून, संबंधित यंत्रणेकडून चौकशी करून नुकसान भरपाई द्यावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.





### शेतकऱ्यांची लूट थांबता थांबेना!

पातुर तालुक्यात शेतकऱ्यांची विविध प्रकारे आर्थिक लूट सुरूच आहे. सत्ताधारी आणि विरोधकांकडून शेतकऱ्यांसाठी लढा दिला जात असला, तरी भविष्य अनिश्चित आहे. व्याजाने घेतलेल्या पैशांची परतफेड कशी करावी, असा जिव्हाळ्याचा प्रश्न आता उभा ठाकला आहे.



# भरपावसात पिक नुकसानीच्या सर्वेक्षणाला सुरुवात

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील अतिदुर्गम सावरगाव, झरंडी, वसाली या गावांमध्ये नुकत्याच झालेल्या ढगफुटी सदृश पावसामुळे शेतकऱ्यांवर मोठे संकट कोसळले आहे. नदी-नाले तुडुंब वाहून झरंडी गावात पाणी घुसल्याने अनेक घरांचे, अन्नधान्याचे आणि पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. पेरलेल्या शेतजमिनीसह सुपीक मातीही वाहून गेली आहे.

काही शेतकऱ्यांच्या शेतांमध्ये नदी-नाल्याचे स्वरूप निर्माण झाले असून, दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. या नैसर्गिक आपत्तीत शेतकरी प्रचंड खचून गेले आहेत.

या पार्श्वभूमीवर पातूरचे तहसीलदार राहुल वानखडे यांनी तत्काळ घटनास्थळी जाऊन प्राथमिक पाहणी केली व नुकसानीच्या सर्वेक्षणाचे आदेश दिले. त्यानंतर महसूल विभागाने भरपावसातच तातडीने हालचाल सुरू केली. महसूल अधिकारी मिलिंद इचे, कृषी सहाय्यक अरुण ताले, सावरगाव ग्रामपंचायत सचिव साळोकार, तसेच कोतवाल उमेश रामचवरे यांनी संबंधित भागांतील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन सर्वेक्षणास प्रारंभ केला आहे.

प्रशासनाच्या या तातडीच्या कृतीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळत असून, योग्य मदत मिळावी यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे.


**Change In Name**

I Have Change
My Name From
**DHYANESHWARI SANJAY MARSETWAR**
- TO -
**DNYANESHWARI SANJAY MARSETWAR**
PASSPORT NO :- G6767918
My Residential Address is - Dabki Road Dnyaneshwar Nagar Akola 444002


### उपप्राचार्य संजय म्हैसने सरांचा सेवापूर्ती सोहळा संपन्न

**अकोला :** महात्मा गांधी विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय गांधीग्रामचे उपप्राचार्य संजय म्हैसने दिनांक ३० जुन २०२५ रोजी नियत सेवा निवृत्त झाले. शैक्षणिक, सामाजिक वा अन्य विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कार्याविषयी कृतज्ञता व्यक्त करून त्यांना सेवा निवृत्तीच्या शुभेच्छा देण्यासाठी सेवापुर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.


**चौकशीची जाहिर नोटीस**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला**

एस. आर. एन. क्र. AKL/01593/18/25 फेरफारअहवाल/अर्ज क्रमांक ४१/२०२५ कलम १९
**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक** श्री हनुमान मंदिर सेवा समिती माउली नगर खडकी अकोला ता. जि. अकोला बाबत।
**न्यासाचा पत्ता :** - साने गुरूजी नगरच्या मागे खडकी अकोला, अकोला, अकोला अकोला
**अर्जदार :-** श्री पांडुरंग श्रावण धोरे

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मदाय आयुक्त, अकोला, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत :-

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| 1 | Member ship fees | 11000.00 |

(अ) जंगम मिळकत : रोख रु.११०००/- मात्र (अक्षरी रुपये अकरा हजार मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गाव | सी.एस. किंवा महानगर पालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|

(ब) स्थावर मिळकत : रोख रु.० /- मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०८/०५/२०२५ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास
नोंदणी कार्यालय, अकोला



**जाहीर नोटीस**
**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५९२/२०२५ प्रोसेस नं.५५८४/२०२५
चौ.ता. २३/०७/२०२५ दिनांक : २७/०३/२०२५

**अर्जदार :** १) तिलोत्तमा बाबाराव काळे रा. पीकेव्ही ४० क्वॉर्टर जवळ, गुडधी, अकोला, ता. व जि. अकोला. २) उर्मिला नामदेवराव थोरात रा. चिखलगाव, अकोला, ता. व जि. अकोला. ३) सुनिल शामराव खारोडे रा. उमरी, अकोला, ता. व जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शकुंतलाबाई शामराव खारोडे
**पत्ता :-** रा. गायत्री नगर, उमरी, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शकुंतलाबाई शामराव खारोडे यांचे दि. ०४/०१/२०२५ रोजी उमरी, ता. व जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०३/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



**जाहीर नोटीस**
**वि.०७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५३९/२०२५ प्रोसेस नं.९३२९/२०२५
चौ.ता. ३१/०७/२०२५ दिनांक : २०/०६/२०२५

**अर्जदार :** १. रविंद्र देविदास दाभाडे २. मनिष देविदास दाभाडे दोघेही रा. फडके नगर, डाबकी रोड, अकोला, ता. जि. अकोला ३. भारती यशवंत मनवर रा. द्वारा यशवंत मनवर प्लॉट नं ३२. श्री सिद्धांत कोचिंग क्लासेस जवळ, प्रथमेश अपार्टमेंट च्या मागे, व्दारका नगरी, अकोला, ता जि अकोला. ४. आरती सुशिल हिवाळे रा. द्वारा सुशिल हिवराळे, फड़के नगर, जुने शहर अकोला ता जि अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. कुसूम देविदास दाभाडे २ देविदास फकिरा दाभाडे
**पत्ता :-** रा. दोघेही रा. फडके नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत कुसूम देविदास दाभाडे यांचे दि.०३/०७/२०२२ रोजी फडके नगर, डाबकी रोड अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत देविदास फकिरा दाभाडे यांचे दि.१६/०५/२०१८, रोजी फडके नगर, डाबकी रोड, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत. त्याशिवाय इतर कोणीही रायतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३१/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक २०/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



**जाहीर नोटीस**
**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०८५/२०२५ प्रोसेस नं.१०१०५/२०२५
चौ.ता. ३०/०७/२०२५ दिनांक : ३०/०७/२०२५

**अर्जदार :** १. श्वेता गजानन घाटोळ श्रीमती श्वेता संतोष आसोलकार रा. नागझरी रोड, जुने महादेव मंदिराच्या मागे, नावकार माला, शेगांव, बुलढाणा ४४४२०३ २. धिरज गजानन घाटोळ ३. राजेश गजानन घाटोळ अर्जदार क. २ व ३ रा. शिवाजी पुतळ्याच्या मागे, जुनी ग्रामपंचायत, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : ललिता गजानन घाटोळ
**पत्ता :-** रा. शिवाजी पुतळ्याच्या बाजूला, जुनी ग्रामपंचायत, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत ललिता गजानन घाटोळ यांचे दि.२७/०३/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजा स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



**चौकशीची जाहिर नोटीस**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला**

एस. आर. एन. क्र. AKL/01939/18/25 फेरफारअहवाल/अर्ज क्रमांक ७१/२०२५ कलम १९
**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक** श्री महादेव व गणेश मंदिर मोझर ता. मूर्तिजापूर, जि. अकोला बाबत।
**न्यासाचा पत्ता :** -C/o श्री सचितानंद पंजाबराव काकड, मोझर, खेरडा, अकोला, मूर्तिजापूर, मोजर
**अर्जदार :-** श्री सचितानंद पंजाबराव काकड

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मदाय आयुक्त, अकोला, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत :-

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| 1 | Donation | |

(अ) जंगम मिळकत : रोख रु.५०००/- मात्र (अक्षरी रुपये पाच हजार मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गाव | सी.एस. किंवा महानगर पालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Mozar | 42 | 612 Sf | 0 | 0 | 150000.00 |
| 2 | Mozar | 51/1 | 272 Sf | 0 | 0 | 50000.00 |

(ब) स्थावर मिळकत : रोख रु.२००००० /- मात्र (अक्षरी दोन लाख रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक २६/०६/२०२५ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास
नोंदणी कार्यालय, अकोला



**जाहीर नोटीस**
**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०६९/२०२५ प्रोसेस नं.९९४२/२०२५
चौ.ता. ०८/०८/२०२५ दिनांक : २६/०६/२०२५

**अर्जदार :** १. शुभांगी दिनकर आळशी २. नीता उदय देशपांडे रा. ३ई, चिन्मय अपार्टमेंट, संख्ये कॉलनी, मेडिकल हॉस्टेल च्या समोर, पालघर वेस्ट, जि. ठाणे ३. सुनिल दिनकर आळशी ४. अतुल दिनकर आळशी अर्जदार क. १, २ व ४ रा. खेमका अपार्टमेंट, रेमंड शोरूमच्या मागे, आळशी प्लॉट, अकोला ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : दिनकर गोपालराव आळशी
**पत्ता :-** रा. व्दारा सुनिल दिनकर आळशी रा. खेमका अपार्टमेंट रेमंड शोरुमच्या मागे आळशी प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आह की, मयत दिनकर गोपालराव आळशी यांचे दि. २२/०५/२०१९ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०८/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २६/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



**जाहीर नोटीस**
**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९८६/२०२५ प्रोसेस नं.९१५३/२०२५
चौ.ता. २४/०७/२०२५ दिनांक : १८/०६/२०२५

**अर्जदार :** १. रामभाउ हरिभाउ आमले, २. पांडुरंग हरिभाउ आमले, ३. सौ. शोभा दिनकर कुटे. लग्नाआधीचे नाव - कु. शोभा हरिभाउ आमले, ४. सुरेश हरिभाउ आमले. ५. सौ. प्रतिभा गजानन मोरे. लग्नाआधीचे नाव - कु. प्रतिभा हरिभाउ आमले, ६. गणेश हरिभाउ आमले ७. शंकर हरिभाउ आमले. सर्व रा. डाबकी, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : हरिभाउ किसन आमले
**पत्ता :-** रा. डाबकी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आह की, मयत हरिभाउ किसन आमले यांचे दि. २३/०९/२००२ रोजी डाबकी, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २४/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक २१६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# पीकविमा भरपाईचे ‘संरक्षण’ काढले

## लाडकी बहीणी योजनेपासून सरकारच्या तिजोरीमध्ये खळखडाट

**वर्धा / जनमाध्यम**

राज्य सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केल्यापासून सरकारच्या तिजोरीत खळखडाट व्हायला सुरुवात झाली. मात्र मोठ्या आवेशात सुरू केलेली ही योजना बंद करणे राजकीयदृष्ट्या परवडणारे नाही. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. तसेच बिहारसारख्या राज्यातही सत्ताधारी पक्षात निवडणुकीत उतरायचे आहे. राज्यात निवडणुकीसाठी राबवलेली योजना बंद केली तर त्याचा फटका या निवडणुकांमध्ये बसू शकतो. त्यामुळे ही योजना कायम ठेवण्यात आली. मात्र पैशाचे सोंग करता येत नाही, हा नियम सरकारलाही लागू पडतो. लाडकी बहीण योजनेसाठी लागणारा निधी इतर योजनांमधून वळता करण्याचे धोरण सरकारने ठरवले. त्याचाच भाग म्हणून सरकारने पीकविमा योजनेला कात्री लावली.

मागील हंगामात विमा कंपन्यांना जवळपास ९ हजार ६०० कोटी रुपयांचा विमा हप्ता द्यावा लागला.

यात शेतकरी हिस्सा, राज्य हिस्सा आणि केंद्र हिस्सा होता. आता सरकारने विमा योजनेत बदल करून जवळपास चार ते साडेचार हजार कोटी रुपयांचा खर्च कमी केला. राज्याचा खर्च कमी होणार म्हणजे केंद्राचाही खर्च कमी होणार आहे. हा पैसा लाडकी बहीण योजनेसाठी वापरला जाणार आहे, असे काही सरकारी अधिकाऱ्यांनीच सांगितले. सुधारित पीकविमा योजनेत विमा हप्त्याचा संपूर्ण भार शेतकऱ्यांवर टाकण्यात आला आहे. शेतकऱ्यांना एक रुपयात विमा बंद करण्यात आला. विमा योजनेतून पेरणीच न होणे, हंगामातील प्रतिकूल परिस्थिती, स्थानिक नैसर्गिक आपत्ती, काढणीपश्चात नुकसान भरपाई आणि पीक कापणी प्रयोगावर आधारित भरपाई या पाच जोखीम बाबींमधून भरपाई मिळत होती.तेव्हाही शेतकऱ्यांसाठी खरीप पिकांसाठी २ टक्के, रब्बी पिकांसाठी १.५ टक्के आणि दोन्ही हंगामांतील नगदी पिकांसाठी ५ टक्के विमा हप्ता होता.




पण सरकारने आता चार जोखीम बाबी कमी केल्या. त्यामुळे विमा हप्ताही कमी झाला. मात्र शेतकऱ्यांचा विमा हप्ता कायम आहे.

**केवळ दोन कंपन्या राबविणार योजना**

पीकविमा योजनेत मोठे बदल झाल्याने विमा हप्ताही मोठ्या प्रमाणात कमी झाला. त्यामुळे पीकविमा योजना राबविण्यासाठी ज्या कंपन्यांनी कमी विमा हप्ता आकारला अशा दोनच कंपन्या यंदा योजनेत असणार आहेत. यात भारतीय कृषी विमा कंपनीसाठी अहिल्यानगर, नाशिक, चंद्रपूर, सोलापूर, जळगाव, सातारा , वाशीम, बुलडाणा, सांगली, नंदुरबार, परभणी, वर्धा, नागपूर, नांदेड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, हिंगोली, अकोला, धुळे, पुणे, जालना, गोंदिया, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, भंडारा, पालघर, रायगड, यवतमाळ, अमरावती, गडचिरोली. तर आयसीआयसीआय लोंबार्ड जनरल इन्शुरन्स कंपनीसाठी लातूर, धाराशिव, बीड यांचा समावेश आहे.

**खरिपात ११ जिल्ह्यांत एकाच पिकाचा बोजा**

पिक विमा योजना अकरा जिल्ह्यांमध्ये केवळ एकाच पिकासाठी सरकारला विमा हप्ता भरावा लागणार आहे. हे जिल्हे म्हणजे धुळे, जळगाव, सोलापूर, लातूर, नांदेड, हिंगोली, बुलडाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ आणि चंद्रपूर. तर केवळ अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव आणि परभणी. या ६ जिल्ह्यांमध्ये सरकारला एकापेक्षा अधिक पिकांसाठी आपला हिस्सा भरावा लागणार आहे.

# साहूर येथे बांधकाम कामगारांसाठी संपूर्ण आरोग्य तपासणी शिबीर

**साहूर/ जनमाध्यम**

महाराष्ट्र राज्य इमारत बांधकाम कल्याणकारी मंडळ व राज्य शासनाच्या कामगार विभागाच्या वतीने राज्यातील बांधकाम कामगारासाठी मोफत आरोग्य तपासणी व दोन लाखापर्यंत मोफत उपचार खर्च अशी योजना गेल्या अनेक वर्षापासून राबविली जात आहे त्या अनुषंगाने साहूर येथे सुद्धा साहूर रुद्रपुर जामगाव बोरखेडी परिसरातील सर्व नोंदणीकृत बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबीयाकरिता ग्रामपंचायत भावनात मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, याप्रसंगी शेकडो नोंदणीकृत महिला व पुरुष बांधकाम कामगारांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली,



**शेकडो बांधकाम कामगारांनी केली आरोग्य तपासणी**

महाराष्ट्र राज्य इमारत बांधकाम कल्याणकारी मंडळ व राज्य शासनाच्या कामगार विभागाच्या वतीने राज्यातील नोंदणीकृत इमारत बांधकाम कामगारांसाठी अनेक कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहे त्या अनुषंगाने या कल्याणकारी योजनेअंतर्गत दरवर्षी नोंदणीकृत बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी केली जाते मोफत आरोग्य तपासणी शिबिरा अंतर्गत सर्व मोफत तपासण्या करण्यात येते यामध्ये रक्त तपासणीसह ईसीजी एक्स-रे सोनोग्राफी सिटीस्कॅन इत्यादी महागड्या तपासण्या अगदी मोफत केल्या जाते.

व बांधकाम कामगारांना काही दुर्धर व घातक आजार आढळून आल्यास राणे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल आर्वी इथे नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी ऑपरेशन व भरतीची व्यवस्था केली असल्याचे असल्याचे जिल्हा समन्वयक दिपाली राऊत व डॉ. आशिष मरसकोल्हे यांनी सांगितले .

तेव्हा या मोफत आरोग्य शिबिराचा नोंदणीकृत बांधकाम कामगारांनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा समन्वयक दिपाली राऊत डॉ. आशिष मरसकोल्हे डॉ. प्रशांत वैद्य यांनी केले सदर शिबिरामध्ये स्टाफ नर्स दुर्गा खोडणकर शारदा जाधव प्रणाली महाबुधे आरोग्य सेवक आकाश तळवेकर आकाश धुर्वे शिवानी देशमुख दुर्गा खैरकार इत्यादी आरोग्य कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# शिवसेना (ठाकरे) गटाच्या वतीने गरीब कुटुंबातील मुलीचा शुभ विवाह

**आष्टी (शहीद) / जनमाध्यम**

आष्टी तालुका शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या वतीने एका गरीब कुटुंबातील मुलीचा स्वखर्चाने विवाह पार पाडून दिला. तालुक्यातील किन्ही (मोई) येथील हरीलाल उईके यांची कन्या चि.सौ.कां.कल्पना आणि कारंजा तालुक्यातील कन्नमवारग्राम रहिवासी महादेव कोवे यांचा मुलगा चि. गुलशन यांचे सोबत लावून दिले.

यात महत्त्वाचे असे की, वधू पिता हरिलाल कोवे यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बेताची असल्याने मुलीचे लग्न कसे करावे ? या विवंचनेत असताना शिवसेना कार्यकर्ता अनिल धुर्वे यांच्या लक्षात सदर प्रकार आल्यानंतर त्यांनी तालुका शिवसेनाप्रमुख अनिल गुरव यांची रमाबाईची भेट करून दिली. त्यांनी तिला शब्द दिला की, तुझे लग्न आम्ही शिवसेना पदाधिकारी शिवसैनिक पार पाडून देईल. आणि शब्द पाळत हजार ते बाराशे लोकांचे जेवण आणि पाण्याची व्यवस्था तसेच वाढण्याची व्यवस्था व मंडप व्यवस्था कार्यकर्त्यांना मदत स्वयंपाक मंडळी यांना देखील शिवसैनिकांनी मदत करून हे लग्न पार पडले. उईके परिवाराने ईश्वराचे आभार माना असे अनिल गुरव यांनी त्यांना धीर दिला. आणि स्वतःच्या मुलीप्रमाणे बिदाई करून संसारात सुखी रहा असा आशीर्वाद दिला त्यावेळी शिवसेना पदाधिकारी कार्यकर्ते हजर होते गावकरी मंडळी यांचे सहकार्य लाभले तसेच लग्नाची चर्चा आष्टी तालुक्यात सुरू आहे, या कार्यक्रमाकरिता अनिल गुरव ,अजय खानजोडे, सुरेश टरके, अमरसिंग चव्हाण, अनिल देशमुख, ज्येष्ठ शिवसैनिक विनायक हेडव , शैलेश अकोलकर , शिवसैनिक अनिल दुर्वे माणिकवाडा सर्कल प्रमुख आणि विशाल कुकडे , प्रफुल समुद्रे ,प्रवीण नेरकर ,शेखर राणे, हरीश लाड ,लोकेश पोहेकर ,लहान आर्वी सर्कल प्रमुख प्रमोद कडू ,समन्वयक आष्टी तालुका तसेच नानक बावरी संघटक विधानसभा संघटक, सुरेश धबाले तालुका संघटक यांच्या मार्गदर्शनात या लग्नाचे कार्यक्रम पार पडला आणि या कार्यक्रमाकरिता विशेष सहयोग पत्रकार अमोल सोटे , सागर तसेच अमोल तायडे यांचे विशेष सहयोग आम्हाला लाभले,



**तालुका प्रमुख अनिल गुरव यांची महत्त्वाची भुमिका**

# भाजपाचे वैद्यकीय अधिकाऱ्यांना निवेदन

**दहेगाव (गो.)**-येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत रुग्णांना आरोग्य सुविधा प्राधान्याने मिळाव्या तसेच इतर उपाययोजनेसाठी येथील भारतीय जनता पार्टी शाखेच्या वतीने वैद्यकीय अधिकारी चराडे यांना निवेदन देण्यात आले. दहेगाव (गो.) हे गाव परिसरातील अनेक गावांशी जोडले असून, अनेक रुग्ण येथील रुग्णालयात उपचारासाठी येतात. त्यामुळे रुग्णांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता रुग्णवाहिका रुग्णांना वेळेत द्यावी, दवाखान्यात स्वच्छतेसाठी स्वच्छता कर्मचारी नेमावे, आरोग्य केंद्रामध्ये खिडक्यांना मच्छरदाणी लावावी, रात्रीच्यावेळी अतिदक्षता विभागात डॉक्टर असावेत, औषधी उपलब्ध राहावी तसेच विषारी साप चावल्यास रुग्णसाठी वेळीच औषध उपलब्ध व्हावे, जेणेकरून रुग्णांची धावपळ होणार नाही. तसेच पावसाळ्याचे दिवस असल्याने वेळीच उपाययोजना कराव्या, या सर्व विषयांवर वैद्यकीय अधिकारी यांच्याशी चर्चा करून निवेदन देण्यात आले. यावेळी भाजपा सोशल मीडियाचे संजय पिसुड्डे, शक्ती प्रमुख उमेश राऊत, बुथ प्रमुख सचिन महाबुधे, ज्ञानेश्वर किरनाके, गोपाल पोहटे, भुषण कावळे तसेच कर्मचारी उपस्थित होते.

# हिंगणघाट राष्ट्रीय महामार्गावर दुसऱ्यांदा पडले भ्रष्टाचाराचे भगदाड...





*नांदगाव चौकातील उडान पुलावर चार वर्षात दुसऱ्यांदा भगदाड पडले. शासकीय अधिकारी व कंत्राटदारावर गुन्हे दाखल करून कारवाई करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांनी केली आहे.*

# बजाज कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी जि.प. शाळेमध्ये साजरा केला शाळेचा पहिला दिवस

**वर्धा/ जनमाध्यम**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला, अंतर्गत शिक्षा मंडळ संचालित, बजाज कृषी महाविद्यालय पिपरी ,वर्धा यांच्याद्वारे राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण जागरूकता व कार्यानुभव २०२५ - २६ शैक्षणिक क्षेत्राच्या अंतर्गत विदर्भामध्ये जिल्हा परिषद शाळेचा पहिला दिवस असून करंजी काजी या गावामध्ये जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा येथे शाळेचा पहिला दिवस साजरा सकाळी ठीक सात वाजता शाळेतल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांसह व शिक्षण वृंदासह प्रभात फेरी काढण्यात आली.



त्यामध्ये विविध प्रकारचे नारे लावण्यात आले व नवीन विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्गात ज्यांनी नवीन प्रवेश घेतलेला आहे त्यांचे स्वागत शिक्षकांद्वारे व प्राध्यापक मुंडे मॅम यांच्या द्वारे करण्यात आले त्यांना पुष्पगुच्छ देऊन शाळेत नवनव्याने उत्साहाने गणवेश वाटप तसेच पुस्तकांचे वाटप शाळेच्या प्रवेशोत्सव करिता ,गावातील सरपंच प्रफुल कांबळे व तसेच सोशल वर्कर सुरेंद्र बेलूरकर व शाळेतील शिक्षक वृंद सहभागी होते व कृषी महाविद्यालयातील कृषी कन्या यांनी मुलांना शिक्षणाची जाणीव पटवून त्यांना शिकण्या करिता उत्साह व प्रोत्साहन दिले आणि त्यांच्याशी संवाद साधला व ग्रामीण जागरूकता व कार्यानुभव कार्यक्रम याबद्दल माहिती सांगितली व त्यातून काही न काही विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक कार्यकाळात व त्यांच्या जीवनात सुद्धा त्याचा लाभ होईल अशी हमी पटवून दिली बजाज कृषी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉक्टर स्नेहल देशमुख, कार्यक्रम समन्वयक डॉक्टर राजेंद्र खरचे तसेच डॉक्टर मंगेश घोडे ,डॉक्टर कविता चोपडे व डॉक्टर राणी मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली बजाज कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी व कृषी कन्या हर्षदा नागपुरे प्रियंका देऊळकर, आचल सायंकार ऋतुजा पोतराजे ,तन डिग्रसे श्रुती देवालकर यांनी २०२५ या कार्यावधीत शिक्षणाला व शेतीला नवी चालना देण्याची एक उत्कृष्ट असा पाऊल उचलला.

# विद्यार्थिनींनी दिली कृषी उत्पन्न बाजार समितीला भेट

**वर्धा/ जनमाध्यम**

डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत शिक्षा मंडळ संचालित बजाज कृषी महाविद्यालय, पिपरी ,वर्धा, यांच्याद्वारे राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण जागृकता व कार्यानुभव २०२५- २६ शैक्षणिक क्षेत्राच्या अंतर्गत करंजी काजी येथील बजाज कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी कृषी उत्पन्न बाजार समितीला भेट देत त्यांच्याकडून माहिती जाणून घेतली. त्यांनी बाजार समितीची व्यवस्थापन व मूळ उद्देश आणि समितीची कार्य पद्धती समजून घेतली.



शेतकरी व व्यापाऱ्यांमधील व्यवहार या बद्दल माहिती जाणून घेतली. शेती मालाचे भाव,मालाचे वर्गीकरण ,मालांचे वजन प्रक्रिया, मालातील ओलावा तपासणे व व्यापाऱ्यांचे व्यवहार याबाबतीत सविस्तर माहिती जाणून घेतली. तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत येणाऱ्या योजना व बाजार याबद्दल कृषी उत्पन्न बाजार समितीचे विविध अधिकारी, सचिव व इतर कर्मचाऱ्यांशी संवाद साधून पुरेपूर माहिती जाणून घेतली, बजाज कृषी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. स्नेहल देशमुख, कार्यक्रम समन्वयक डॉ. राजेंद्र खरचे तसेच डॉ.मंगेश घोडे, डॉ. कविता चोपडे व प्रशांत डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली बजाज कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी हर्षदा नागपुरे, आचल सायंकार, प्रियंका देऊळकर,ऋतुजा पोतराजे, तन्नु डिग्रसे ,श्रुती देवाळकर हे विद्यार्थी सहभागी होते.

## संक्षिप्त

### बोगस पीकविमा भरल्यास गुन्हा दाखल होणार!

**समुद्रपूर**- राज्य सरकारकडून राज्यात सुधारित प्रधानमंत्री पीकविमा योजना राबविण्यात येणार आहे. बोगस पीकविमा भरल्यास गुन्हा दाखल होणार आहे. शासनाच्या नवीन विमा योजनेंतर्गत आता फक्त उत्पादनावर आधारित पीकविम्याचा लाभ मिळणार आहे. त्यासाठी सरकारकडून भरला जाणारा एक रुपया विमा हप्ता बंद झाला असून, शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी दोन टक्के, रब्बी हंगामासाठी दीड टक्के तर नगदी पिकासाठी पाच टक्के हिस्सा भरावा लागणार आहे. शेतकऱ्यांना हेक्टरी सोयाबीनसाठी ८६२.५०, कापसासाठी ९००, तुरीसाठी ४४०, उडीद पिकासाठी ५५.५० तर मूग पिकासाठी ५७.५० रुपये भरावे लागणार आहेत. त्यासाठी ३१ जुलैपर्यंत अंतिम मुदत आहे. राज्य सरकारने केंद्र सरकारच्या ८०.१०० प्रमाणानुसार कप आणि कॅप मॉडेल स्वीकारले आहे. त्यानुसार यंदाच्या खरीप व रब्बी हंगामासाठी अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमाक्षेत्र घटक धरून पीकविमा योजना राबविण्यात येणार आहे. यात नुकसानभरपाईचे दायित्व संबंधित विमा कंपनीवर राहणार आहे. कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक असून बंधनकारक नाही. सर्व पिकांसाठी ७० टक्के जोखीम स्तर निश्चित केले आहे. केवळ पीक कापणी प्रयोगाच्याआधारे व तांत्रिक उत्पादनाआधारे उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत येणारी घट गृहीत धरून नुकसानभरपाई देण्यात येणार आहे. हंगामाच्या शेवटी त्या आधारे ती निश्चित केली जाणार आहे. दरम्यान, गतवर्षी एक रुपयात पीकविमा योजना सरकारने आणली होती. त्यावेळी अपेक्षेपेक्षा दहापट अर्ज जास्त आले होते. या पार्श्वभूमीवर आता बोगस अर्ज करणाऱ्यावर कारवाई करण्याचा इशारा संबंधित अधिकाऱ्यांनी दिला आहे.

### शेतातील काटेरी तार व जाळीची चोरी

**आष्टी**-तालुक्याच्या साहूर येथे शेतात कुंपनासाठी ठेवून असलेली काटेरी तार व मुर्गा जाळी असा एकुण १० हजार ५० रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली. साहूर येथील रहिवासी स्वप्नील वसंतराव अग्रवाल यांनी त्यांच्या शेतात सुरक्षा कुंपण घालण्यासाठी काटेरी तार ९० किलो ६ हजार ३०० रुपये व मुर्गा जाळी ३३ किलो ३ हजार ७५० रुपये असा एकुण १० हजार ५० रुपयांचा मुद्देमाल शेतात ठेवून होता. ही घटना स्वप्नील अग्रवाल शेतात गेले असता उघडकीस आली. या घटनेची तक्रार आष्टी पोलीस ठाण्यात दिल्याने पोलिसांनी गुन्हा नोंद केला.

### मोबाईल टॉवरच्या बॅटऱ्या चोरीच्या घटनांमध्ये वाढ

**हिंगणघाट**- रस्त्यापासून दूरवर असलेल्या मोबाइल टॉवरच्या सेलटर रूममधील किमती भावाच्या बॅटऱ्या चोरून नेण्याच्या घटना सातत्याने घडत आहे, चोरटे सक्रिय झाल्याचे या घटनांवरून दिसते. हिंगणघाट पोलीस ठाण्याच्या क्षेत्रात येणाऱ्या मौजा बोधुडा पाटी शेतशिवारामध्ये एका नामवंत कंपनीचे मोबाइल टॉवर आहे. त्या परिसरात कुणी नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने ५० हजार रुपये किंमतीच्या दोन बॅटऱ्या चोरून नेल्या. तेजस उदय येत्ते रा. चिंचोली (डांगे) यांचे मोबाइलवर टॉवर डोअर ओपनचा संदेश आला. त्यांनी लगेच घटनास्थळावर जाऊन पाहणी केली असता तेथे असलेल्या जनरेटरचे दार उघडे दिसले, जमिनीवर मोठ्या प्रमाणात ऑइल पडलेले होते. भावाच्या दोन बॅटऱ्या चोरून नेण्यात आल्याचे निदर्शनास आले. या घटनेची हिंगणघाट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनीही तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याअगोदरसुद्धा समुद्रपूर पोलीस ठाण्याच्या क्षेत्रामधील मोबाइल टॉवरच्या बॅटऱ्या चोरीला गेल्या आहे. खरांगणा पोलीस ठाण्याच्या क्षेत्रातून बॅटऱ्या चोरीला गेल्याची तक्रार नोंद आहे. गेल्या काही दिवसांत विविध ठिकाणावर चोरीचे गुन्हे दाखल झाले आहेत.

### कॉलेजमधून एम्प्लीफायर गेला चोरीला

**वर्धा**- कॉलेजच्या रुमधील आलमारीत ठेवलेला एम्प्लीफायर अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला. ही घटना स्वावलंबी शिक्षण महाविद्यालय, वर्धा येथे घडल्याची तक्रार रामनगर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली. स्वावलंबी शिक्षण महाविद्यालयाचे शिपाई मनोज उईके हे नेहमीप्रमाणे कॉलेज बंद करून घरीगेले. मनोज उईके यांनी दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजता कॉलेज उघडले. त्यानंतर मनोज उईके हे महाविद्यालयातील टेक्नालॉजी रूमची स्वच्छता करण्याकरिता गेले असता त्यांना टेक्नालॉजी रुमचे मागील दार उघले दिसले. रुमची पाहणी केली असता लोखंडी आलमारी ही उघडी दिसली.

लोखंडी आलमारीत ठेवलेले एम्प्लीफायर एक नग कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला.

याप्रकरणी उज्ज्वला सदाफळे यांच्या तक्रारीवरून रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून तपासात घेतला आहे. रोज रात्री या परिसरात दारू व गांजा पिणाऱ्यांची गर्दी राहते. शहराच्या विविध भागातील चोरटे या ठिकाणावर शाळा, महाविद्यालय बंद झाल्यानंतर वावरतात. त्यांनीच हे कृत्य केले असावे, असा अंदाज व्यक्त होत आहे.

### लघु पाटबंधारे विभाग उठला शेतक-यांच्या जिवावर

**वर्धा**- लघू पाटबंधारे विभागाद्वारे या भागात सिंचनाची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी केंद्रसरकारचे वतीने कॅनल द्वारे सिंचनाचे काम कृषी विभागाद्वारे करण्यात आले, परंतू या भागात काम चालू असतांना जमिनिचा ओघ आणि दर्जा न पाहता या विभागा बारे अधिकाऱ्याच्या दुर्लक्षित धोरण आणि ठेकेदाराच्या हेडखोरपणामुळे या भागातील कामे अपूर्ण राहिली. कोसूर्ला, मनसावळी,चानकी कान्होली, कात्री, या भागात कामे अपूर्ण असल्यामुळे मनसावळी येथील शेतकरी सुनिल कुशाब गुजरकर यांच्या १५ एकरपैकी तीन एकरातील सोयाबिन पिकांचे नुकसान झाले. असून पानलोट क्षेत्रातील बधारा फुटल्याने शेतात पाणी शिरून पिक वाहून गेले. त्यामुळे संबंधित विभागाकडून नुकसान भरपाई मिळवी अशी मागणी शेतकऱ्याने केली आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक - २१६
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## महानिर्मिती ई-निविदा प्रकाशनाची सूचना

महानिर्मिती, औ.वि.केंद्र परळी-वै. कडून अनुभवी व नामांकित उत्पादक / पुरवठादार / कंत्राटदारा कडून खालील काम / वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

